डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष दुसरे, अंक ६ वा, माहे-ऑक्टो. २०२६






महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# महापशुधन वार्ता

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष २ रे अंक ६ वा, माहे ऑक्टों. २०२६

मुख्य संपादक
डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-67

सहसंपादक
डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड
उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन
प्राधिकरण, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-67

वृत्तसंपादक
श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,
प.प.'महापशुधन वार्ता' कक्ष तथा
जनसंपर्क अधिकारी, पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-67




मागील अंक वाचण्यासाठी
dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
मुख्य संपादक
महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११०६७

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

महापशुधन वार्ता

# चारा साक्षरता व संवर्धन अभियान'

## पशुसंवर्धन विभागामार्फत आवाहन

पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' प्रभावीपणे राबवले जात आहे. या अभियानांतर्गत दुष्काळ किंवा चारा टंचाईच्या काळातही पशुधनाला पोषणमूल्ययुक्त चारा कसा उपलब्ध करून द्यावा, याचे आधुनिक तंत्रज्ञान सोप्या भाषेत समजावून सांगणारे विशेष माहितीपर व्हिडिओ खाली दिलेल्या क्युआर कोडअंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये कमी खर्चात व उपलब्ध जागेत मुरघास (सायलेज) निर्मिती, अझोला (अझोला) व हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाने चारा निर्मिती, तसेच पिकांच्या शिल्लक अवशेषांवर प्रक्रिया करून पौष्टिक चारा तयार करण्याच्या कृतींचा समावेश आहे. तरी सर्व पशुपालकांनी व शेतकऱ्यांनी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन हे मार्गदर्शक व्हिडिओ नक्की पहावेत आणि आधुनिक चारा व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून पशुधनाची उत्पादकता टिकवत दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर करावा, हे नम्र आवाहन!

https://drive.google.com
/drive/u/0/mobile/folder...

हायड्रोपोनिक तंत्राद्वारे चारा निर्मिती

https://drive.google.com
/drive/u/0/mobile/folder...

मुरघास निर्मिती




https://drive.google.com
/drive/u/0/mobile/folder...

निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया

https://drive.google.com
/drive/u/0/mobile/folder...

अझोला चारा निर्मिती

महापशुधन वार्ता




## या अंकात....


- राज्यात वैरण विकास धोरणाला मंजुरी
- पशुपालक-शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासन कटीबद्ध
- मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा मा. मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडून आढावा.
- माडग्याळ मेंढीला स्वतंत्र प्रजातीचा दर्जा: मंत्री पंकजा मुंडे यांचा सत्कार
- माफसूच्या विकासकामांना गती द्या: मा. मंत्री पंकजा मुंडे यांचे निर्देश
- व्हॉट्सअप चॅटबॉट सेवेला पशुपालकांचा प्रतिसाद
- राज्यात चारा साक्षरता व संवर्धन अभियान लागू
- लोकर संकलन, मुल्यवर्धन व नव्या उपयोगांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन
- मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, पुणे येथे अंडी दिन उत्साहात साजरा
- जागतिक अंडी दिन: .राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन
- जळगाव: चारा साक्षरता व संवर्धन अभियानाचा पहूर येथून शुभारंभ
- झुनोसिस तज्ज्ञ डॉ. ज्योती मिश्री यांची 'डीआयएस'ला भेट
- राज्यात 2 लाख 58 हजार 261 प्राण्यांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण
- जागतिक रेबीज प्रतिबंधक दिन: राज्यभरात लसीकरणावर भर
- पशुपालन व्यवसायातील नव्या संधी व उद्योजकता
- लावी (बटेर) पालन
- करकंबी: महाराष्ट्राची पहिली नोंदणीकृत वराह जात
- ममीफाईड फिटस ते नवजीवन
- गोठ्यातील परजीवी नियंत्रणाचा 4 सुत्री कार्यक्रम
- संघर्षाला संधीमध्ये बदलणारा शेतकरी उद्योजक
- दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ
- पोल्ट्री 4.0: भारतातील कुक्कुटपालनाचे एक नवीन युग
- पशुपालक ते उद्योजक: खाणारी मालमत्ता-सजीव इन्व्हेंटरीचे गणित
- आयव्हीबीपी: लस निर्मितीच्या नव्या क्षितिजाकडे भक्कम वाटचाल
- पशु तपासणीत सुरक्षितता व सुलभता महत्वाचीच
- अमरावती जिल्ह्यातील गायरानावरील पक्षी जैवविविधता
- बैलगाडा शर्यतीसाठी बैलांचे योग्य आहार व्यवस्थापन
- दुष्काळसदृश्य परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य संवर्धन
- चाराटंचाईत पशुधनाचे विषाक्त घटकांपासून संरक्षण
- परसातील कोंबड्यांच्या आतड्यातील परजीवींचे नियंत्रण व उपाय


## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना

**राज्यस्तरीय योजना**

**जिल्हास्तरीय योजना**

**पशुवैद्यकीय सेवेसाठी डायल करा 1962**
**व्हॉट्स् अप चॅटबॉट 9063142299**

व्हॉट्स अप चॅटबॉट




राज्यातील पशुपालक व शेतकऱ्यांसाठी वैरण विकास कार्यक्रम हा केवळ चारा उपलब्धतेचा प्रश्न सोडविणारा उपक्रम न ठरता पशुपालन अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणारे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेसा व पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर भर दिल्यास पशुपालकांचे बाहेरील चाऱ्यावरचे अवलंबित्व कमी होऊ शकते. शासकीय पडीक, गायरान तसेच उपलब्ध जमिनींचा नियोजनबद्ध वापर करून चारा उत्पादन वाढविणे, सुधारित चारा वाणांना प्रोत्साहन देणे आणि वैरणीच्या झाडांची लागवड वाढविणे यामुळे पशुधनासाठी सातत्यपूर्ण खाद्यसुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल. त्यातून पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकून राहण्याबरोबरच दुग्ध व्यवसायाचा खर्च नियंत्रित करण्यास हातभार लागू शकतो. विशेषतः दुष्काळ व पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात चारा टंचाईवर तात्पुरती उपाययोजना करण्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्था उभारणे, हे या कार्यक्रमाचे सर्वाधिक महत्वाचे वैशिष्ट्य ठरते.

पशुपालन व्यवसायासाठी चारा ही जीवनरेखा आहे. राज्यातील हिरव्या व सुक्या चाऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने प्रथमच 'वैरण विकास धोरण' लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दुष्काळी भागात तातडीने चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यासाठी दीर्घकालीन चारा सुरक्षा निर्माण करण्याच्या दुहेरी उद्देशाने हे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे 2 कोटी 78 लाख पशुधनासाठी हिरवा व सुका चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता सुधारणे, त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि पर्यायी चारा संसाधनांना चालना देणे, अशा व्यापक उपाययोजनांचा धोरणात समावेश करण्यात आला आहे. यासाठी 496 कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीचे नियोजन असून, वार्षिक 12 हजार लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

2026 च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-1' लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी 25 सप्टेंबर 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनेचाही समावेश आहे.

### अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना

राज्यातील पशुधन संख्या, उपलब्ध चारा व चाऱ्याची तूट विचारात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी 20 नोव्हेंबर 2023 च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्यात आले होते. या दलाने चारा टंचाई दूर करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे. राज्यात सुमारे 2 कोटी 78 लाख पशुधन आहे. या पशुधनासाठी 1 हजार 176.78 लाख मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याची गरज असताना 907.49 लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हिरव्या चाऱ्याची तूट 268.37 लाख मेट्रिक टन म्हणजेच 22.79 टक्के आहे. सुक्या चाऱ्याची गरज 377.87 लाख मेट्रिक टन असून, प्रत्यक्ष उपलब्धता 296.62 लाख मेट्रिक टन आहे. त्यामुळे सुक्या चाऱ्याची तूट 81.06 लाख मेट्रिक टन म्हणजे 21.43 टक्के आहे. पशुपालन व्यवसायासाठी चारा हा अत्यावश्यक घटक असल्याने ही तूट भरून काढण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपायांची आवश्यकता आहे.

पृष्ठ क्र. ०४



## पडीक व गायरान जमिनीवर चारा लागवड

चारा लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या कुरण व गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत तसेच द्विदल चारा पिकांच्या जातींची लागवड केली जाणार आहे. 'हॉर्टी-पाश्चर' पद्धतीत फळबागांमधील दोन झाडांच्या मोकळ्या जागेत चारा वाणांची लागवड करून दुहेरी उत्पादन घेण्यात येणार आहे. 'सिल्वी-पाश्चर' पद्धतीत पडीक, खडकाळ किंवा डोंगराळ जमिनीवर सुबाभूळ, अंजन आणि शेवगा यांसारख्या चारा देणाऱ्या झाडांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड केली जाईल. शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबाग, जलमार्ग तसेच नापीक व मशागतीस अयोग्य जमिनींचाही चारा उत्पादनासाठी उपयोग केला जाणार आहे. अशा जागांवर गिनी गवत, स्टायलो तसेच इतर गवत प्रकारांची लागवड करण्याचा प्रस्ताव आहे.

## शास्त्रीय साठवणुकीतून टंचाईग्रस्त भागांना पुरवठा

उपलब्ध चारा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय साठवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी 'हे बेल्स', 'फीड ब्लॉक', 'लीफ मिल' व कडबाकुट्टी या पद्धतींचा अवलंब केला जाईल. चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढल्याने अतिरिक्त उत्पादन काळात त्याची साठवणूक करून टंचाईच्या काळात गरजू भागांना पुरवठा करणे शक्य होणार आहे. चारा कापणी, प्रक्रिया, वाहतूक व जनावरांना चारा देताना होणारा अपव्यय रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. योग्य प्रक्रिया व साठवणुकीमुळे उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक वापर करता येणार आहे. पारंपरिक चारा पिकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी चारा संसाधनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यामध्ये अझोला उत्पादन, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती आणि काटेविरहित निवडुंगाचा चारा म्हणून वापर समावेश आहे. कमी जमीन व मर्यादित पाण्यामध्ये चारा उपलब्ध करून देण्यासाठी या पर्यायांचा उपयोग होणार आहे. वैरण ग्राहक सेवा केंद्रांची निर्मिती, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चारा विकास, चारा विकास विस्तार उपक्रम व संस्थात्मक बियाणे साखळी उभारणे या पूरक उपाययोजनांचाही धोरणात विचार करण्यात आला आहे. सार्वजनिक व खासगी क्षेत्राच्या सहकार्याने चारा उत्पादन, प्रक्रिया व उपलब्धतेची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहणार आहे.





## दुष्काळी भागांसाठी तातडीचा लाभ

सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यावर अल्पकालीन भर दिला जाणार आहे. उपलब्ध चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढवून त्याची योग्य साठवणूक केल्यास पुढील काळात टंचाईग्रस्त भागांना पुरवठा करणे सुलभ होईल. दीर्घकालीन उपायांमधून पशुपालनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करणे, पशुजन्य उत्पादनांमध्ये स्वयंपूर्णता साधणे आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे स्वरूप देण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतून सुमारे 25 लाख लाभार्थ्यांना लाभ अपेक्षित असून, त्यापैकी वैरण विकास कार्यक्रमातून वार्षिक 12 हजार रोजगार निर्माण करण्याचे नियोजन आहे. पशुपालकांचे उत्पन्न वाढल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

पृष्ठ क्र. ०५




## 'विकसित महाराष्ट्र 2047' शी थेट जोड

'विकसित महाराष्ट्र 2047' कार्यक्रमामध्ये पीक अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांतील उपपदार्थांचा वापर पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघास निर्मितीसाठी करून चारा सुरक्षा मजबूत करण्याच्या उपाययोजनेचा समावेश आहे. त्याद्वारे दुग्धव्यवसाय व पशुपालन या शेतीपूरक व्यवसायांना उद्योजकतेचे स्वरूप देण्याचा उद्देश निश्चित करण्यात आला आहे. राज्यात पशुपालन व्यवसायामध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या व्यापक धोरणातून वार्षिक सुमारे 25 लाख लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी अंदाजे 4 हजार 500 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे. यातील वैरण विकासाशी संबंधित कार्यक्रमासाठी 12 हजार लाभार्थी आणि 496 कोटी रुपयांच्या तरतुदीचे नियोजन करण्यात आले आहे. वैरण विकास धोरणाचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे चारा टंचाईकडे केवळ आपत्कालीन मदत म्हणून न पाहता चारा उत्पादन, जमीन वापर, गुणवत्तापूर्ण वाण व साठवणूक यांचे दीर्घकालीन नियोजन करण्याकडे शासनाचा कल आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले असून, या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता अधिक सक्षमपणे उपलब्ध होईल. तसेच पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या शेतीपूरक व्यवसायांना भक्कम बळ मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा मिळेल.

**– पंकजा मुंडे,** मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य





**यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे बीड जिल्ह्यातील अकराही तालुक्यांवर दुष्काळाचे संकट ओढवले आहे. पावसाच्या अभावामुळे शेतकऱ्यांची उभी पिके करपली असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.**

# पशुपालक - शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध

## – मंत्री पंकजा मुंडे

## बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग

बीड तालुक्यातील वंजारवाडी, काकडहिरा, मुर्शदपूर, लिबांदेवी तसेच पाटोदा तालुक्यातील पिठी नायगाव, रोहतवाडी, तांबा राजुरी, तळे पिंपळगाव, करंजवण आदी गावांमधील शेतशिवारात प्रत्यक्ष पिक नुकसानीचा पाहणी दौऱ्यादरम्यान मा. मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या व्यथा व अडचणी जाणून घेतल्या. या कठीण काळात शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. इतिहासात पहिल्यांदाच केंद्र आणि राज्याचे पारंपरिक निकष बाजूला सारून शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे.

प्रशासकीय यंत्रणेला पिकांच्या नुकसानीचे व पंचनाम्याचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तोंडावर आलेला सण पाहता, शासनाकडून शेतकऱ्यांच्या संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी व त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तसेच 32 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी असो वा इतर मदत, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाच्या या संवेदनशील भूमिकेमुळे शेतकरी वर्गाला मोठा आधार मिळाला असून, प्रशासनाकडून मदतीची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू आहे. राज्यातील शेतकरी व पशुपालकाला सर्वतोपरी सहकार्य याकाळात करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध असल्याचेही मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

पृष्ठ क्र. ०७




# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला आढावा

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसंदर्भात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मंत्रालयात योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. योजना अंमलबजावणीसंदर्भात येणाऱ्या समस्या तातडीने सोडवून ही योजना लवकरात लवकर लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील, सहसचिव नि. भा. मराळे, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. देवेंद्र जाधव यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, योजनेसाठी अर्ज व इतर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच, विविध शासकीय डेटाबेसमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचा प्रभावी वापर करून अर्ज, छाननी, प्राधान्यक्रम, पूर्वमंजुरी आणि अनुदान वितरणाची प्रक्रिया सुलभ करावी. डेटाबेसमध्ये माहिती उपलब्ध नसलेल्या अर्जांची स्वतंत्रपणे पडताळणी करावी. चुकीच्या नोंदींमुळे अपात्र व्यक्तीला लाभ मिळणार नाही आणि गैरव्यवहार होणार नाही, यासाठी प्रत्येक टप्प्यावरील जबाबदारी निश्चित करावी.

'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' पद्धत राबविताना योजनेची उद्दिष्टे, उपलब्ध निधी आणि संगणकीय यंत्रणेची क्षमता विचारात घ्यावी. एकाच वेळी मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाल्यास संकेतस्थळावर तांत्रिक अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी अर्जप्रणाली सुरू करण्यापूर्वी सर्व तांत्रिक चाचण्या पूर्ण करून त्रुटी दूर कराव्यात. राज्यातील चारा-पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन योजनेची अंमलबजावणी करावी, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. ग्रामपंचायती व ग्रामसभांच्या माध्यमातून योजनेची माहिती संभाव्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून व्यापक जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

पृष्ठ क्र. ०८




# माडग्याळ मेंढीला

## स्वतंत्र राष्ट्रीय प्रजातीच्या मान्यतेबद्दल

## मंत्री पंकजा मुंडे यांचा

## धनगर समाजाकडून

# सत्कार !

माडग्याळ मेंढीला अधिकृत प्रजाती म्हणून मान्यता दिल्याबद्दल आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखालील धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा मंत्रालयात सत्कार केला. माडग्याळ मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र आणि अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेल्या मान्यतेमुळे तिचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरोने नोंदणी दिली आहे. या निर्णयाबद्दल जत तालुक्यातील धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने मंत्री पंकजा मुंडे यांचा घोंगळी, काठी व माडग्याळ मेंढीची प्रतिकृती देऊन सत्कार केला.

माडग्याळ मेंढीला मिळालेली मान्यता ही जत परिसरातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी नमूद केले.

धनगर व रामोशी समाजातील मेंढपाळ तसेच शेतकरी माडग्याळ मेंढ्यांचे पालन करतात. विषम हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोगप्रतिकारशक्ती, जलद वजनवाढ, कोकरांच्या जगण्याचे अधिक प्रमाण, चांगली मातृत्व प्रवृत्ती आणि मांस उत्पादनासाठी उपयुक्तता या वैशिष्ट्यांमुळे ही मेंढी लोकप्रिय होत आहे.

सांगली जिल्ह्यातील माडग्याळ आणि सनमाडी गावांतील स्थानिक मेंढीपालकांनी सुमारे 100 वर्षांपूर्वी निवड पैदास पद्धतीने या मेंढीची पैदास केली. माडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची आणि मांस उत्पादनासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. या मेंढ्या प्रामुख्याने पांढऱ्या रंगाच्या असून त्यांच्यावर तपकिरी ठिपके आढळतात; काही मेंढ्या पूर्णपणे तपकिरी रंगाच्याही असतात.










पशुवैद्यक विज्ञान व पशुसंवर्धन पदवी (बीव्हीएससी अँड एएच) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इतर वैद्यकीय शाखांप्रमाणे 18 हजार रुपये विद्यावेतन करण्याच्या प्रस्तावानुसार 4 कोटी 12 लाख रुपयांची तरतूद करण्याबाबतच्या प्रस्तावाला आगामी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता घेण्यात यावी, विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांना हॉस्टेलसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

मंत्रालयात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या (माफसू) शैक्षणिक, प्रशासकीय तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांचा पशू व मत्स्य संवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, कुलसचिव मोना ठाकूर, उपकुलसचिव डॉ. ए. पी. गांवडे, सहसचिव नि. भा. मराळे उपस्थित होते.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या भरती प्रक्रियेचा आढावा घेण्यात यावा. विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती गतीने करण्याची कार्यवाही आणि भारतीय पशु चिकित्सा परिषदेच्या (व्हिसीआय) मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक शिक्षकवर्ग उपलब्ध करून देण्यासाठी या भरती प्रक्रियेला प्राधान्य देण्यात यावे.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्प कामांची सद्यस्थिती तपासून पाहा. शैक्षणिक इमारती, रुग्णालये तसेच वसतिगृहांच्या बांधकाम प्रकल्पांमध्ये मुंबई, नागपूर, परभणी, शिरवळ, उदगीर, वरूड, मोशींचा समावेश आहे. या कामांचे प्रगतीनिहाय अहवाल करून ही कामे गतीने करा अशा सूचना त्यांनी केल्या.

विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व इंटर्नशिप भत्ता तसेच पशुवैद्यकीय व दुग्ध तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या शुल्क संरचनेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावी. विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करणे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राबवावी, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

महापशुधन वार्ता

# दक्षिण कोरियाची डिजिटल कृषी आणि ब्लू इकॉनॉमीची गरुडभरारी

समुद्राच्या लाटांवर फुलणारी आधुनिक शेवाळ शेती, डेटा अन् आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) जोरावर चालणारी हायटेक स्मार्ट फार्म्स, आणि समुद्रातील साधनसंपत्तीतून निर्माण होणारी अब्जावधी डॉलरची जागतिक बाजारपेठ... दक्षिण कोरियाने कृषी आणि सागरी अर्थव्यवस्थेत घडवून आणलेली ही क्रांती प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी महाराष्ट्राच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने नुकताच 5 ते 12 सप्टेंबर 2026 दरम्यान दक्षिण कोरियाचा 6 दिवसांचा अभ्यास दौरा पूर्ण केला.

जागतिक बँक समूहाद्वारे, केजीजीपीएफ, केडब्ल्यूपीएफ, प्रोब्लू, अक्वाइन्व्हेस्ट व यूके इंटरनॅशनल डेव्हलपमेंटच्या सहकार्याने हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यात महाराष्ट्र शासनाच्या प्रतिनिधींनी इन्चियोन, मोक्पो, हेइनाम, वांदो, जिओन्जू, गिमजे आणि सोल या प्रमुख शहरांमधील संशोधन संस्था, स्मार्ट फार्म्स आणि उद्योगांना भेटी दिल्या.

शिष्टमंडळात मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.), महाराष्ट्र इंस्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) चे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमन मित्तल (भा.प्र.से.), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रभारी सदस्य सचिव श्री. अभय पिंपरकर, ग्रामीण जीवनोन्नती व पर्यावरण व्यवस्थापन तज्ञ श्रीमती आशना वाणी व एमआयटीआरएचे यंग प्रोफेशनल संदेश बारबोले यांचा समावेश होता.

## उत्पादनापेक्षा 'इकोसिस्टम' महत्त्वाची!


या अभ्यासातून मिळालेला सर्वांत मोठा धडा म्हणजे दक्षिण कोरियाची जागतिक बाजारातील घोडदौड ही केवळ उत्पादनाच्या प्रमाणावर अवलंबून नसून, त्यांनी उभारलेल्या भक्कम 'परिसंस्थेवर' उभारलेली आहे. लहान शेतकरी व उद्योजकांना जागतिक बाजारापर्यंत पोहोचवण्यासाठी कोरिया सरकारने उच्च प्रतीच्या बियाण्यांचे मोफत / सवलतीच्या दरात वाट, सामायिक प्रक्रिया केंद्रांच्या माध्यमातून लहान प्रक्रियादारांसाठी अत्याधुनिक चाचणी व पॅकेजिंग सुविधा, नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षणासाठी ॲक्वाकल्चर विमा योजना, तरुणांना शेतीकडे आकर्षित करण्यासाठी भाडेतत्त्वावरील स्मार्ट ग्रीनहाऊस आदी सवलतींची उपलब्धता करून दिलेली आहे.



समुद्री पिंजऱ्यांमध्ये वाढवलेले अबालोन आणि केल्प पिकाची कापणी




समुद्रातील दोरखंडांवरील केल्पची तपासणी करण्यासाठी पथकाची पाहणी




*आकृती: मोक्पो सेंटरची सागरी अन्न उद्योजकता परिसंस्था*

पृष्ठ क्र. ११





## समुद्रात फुललेले 'काळे सोने': गिम व सीवीड क्रांती

कोरियामध्ये 'गिम' (वाळवलेले खाण्यायोग्य शेवाळ/ Laver) या सीवीडला अनन्यसाधारण महत्व आहे. कोरियाने केवळ 15 वर्षांत आपल्या सीवीड निर्यातीत अफाट वाढ केली आहे. बियाणे संशोधनातील यश, हेच या वाढीचे मुख्य कारण आहे. जिओल्लानाम-डो संशोधन संस्थेने 'हेपुंग क्र. 1' हे सीवीडचे सुधारित वाण विकसित केले. यामुळे कोरियाचे एकूण उत्पादन सुमारे 1.57 लाख टनांवरून 3.53 लाख टनांपर्यंत (दुप्पट) वाढले.

- ❑ हवामान बदलावर मात: समुद्रातील वाढत्या तापमानाला पर्याय म्हणून कोरिया आता जमिनीवर इमारतींमध्ये (Land-based Smart Aquafarms) पूर्णपणे बंदिस्त वातावरणात सीवीड पिकवण्याचे तंत्रज्ञान विकसित करत आहे.
- ❑ मोक्पो मॉडेल: मोक्पो येथील मरीन फूड रिसर्च सेंटरमध्ये लघू उद्योजकांसाठी गुणवत्ता चाचणी, HACCP प्रमाणन, नवीन उत्पादनांचे संशोधन व जागतिक निर्यातीची सोय एकाच छताखाली उपलब्ध आहे. या केंद्राने एकाच वर्षात 125 लहान उद्योगांना मदत करत 15.6 दशलक्ष डॉलरची निर्यात साधली आहे.

## सीवीडचे बहुविध उपयोग: टूथपेस्ट ते पशुखाद्य!

वांदो येथील चोसून विद्यापीठाने सीवीडच्या 50 हून अधिक प्रजातींवर संशोधन करून तब्बल 36 पेटंट्स मिळवले आहेत. सीवीडचा वापर केवळ अन्नापुरता मर्यादित न ठेवता त्यापासून:

- ❖ सौंदर्यप्रसाधने व त्वचा निगा उत्पादने,
- ❖ पोटाच्या आरोग्यासाठी प्रोबायोटिक्स व आरोग्यदायी पेये,
- ❖ प्लास्टिकला पर्याय म्हणून बायो-डिग्रेडेबल पॅकेजिंग ट्रे,
- ❖ पशुधनासाठी मिथेन-मुक्त खाद्य: एफअँडडब्ल्यू (F&W) कंपनीने Asparagopsis नावाच्या लाल शेवाळापासून तयार केलेले पशुखाद्य गाई-म्हशींमधील मिथेन वायूचे उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी करते, जे हवामान बदलाशी लढण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरत आहे.

## हायटेक स्मार्ट फार्मिंग आणि 'डिजिटल शेती'

गिमजे येथील **'स्मार्ट फार्म इनोव्हेशन व्हॅली'** आणि जिओन्जू येथील **आरडीए (RDA)** या संस्थांनी कोरियाच्या डिजिटल शेतीचे दर्शन घडवले. या डिजीटल शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे एआय, ड्रोन्स आणि सेन्सर्सच्या साहाय्याने पिकांच्या गरजा ओळखून थेट शेतकऱ्यांच्या मोबाईलवर अचूक सल्ले दिले जातात.

युवकांसाठी रेंटल फार्म्स उपलब्ध करून दिले जातात, म्हणजे स्वत: ची जमीन किंवा मोठे भांडवल नसलेल्या तरुण शेतकऱ्यांना / स्टार्टअप्सना अत्याधुनिक ग्रीनहाऊस भाड्याने दिले जातात. सोल नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये महागडी वैज्ञानिक उपकरणे सर्व संशोधक व उद्योजकांना वाजवी शुल्कात वापरासाठी उपलब्ध करून दिली जातात, ज्यामुळे उपकरणांचा दुबार खर्च वाचतो.

**महाराष्ट्रासाठी पुढील दिशा:**

महाराष्ट्राला 878 किलोमीटर लांबीची समृद्ध किनारपट्टी, बलाढ्य कृषी व मत्स्य विद्यापीठे व मोठा दुग्ध व्यवसाय लाभलेला आहे. कोरियाच्या या मॉडेलच्या धर्तीवर महाराष्ट्रात खालील उपक्रम राबवणे शक्य आहे:

1. कोकण किनारपट्टीवर सीवीड शेती: पालघर ते सिंधुदुर्ग दरम्यान स्थानिक सागरी हवामानाचा अभ्यास करून सीवीड लागवडीचे पायलट प्रोजेक्ट्स सुरू करणे.
2. सीवीड सीड बँक व हॅचरी: रत्नागिरी किंवा शिरगाव येथील मत्स्य महाविद्यालयाच्या सहकार्याने उच्च दर्जाचे बियाणे पुरवणारी हॅचरी उभारणे.
3. मरिन-फूड इनोव्हेशन हब: कोकणात मोक्पोच्या धर्तीवर लहान मच्छीमार व महिला बचत गटांसाठी गुणवत्ता चाचणी व पॅकेजिंगचे सामायिक केंद्र उभारणे.
4. जलकृषी आपत्ती विमा: सागरी शेती आणि सीवीड उत्पादकांसाठी सबसिडीयुक्त विमा योजना तयार करणे.
5. पर्यावरणाला पूरक पशुखाद्य प्रयोगांना गती: गाई-म्हशींमधील मिथेन उत्सर्जन कमी करण्यासाठी सीवीड-आधारित पूरक पशुखाद्याचे दुग्ध पट्ट्यांमध्ये प्रयोग करणे.
6. तरुणांसाठी भाडेतत्त्वावरील 'स्मार्ट फार्म्स': ॲग्री-स्टार्टअप्स आणि तरुण शेतकऱ्यांसाठी डिजिटल शेती क्लस्टर्स विकसित करणे.

दक्षिण कोरियाचा हा दौरा हेच सिद्ध करतो की, जेव्हा विज्ञान, तंत्रज्ञान, सरकारी धोरणे व व्यावसायिकता एकत्र येतात, तेव्हा पारंपरिक शेती व मत्स्यव्यवसाय हा अब्जावधी रुपयांचा जागतिक उद्योग बनू शकतो. महाराष्ट्राची नैसर्गिक क्षमता लक्षात घेता, यातील काही प्रभावी संकल्पना टप्प्याटप्प्याने अमलात आणल्यास राज्यातील शेतकरी, मच्छीमार आणि ॲग्री-स्टार्टअप्सना समृद्धीचा नवा मार्ग सापडू शकेल.













# पीक अवशेषांचे संकलन व संवर्धन
# चारा टंचाईचे करुयात निर्मूलन

येत्या काळात उद्भवणाऱ्या संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्याच्या काही भागांत पावसाने दिलेल्या हुलकावणीमुळे खरीप पिकांचे नुकसान झाले असून, त्याचा थेट फटका पशुधनाच्या चाऱ्याला बसण्याची चिन्हे आहेत. हीच आव्हानात्मक परिस्थिती ओळखून, ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा 'वेळेआधीच नियोजन' या सूत्रावर भर देत संपूर्ण महाराष्ट्रात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानांतर्गत मुरघास निर्मिती, पीक अवशेषांचा पुनर्वापर, चाऱ्याची नासाडी रोखणे व पर्यायी चारा निर्मितीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण थेट पशुपालकांच्या दारापर्यंत पोहोचवले जाणार आहे. टंचाईच्या संकटावर मात करत राज्यातील पशुधन सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आखलेल्या या विशेष अभियानाचा घेतलेला हा आढावा...



डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.)
सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-32






पृष्ठ क्र. १४







### पीक अवशेषांचे संकलन, प्रक्रिया व शास्त्रोक्त साठवणूक

शेतातून पीक हाती आल्यानंतर उरणारा कडबा, भुसा, पेंढा किंवा धाटे हे केवळ 'अवशेष' नसून, टंचाईच्या काळात पशुधनासाठी तो अत्यंत महत्त्वाचा आधार ठरतात. म्हणूनच ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर व हरभरा यांसारख्या पिकांच्या काढणीनंतर त्यांचे योग्य संकलन व सुरक्षित साठवणूक करण्यावर या अभियानात विशेष भर दिला जाणार आहे. शेतातील हे अवशेष जाळून टाकणे किंवा ते उघड्यावर टाकून त्यांची नासाडी होणे रोखणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या अवशेषांची पचनक्षमता व पोषणमूल्य वाढवण्यासाठी युरिया प्रक्रियेचे प्रात्यक्षिकासह शास्त्रोक्त प्रशिक्षण पशुपालकांना दिले जाईल. तसेच पावसापासून चाऱ्याचे रक्षण करणे, योग्य आर्द्रता राखणे, बुरशी लागण्यापासून बचाव करणे व कोरड्या जागी साठवणूक कशी करावी, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित केली जातील. याशिवाय, चाऱ्याचा अपव्यय टळावा यासाठी 'कडबाकुट्टी यंत्राचा' वापर वाढवण्यास विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे.

### *मुरघास, हायड्रोपोनिक चारा व अझोला निर्मितीला प्रोत्साहन*

हिरवा चारा उपलब्ध असलेल्या भागांत मुरघास निर्मितीची विशेष मोहीम राबवली जाणार असून, कमी खर्चात व कमी वेळेत हिरव्या चाऱ्याची गरज भागवण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये हायड्रोपोनिक युनिट्स आणि अझोला बेडची प्रात्यक्षिके दाखवून पशुपालकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, सिंचनाची सोय असणाऱ्या शेतकऱ्यांना कमी पाण्यात व कमी कालावधीत येणाऱ्या चारा पिकांचे बियाणे पुरवले जाईल, तसेच धरणे व तलावांतील पाणी ओसरल्यावर मोकळ्या होणाऱ्या गाळपेरा जमिनीचा वापर चारा पेरणीसाठी करून टंचाईवर मात करण्याचे नियोजन आखण्यात आले आहे.

### गावपातळीवर प्रशिक्षण व व्यापक जनजागृती अभियान

हे अभियान केवळ कागदावर न राहता थेट प्रत्यक्ष अंमलबजावणीत यावे, यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षकांच्या माध्यमातून गावागावांत पशुपालकांचे मेळावे, बैठका व प्रत्यक्ष प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जाणार आहेत. तसेच घडीपत्रिका, माहितीपत्रके, रेडिओ, व्हॉट्सॲप समूह, डिजिटल माध्यमे आणि माहितीपर लघुपटांच्या साहाय्याने चारा साक्षरतेचा संदेश तळागाळातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवला जाईल. याशिवाय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (नागपूर) व विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ज्ञांचे तांत्रिक मार्गदर्शन या मोहिमेसाठी घेतले जाणार आहे. स्थानिक भौगोलिक परिस्थिती व गरजांचा विचार करून कमी खर्चात राबवता येणाऱ्या नावीन्यपूर्ण चारा संवर्धन उपक्रमांना चालना देणे आणि त्यांचा राज्यभरात विस्तार करणे, हे या उपक्रमाचे मुख्य सूत्र राहणार आहे.

हे अभियान केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत सुस्पष्ट जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. गावपातळीवर पशुवैद्यकीय अधिकारी आणि सहाय्यक पशुधन विकास अधिकारी प्रशिक्षणाची धुरा सांभाळतील, तर तालुका पशुसंवर्धन अधिकारी कामकाजाचा नियमित आढावा घेतील. जिल्हास्तरावर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कृती आराखडा तयार करून अंमलबजावणीवर लक्ष ठेवतील; तसेच प्रादेशिक सहआयुक्त व सहसंचालक (पशुआहार) राज्यस्तरावरून या संपूर्ण मोहिमेचे सनियंत्रण करतील. या अभियानासाठी आवश्यक खर्च विभागाकडील उपलब्ध निधीतून केला जाणार आहे.

संभाव्य टंचाईच्या छायेवर मात करण्यासाठी तातडीने पूर्वतयारी करण्याचे निर्देश पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. निसर्गाच्या लहरीपणावर मात करत पशुधन सुरक्षित ठेवणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच, राज्यातील शेतकरी व पशुपालकांनी या **'चारा साक्षरता व संवर्धन अभियानात'** उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे; उपलब्ध चाऱ्याचे योग्य जतन, पीक अवशेषांवर प्रक्रिया आणि नासाडी रोखून आपल्या पशुधनाला सकस आहार सुनिश्चित करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्या व्हॉट्सॲप चॅटबॉट व टेलिकन्सल्टेशन सेवेद्वारे ४१९८ टेलिकन्सल्टन्सी यशस्वीरीत्या पूर्ण, पशुपालकांमध्ये समाधान

**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67**

पशुपालकांना विविध पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता सहजपणे व्हावी यासाठी डिजिटल युगात एक पाऊल पुढे टाकत, आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप चॅटबॉट व ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशन सेवेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. '1962' या कॉलसेंटरच्या यशस्वी सुविधेत आता व्हॉट्सॲप चॅटबॉट व ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशनची भर पडल्यामुळे राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रणालीद्वारे 6 महिन्यात 4,198 चॅट-बेस्ड टेलिकन्सल्टन्सी पूर्ण करण्यात आल्या असून, दोन्ही सेवांना पशुपालकांकडून भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने भारत फायनान्शियल इन्क्लुजन लिमिटेड व इंडसइंड बँक यांच्या सीएसआर फंडातून पशुसंवर्धन आयुक्तालय येथे कॉल सेंटर उभारण्यात आले आहे. त्यामध्ये आता व्हॉट्सॲप चॅटबॉट व ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशन भर पडली आहे. पशुसंवर्धन विभागाच्या अहवालानुसार, व्हॉट्सॲप चॅटबॉट व ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशन सेवेच्या माध्यमातून एप्रिल 2026 ते सप्टेंबर 2026 (15 सप्टेंबरपर्यंत) या कालावधीत तब्बल 4,907 चॅटबॉट संवाद साधले गेले आहेत. यामध्ये जनावरांचे संगोपन, आहार, प्रजनन तसेच विविध आजारांवर तातडीने सल्ला देण्यात आला आहे. याशिवाय, या प्रणालीद्वारे 4,198 चॅट-बेस्ड टेलिकन्सल्टन्सी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

Google meet च्या माध्यमातून शेतकरी व पशुपालक प्रत्यक्ष video call द्वारे पशुवैद्यक तज्ज्ञांकडून पशुधनाच्या आजाराबाबत माहीती घेऊन तात्काळ उपचार घेतात. तसेच पशुधनाची पैदास, आरोग्य, चारा-चारा पिके व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना, विविध शासकीय योजना व शेळीपालन-कुक्कुटपालन-गाय-म्हैसपालन, भ्रूण प्रत्यारोपण आदींविषयी मोफत मार्गदर्शन घेतात. या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून घरबसल्या पशुतज्ज्ञांचे मार्गदर्शन, जनावरांच्या आजारांवर प्राथमिक उपचार व उपचारांचे ई-प्रिस्क्रिप्शन पशुपालकांसाठी उपलब्ध होत आहे. प्रारंभिक टप्प्यात कार्यालयीन वेळेत सुरू करण्यात आलेली ही सेवा लवकरच 24 x 7 करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत.




**ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशनचा वाढता ओघ:**

दूरस्थ भागातील पशुपालकांसाठी व्हिडिओ व ऑडिओ कॉलद्वारे तज्ज्ञ पशुवैद्यकांच्या सल्ला घेण्यासाठी ही सेवा अत्यंत प्रभावी ठरली आहे. एप्रिल ते सप्टेंबर 2026 दरम्यान एकूण 7,629 पशुधनासाठी ऑडिओ-व्हिडिओ सल्ला घेण्यात आला आहे.


यामध्ये,पशुपालकांना मिळालेला लाभ (पशुप्रजातीनिहाय):

- शेळी व मेंढ्यांसाठी सर्वाधिक 2,423 वेळा सल्ला घेण्यात आला आहे.
- पोल्ट्री/कुक्कुटपालन क्षेत्रात 4,256 पशुपालकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.
- गाय व म्हैस या पशुधनासाठी 808 वेळा तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.
- कुत्रे, मांजरे व इतर पाळीव पशु-पक्ष्यांसाठी देखील ही सेवा महत्त्वपूर्ण ठरली आहे.
- दिवसेंदिवस या सेवेला पशुपालकांचा प्रतिसाद वाढतो आहे.

पृष्ठ क्र. १६

महाराष्ट्र शासन | सत्यमेव जयते

## पशुसंवर्धन विभाग
महाराष्ट्र राज्य




आजच्या डिजिटल युगात पशुपालकांच्या दारात आधुनिक पशुवैद्यकीय सेवा पोहोचवणे हे आमचे मुख्य धोरण आहे. पशुसंवर्धन विभागाच्यावतीने सुरू करण्यात आलेला **व्हॉट्सॲप चॅटबॉट** आणि **टेलिकन्सल्टेशन** उपक्रम ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी **वरदान** ठरत आहे. अगदी दुर्गम भागातूनही केवळ एका क्लिकवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, ई-प्रिसिक्रिप्शन व जनावरांच्या उपचाराची दिशा मिळत असल्याने जनावरांचे आरोग्य राखणे अधिक सुलभ झाले आहे. या सुविधेमुळे वेळेवर उपचार व लसीकरण शक्य होत असून, राज्यातील दुग्धव्यवसाय व पशुधन समृद्धीच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. सर्व पशुपालक बांधवांनी या डिजिटल सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा.



**डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-67

पुणे जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. वासनिक यांनी '1962' कॉल सेंटरला औपचारिक भेट दिली. या भेटीदरम्यान पशुपालकांसाठी राबवल्या जाणाऱ्या आपत्कालीन पशुवैद्यकीय उपचार सेवांच्या कामकाजाची त्यांनी सविस्तर माहिती घेत पशुपालकांना घरबसल्या जलद माहिती व सेवा उपलब्ध करून देणाऱ्या 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' प्रणालीची पाहणी करून समाधान व्यक्त केले.





पशुधनाचे आरोग्य आणि रोग नियंत्रण हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आमच्या विभागाने सुरू केलेल्या ऑडिओ-व्हिडिओ टेलिकन्सल्टेशन आणि चॅटबॉट प्रणालीच्या माध्यमातून एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या अल्प काळातच ७ हजारांहून अधिक जनावरांना तातडीचा वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन मिळवून दिले आहे. लाळ्या खुरकूत, **आंत्र**विषार, घटसर्प यांसारख्या संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी नियमित लसीकरण, जंतनाशके व योग्य आहार व्यवस्थापनाबाबत पशुतज्ज्ञांचे मार्गदर्शन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे. ही यंत्रणा आपत्कालीन स्थितीत शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. पशुआरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी आमचा विभाग कटिबद्ध आहे.'

**डॉ. शैलेश केंडे,**
सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुआरोग्य व रोगनियंत्रण), महाराष्ट्र राज्य, पुणे-67

जनावरांच्या लसीकरण व आरोग्यावर विशेष भर:या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून केवळ औषधोपचारच नव्हे, तर जनावरांचे लाळ्या खुरकूत (एफएमडी), आंत्रविषार (ईटीव्ही), घटसर्प (एचएस), पीपीआर यांसारख्या घातक आजारांपासून संरक्षण करण्यासाठी नियमित जंतनाशक देणे व योग्य वेळेवर लसीकरण करण्याचे मोलाचे मार्गदर्शन पशुतज्ज्ञांकडून देण्यात येत आहे. तसेच आवश्यकतेनुसार नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय, पॉलीक्लिनिक किंवा फिरत्या पशुवैद्यकीय पथकाकडे (मोबाईल व्हेटर्नरी युनिट - 1962) पाठवून वेळेवर उपचार सुनिश्चित केले जात आहेत. या उपक्रमाचे संनियंत्रण सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. दत्तात्रय गाडे हे यशस्वीपणे करीत आहेत.

पृष्ठ क्र. १७




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67:** राज्यातील काही भागांमध्ये पर्जन्यमानातील तूट व खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम विचारात घेता, आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, संभाव्य टंचाई निर्माण होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक आणि पूर्वतयारीची उपाययोजना म्हणून पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात "चारा साक्षरता व संवर्धन अभियान" व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी यासंदर्भात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. हे अभियान केवळ जनजागृतीपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, पशुपालक प्रशिक्षण, उपलब्ध चाऱ्याचे जतन व प्रक्रिया, चारा उत्पादन आणि स्थानिक पातळीवरील कृतींवर आधारित असेल. ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर, हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा, धाटे यांसारख्या पीक अवशेषांची नासाडी अथवा ते जाळणे पूर्णपणे टाळून; त्यांचे संकलन, सुरक्षित साठवणूक, प्रक्रिया आणि पोषणमूल्यवर्धन यावर भर दिला जाणार आहे.




चारा साक्षरता व संवर्धन अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गावस्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी व प्रशिक्षणाची जबाबदारी पशुवैद्यकीय अधिकारी व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली असून, तालुका पशुसंवर्धन अधिकारी हे तालुक्यातील सर्व संस्थांमार्फत अंमलबजावणीचा नियमित आढावा घेतील. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्ह्यासाठी कृती आराखडा तयार करणे व प्रत्यक्ष पडताळणी करणे, प्रादेशिक सहआयुक्त व सहसंचालक (पशुआहार) यांनी राज्य व विभाग स्तरावर प्रगतीचे विश्लेषण करणे व आवश्यक मार्गदर्शक सूचना देणे आदी जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

### अभियानांतर्गत अनिवार्यपणे राबवावयाच्या 13 प्रमुख बाबी:

1. गावनिहाय पीक अवशेषांची माहिती घेऊन पावसापासून संरक्षण, योग्य आर्द्रता, बुरशी प्रतिबंध व कोरड्या जागेवरील साठवणुकीबाबत प्रात्यक्षिके देणे.
2. निकृष्ट व वाळलेल्या चाऱ्याची उपयोगिता वाढवण्यासाठी शिफारस केलेल्या प्रक्रिया पद्धतींची प्रात्यक्षिके आयोजित करणे.
3. कडबा व पेंढ्यावर युरिया प्रक्रियेचे गावस्तरावर प्रात्यक्षिक देऊन शास्त्रोक्त प्रशिक्षण देणे.
4. चाऱ्याची नासाडी रोखण्यासाठी कडबाकुट्टी यंत्राचा वापर करून कुट्टी केलेला चारा पशुधनाला देणे.
5. हिरवा चारा उपलब्ध असलेल्या भागात जास्तीत जास्त मुरघास तयार करण्यासाठी विशेष मोहीम राबवणे.
6. पशुवैद्यकीय दवाखान्यात हायड्रोपोनिक युनिट विकसित करून कमी खर्चात हिरवा चारा निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखवणे.
7. पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अझोला बेड तयार करून पशुआहारातील वापराबद्दल मार्गदर्शन करणे.
8. सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना कमी कालावधीत व कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देणे.
9. धरणे व तलावातील पाणी ओसरल्यानंतर उपलब्ध गाळपेरा क्षेत्रात चारा पेरणीचे नियोजन करणे.
10. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून गावागावांत पशुपालक बैठका व मेळावे आयोजित करणे.
11. घडीपत्रिका, माहितीपत्रके, रेडिओ, डिजिटल माध्यमे, व्हॉट्सॲप ग्रुप्स आणि लघुपटांद्वारे व्यापक जनजागृती करणे.
12. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे.
13. स्थानिक गरजांनुसार कमी खर्चातील नावीन्यपूर्ण चारा संवर्धन उपक्रम राबवून त्यांचा विस्तार करणे.

पृष्ठ क्र. १८



# लोकर संकलन, मुल्यवर्धन व नव्या उपयोगांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन; मेंढपाळांच्या अडचणींवरही सखोल विचारमंथन

रांजणी, (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली):

महाराष्ट्रातील लोकर अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन व मेंढपाळ बांधवांना लोकर व्यवसायातून अधिक आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने सेंटर फॉर पेस्टोरलिझम, नवी दिल्ली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रांजणी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र येथे 'मेंढपाळ चर्चासत्र' आयोजित करण्यात आले. बुधवार, दि. 30 सप्टेंबर 2026 रोजी झालेल्या या चर्चासत्रास सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर व पुणे जिल्ह्यांतील मेंढपाळ बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक डॉ. विक्रम साळवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेंटर फॉर पेस्टोरलिझमचे रमेश भट्टी, वीणा सिंग, यश केतकर व नंदिनी जयस्वाल उपस्थित होते. तसेच महामंडळाचे सहाय्यक संचालक डॉ. सचिन टेकाडे, देवानंद लोदे, यशवंत क्रांती संघटनेचे अध्यक्ष मा. संजय वाघमोडे, माणदेशी फाऊंडेशनचे शेळीसखी प्रतिनिधी, मित्रा संस्थेचे प्रतिनिधी, मेंढपाळ आर्मीचे अध्यक्ष व कार्यकर्ते, महुद प्रक्षेत्राचे प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. पोपट कारंडे व रांजणी प्रक्षेत्राचे प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. सचिन दडस यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. रांजणी प्रक्षेत्राचे प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. सचिन दडस यांनी उपस्थित मान्यवर व मेंढपाळ बांधवांचे स्वागत करून चर्चासत्राची पार्श्वभूमी व उद्देश स्पष्ट केला. यावेळी महामंडळाचे सहाय्यक संचालक डॉ. सचिन टेकाडे यांनी मृतप्राय होत चाललेल्या लोकर व्यवसायाला पुनर्जीवित करण्यासाठीच्या उपाययोजना, तसेच पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या वस्तूंच्या पर्याय म्हणून लोकरीचा वापर कशा प्रकारे वाढविता येईल, याबाबत चित्रफितीच्या माध्यमातून सखोल मार्गदर्शन केले. सेंटर फॉर पेस्टोरलिझमचे रमेश भट्टी यांनी दैनंदिन जीवनातील लोकरीचे महत्त्व, लोकरीचे विविध फायदे तसेच लोकरीला अधिक चांगला दर्जा व बाजारमूल्य मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर मार्गदर्शन केले.



पृष्ठ क्र. १९

वीणा सिंग यांनी लोकरीचा वापर केवळ जेन व घोंगडीपुरता मर्यादित न ठेवता ऑटोमोबाईल क्षेत्रासह विविध उद्योगांमध्ये कशाप्रकारे करता येऊ शकतो, याबाबत माहिती दिली. मशीनद्वारे लोकर कातरणीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. याबाबत डॉ. सचिन दडस यांनी मेंढपाळांना सविस्तर माहिती दिली. दुपारच्या सत्रात मेंढपाळ बांधवांच्या सहभागातून लोकर संकलन, विक्री, उपयोग, मूल्यवर्धन व व्यवसायातील अडचणी यावर सखोल चर्चा झाली. यावेळी यशवंत क्रांती संघटनेचे अध्यक्ष संजय वाघमोडे तसेच मेंढपाळ आर्मीचे अध्यक्ष अंकुश मुडे यांनी लोकर व्यवसायाशी संबंधित मेंढपाळ बांधवांचे विविध प्रश्न व अडचणी मांडल्या.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महुद प्रक्षेत्राचे प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. पोपट कारंडे यांनी महामंडळाच्या विविध प्रक्षेत्रांच्या माध्यमातून लोकर संकलनासाठी मेंढपाळ बांधवांना कशा प्रकारे सहकार्य करण्यात येते, याबाबत माहिती दिली. लोकर संकलन, मूल्यवर्धन, आधुनिक तंत्रज्ञान व लोकरीच्या नव्या बाजारपेठांचा शोध यामुळे महाराष्ट्रातील मेंढपाळांच्या पारंपरिक व्यवसायाला नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे चर्चासत्र महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विक्रम साळवे यांनी महामंडळ हे मेंढपाळ व शासन यांच्यातील दुवा म्हणून काम करते, असे सांगितले. लोकर कशा पद्धतीने संकलित करता येईल, आगामी लोकर उपयोगिता केंद्रासाठी आवश्यक असलेली लोकर, तसेच या प्रक्रियेतून मेंढपाळ बांधवांना होणारे संभाव्य फायदे याबाबत त्यांनी माहिती दिली. मेंढपाळांच्या लोकर तसेच इतर विविध प्रश्न व अडचणी सोडविण्यासाठी महामंडळाच्या माध्यमातून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असेही डॉ. विक्रम साळवे यांनी सांगितले.



# संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी 'चारा साक्षरता अभियान'





नांदेड : संभाव्य दुष्काळी परिस्थितीत उद्‌भवू शकणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी तसेच पशुधनाला सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात 'चारा साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी, नांदेड यांच्या सहकार्याने मौजे सायाळ, ता. लोहा, येथे नाला बांधावर व गाळपेरा क्षेत्रात बहुवार्षिक नेपियर चारा पिकाची लागवड करण्यात आली. यावेळी पशुपालकांसाठी निकृष्ट चारा सकस करण्याचे व मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

या उपक्रमास मा. जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. विलास नरुटे, उपविभागीय अधिकारी, कंधार; श्री. अनिल कांबळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, नांदेड; डॉ. सखाराम खुणे, जिल्हा उपआयुक्त (प. व दु.), नांदेड; डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त (प. व दु.); श्री. विठ्ठल परळीकर, तहसीलदार, लोहा; डॉ. अंकुश पाटील, डॉ. रंगनाथ पुरी, डॉ. दीप्ती चव्हाण, डॉ. उमेश धोंड, डॉ. बालाजी जाधव, श्री. भागवत परगे व श्री. बजरंग ढगे यांच्यासह पशुसंवर्धन, जलसंधारण, महसूल, कृषी व पंचायत समिती विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांनी वैरण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. संभाव्य चारा टंचाई लक्षात घेता उपलब्ध वाळलेल्या व निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, कडबा कुट्टीचा वापर वाढविणे तसेच हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करून त्याची योग्य साठवण करणे यावर त्यांनी भर दिला.

पृष्ठ क्र. २०




बीड: विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत पाटोदा येथे आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांना विविध घटकांचा लाभ वितरित करताना जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितीन रहमान व अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे. याप्रसंगी शेतकऱ्यांना चारा नियोजन, मुरघास निर्मिती आणि निकृष्ट चाऱ्याचे सकस चाऱ्यात रूपांतर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





लातूर: मौजे भुसनी येथील पशुपालकांना निकृष्ट चारा सकस बनवण्यासाठी वाळलेल्या वैरणीवर युरिया प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवताना तज्ज्ञ. यावेळी उपस्थितांना दुष्काळी परिस्थितीतील चारा नियोजन व पशुधन विमा योजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






पुणे, दि. 9 ऑक्टोबर 2026 : जागतिक अंडी दिनाचे औचित्य साधून शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, पुणे येथे शुक्रवार, दि.9 ऑक्टोबर 2026 रोजी मा. आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जागतिक अंडी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. देवेंद्र जाधव, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजेश वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शासकीय कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्र, खडकी, पुणे येथील 75 प्रशिक्षणार्थी, परभणी व उदगीर येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयांचे इंटर्नशिपचे विद्यार्थी, उपायुक्त कार्यालय, जिल्हा कृत्रिम रेतन कार्यालय व मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंड्यांचे पोषणमूल्य व आरोग्यदायी महत्त्व

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्राचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक औताडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी मानवी आहारातील अंड्याचे स्थान, त्यातील उच्च दर्जाची प्रथिने, जीवनसत्त्वे व आवश्यक पोषक घटक यावर प्रकाश टाकला. संतुलित आहारासाठी अंड्यांचा समावेश कसा अनिवार्य आहे, हे स्पष्ट करतानाच त्यांनी समाजात अंड्यांविषयी पसरलेले गैरसमज दूर केले व अंड्यांपासून बनणाऱ्या विविध पौष्टिक पदार्थांची माहिती दिली. तसेच, पौष्टिकतेबाबत व्यापक जनजागृती करून अंडी सेवनाला प्रोत्साहन देणे काळाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

### प्रमाणपत्र वितरण व कुक्कुट पिल्लांचे वाटप

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना मा. आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्णत्वाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच, यावेळी कुक्कुटपालकांना एक दिवसीय कुक्कुट पिल्लांचे प्रातिनिधिक वाटपही करण्यात आले.

### प्रशिक्षणार्थींचे मनोगत

निवडक प्रशिक्षणार्थींनी मान्यवरांसमोर आपले अनुभव व्यक्त केले. शासकीय प्रशिक्षणामुळे कुक्कुटपालन व्यवसायातील तांत्रिक ज्ञान आत्मसात करणे सोपे झाले असून, स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. हे प्रशिक्षण भविष्यातील स्वयंरोजगारासाठी अत्यंत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.







मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी उपस्थितांना जागतिक अंडी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कुक्कुटपालन हा ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी पूरक उत्पन्न, स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरणाची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देणारा व्यवसाय असल्याचे त्यांनी नमूद केले. कुक्कुटपालनाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असून, या क्षेत्रातील पशुपालक व नवउद्योजकांसाठी शासनामार्फत विविध योजना व उपक्रम निरंतर राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.




पशुपालकांनी कुक्कुटपालनाच्या उपलब्ध योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून कुक्कुटपालन व्यवसाय अधिक शास्त्रीय, आर्थिकदृष्ट्या सक्षम व व्यावसायिक पद्धतीने विकसित करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र आणि शासकीय कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून कुक्कुटपालकांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण व व्यवसायाभिमुख संधी उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

जागतिक अंडी दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून अंड्यांचे पोषणमूल्य, मानवी आरोग्यातील त्यांचे महत्त्व, अंड्यांविषयीचे गैरसमज दूर करण्याची आवश्यकता व कुक्कुटपालन व्यवसायातील रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी यांविषयी जनजागृती करण्यात आली. पोषण सुरक्षा, अंडी उत्पादनवाढ व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी कुक्कुटपालन व्यवसायाचे महत्त्व अधोरेखित करीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. डॉ दिपाली क्षीरसागर यांनी उपस्थित मान्यवरांचे, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थींचे आभार मानले.



शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, पुणे येथे शुक्रवार, दि.9 ऑक्टोबर 2026 रोजी जागतिक अंडी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कुक्कुटपालन प्रशिक्षणार्थी समवेत मा. आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.). सोबत डॉ. शैलेश केंडे, डॉ. देवेंद्र जाधव, डॉ. राजेश वासनिक, डॉ. दीपक औताडे, डॉ. दीपाली क्षीरसागर आदी अधिकारी व कर्मचारी.

पृष्ठ क्र. २२

महापशुधन वार्ता

# जागतिक अंडी दिन : पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन

**पुणे:** ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये प्रथिनयुक्त आहाराचे महत्त्व रुजवण्यासाठी आणि कुपोषणमुक्तीच्या दिशेने ठोस पाऊल उचलण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राज्यभरात 'जागतिक अंडी दिन' अत्यंत उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्ताने राज्यातील विविध जिल्ह्यांमधील पशुवैद्यकीय संस्थाच्या वतीने क्षेत्रीय स्तरावर प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना उकडलेल्या अंड्यांचे वाटप, आहारातील अंड्यांच्या पौष्टिकतेविषयी मार्गदर्शन, तसेच जनजागृतीपर सभांचे आयोजन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य, गरोदर व स्तनदा मातांचा आहार व दैनंदिन जीवनशैलीत प्रथिनांची गरज यावर भर देत पशुसंवर्धन विभागाने या उपक्रमाच्या माध्यमातून समाजोपयोगी संदेश दिला.



पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्था.) शाळगाव यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रायगाव व अंगणवाडी, रायगाव, ता. कडेगाव, जि. सांगली येथे विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करून संतुलित व पौष्टिक आहाराबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.



देवराष्ट्रे, ता. कडेगाव (जि. सांगली) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या वतीने अंगणवाडी क्रमांक 6 येथे अंडी वाटप करण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका अर्चना शिरतोडे व मदतनीस मनिषा कुरळे उपस्थित होत्या.





तालुका पशुचिकित्सालय चिखलदरा, जिल्हा अमरावती अंतर्गत आदिवासी गाव खटकली येथील अंगणवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना अंड्याचे मानवी आहारातील महत्व व पोषण मूल्ये याबाबत माहिती देण्यात आली.

पृष्ठ क्र. २४



**नांदेड:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमठाणा, ता. भोकर, येथे आयोजित कार्यक्रमास जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रविणकुमार घुले, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार, डॉ. दिक्षाली मोरे, डॉ. उमेश सोनटक्के तसेच पशुधन पर्यवेक्षक श्री. केदार देशमुख, श्री. रविकुमार बबिलवाड आणि श्री. विजय विभुते यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माजगाव, केंद्र पासली, ता. राजगड, जि. पुणे. येथे अंडी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




**हिंगोली:** जागतिक अंडी दिनानिमित्त अंगणवाडी जवळा बाजार येथे अंडी वाटप करून अंडी दिन साजरा करण्यात आला.



रत्नागिरी: राजापूर तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय अंतर्गत पशुचिकित्सालय, आडीवरे (वाडापेठ), येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाडापेठ, जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक केंद्र शाळा वाडीखूर्द व रेंडीरेडे येथे प्राथमिक शाळेतील १५० मुलांना उकडलेले अंडी वाटप करण्यात आले.






**हासेगाववाडी:** जागतिक अंडी दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हासेगाववाडी, औसा, लातूर येथे अंडी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. गणेश निटूरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अंडी हा सर्वाधिक जैविक मूल्य असलेला अन्नपदार्थ आहे. अंड्यांच्या नियमित सेवनामुळे स्नायूंची मजबुती वाढते, डोळ्यांचे आरोग्य सुधारते, हाडे मजबूत राहण्यास मदत होते तसेच शरीराला ऊर्जा आणि आवश्यक पोषण मिळते.

पृष्ठ क्र. २५








परभणी: पशुवैद्यकीय दवाखाना, एरंडेश्वर द्वारा अंगणवाडी, एरंडेश्वर येथे बालकांना अंडी वाटप करण्यात आले.




गोंदिया: जि. प. उच्च माध्यमिक शाळा, कुडवा येथे विद्यार्थ्यांमध्ये अंड्याचे पोषणमूल्य व आरोग्यविषयक महत्त्व याबाबत जनजागृती करुन अंड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. जे. के. तिटमे, सहाय्यक आयुक्त जि. प. स. चि. डॉ. एस. पी. गायगवळी , पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एच. शेंद्रे , सहाय्यक पशुधन विकास अधिकारी कु. पी. डी. सतदेवे तसेच कर्मचारी उपस्थित होते.



सातारा : अंडी वाटप व आहारातील महत्त्व सांगण्यात आले.



गडचिरोली: जागतिक अंडी दिनानिमित्ताने पशुवैद्यकीय चिकित्सालय मेंढा ता. जिल्हा गडचिरोली अंतर्गत मेंढा येथील अंगणवाडी केंद्रामधील मुलांना अंडी वाटप व मार्गदर्शन करण्यात आले.



जागतिक अंडी दिनानिमित्ताने पशुवैद्यकीय चिकित्सालय येवली ता. जि, गडचिरोली अंतर्गत येवली येथील अंगणवाडी केंद्र मधील मुलांना अंडी वाटप व मार्गदर्शन करण्यात आले.




देवगड (रत्नागिरी): विद्यार्थ्यांना अंडी वाटप व आहारातील महत्व याबाबत जनजागृती करण्यात आली.

महापशुधन वार्ता

# जळगाव : चारा साक्षरता व संवर्धन अभियानाचा पहूर येथून शुभारंभ




**जळगाव:** अल निनोच्या वातावरणीय बदलामुळे उद्‌भवणाऱ्या संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याकरिता पशुसंवर्धन विभाग, जळगाव मार्फत पशुपालकांमध्ये चारा साक्षरता व संवर्धनाबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानास पशुवैद्यकीय चिकित्सालय, पहूर, ता. जामनेर येथून शुभारंभ करण्यात आला.

डॉ. प्रदीप झोड, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जळगाव यांनी मार्गदर्शन केले व सदर अभियानाची सविस्तर माहिती दिली. यात प्रामुख्याने त्यांनी चारा टंचाई निर्माण होण्यापुर्वीच्या प्रतिबंधात्मक व पूर्वतयारीच्या उपाययोजना, पिक अवशेषांचे जतन, सुरक्षित चारा साठवणूक, मूरघास निर्मिती, अझोला उत्पादन, हायड्रोफोनिक चारा व स्थानिक चारा उत्पादन वाढविणे याविषयीची माहिती यावेळी दिली.

सदर कार्यक्रमात डॉ. स्वप्नजा लोखंडे, यांनी निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. रामदास जाधव यांनी कडबा कुट्टी व चारा बियाणे याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने परिसरातील मागणी केलेल्या एकूण 51 पशुपालकांना, त्यांच्या पशुधनाला चारा उत्पादनासाठी बियाणे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पहूर पशुवैद्यकीय दवाखान्याचे संस्थाप्रमुख डॉ. श्रीकांत व्यवहारे यांनी केले. यावेळी त्यांनी चारा टंचाईच्या काळात पशुपालकांनी उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर करावा, तसेच भविष्यातील चारा गरज लक्षात घेऊन चारा पिकांची लागवड व नियोजन करावे, असे आवाहन केले.












**अमरावती:** जिल्ह्यात पशुवैद्यकीय चिकित्सालय नांदगाव पेठ येथे चारा साक्षरता अभियान जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर (भा. प्र. से.) यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. याप्रसंगी मुरघास मार्गदर्शन व निकृष्ट चारा सकस करणेबाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक, हायड्रोपोनिक चारा निर्मिती मार्गदर्शन व प्रात्यक्षिक, पशुधन विमा योजना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प योजनेत चारा बियाणे अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली.



**माढा (सोलापूर):** पुणे विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. समीर बोरकर यांनी सोलापूर जिल्हा दौऱ्यादरम्यान दुष्काळप्रवण माढा तालुक्यातील चारा टंचाईचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी चारा साक्षरता व संवर्धन अभियानांतर्गत आयोजित प्रात्यक्षिक व मार्गदर्शन शिबिरास भेट देऊन त्यांनी उपस्थित पशुपालकांशी संवाद साधला. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाच्या आहाराचे व्यवस्थापन करण्यासाठी मुरघास निर्मिती, निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया करून तो सकस बनवणे, हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आणि पिकांच्या उर्वरित अवशेषांचा (क्रॉप रेसिड्यू) प्रभावी वापर कसा करावा, याविषयी त्यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन करून प्रात्यक्षिके दाखवली. यावेळी तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या (भारत) एएमआर व झुनोसिस तज्ज्ञ डॉ. ज्योती मिश्री यांची रोग अन्वेषण प्रयोगशाळेला भेट



**रोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे:**

सीमापार प्राण्यांचे आजार (TADs), नव्याने उद्भवणारे संसर्गजन्य रोग (EIDs) व प्राणीजन्य रोग (Zoonoses) यांवर नियंत्रण व माहितीच्या देवाणघेवाणीसाठी देशभरात 19 प्रयोगशाळांचे 'इंटझ' (INTEZ) जाळे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत रोग अन्वेषण विभाग, पुणे या संस्थेची निवड करण्यात आली असून, प्रतिजैविक प्रतिरोधावर (AMR) संशोधनासाठी प्रयोगशाळेचे सक्षमीकरण व श्रेणीसुधारणा करण्यात आली आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या 'अन्न आणि कृषी संघटने'कडून (FAO) 4 अत्याधुनिक उपकरणे व 11 प्रकारचे आवश्यक साहित्य पुरवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, FAO (भारत) च्या AMR व झुनोसिस तज्ज्ञ डॉ. ज्योती मिश्री यांनी नुकतीच पुणे प्रयोगशाळेस भेट देऊन पुरवठा केलेल्या उपकरणांची तपासणी केली व समाधान व्यक्त केले. या पाहणीदरम्यान रोग अन्वेषण विभागाचे सहआयुक्त डॉ. नानासाहेब सोनवणे उपस्थित होते.

# कडबा कडाडला...! दर तब्बल ६000 रुपये प्रती शेकडा

**पाटोदा (बीड):** तालुक्यात यंदा अपुऱ्या पावसामुळे ज्वारीच्या वाळलेल्या कडब्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. बाजारात चाऱ्याची आवक घटल्याने कडब्याचे दर तब्बल ६,000 रुपये प्रती शेकडा (जवळजवळ २० रुपये प्रती किलो) या विक्रमी स्तरावर पोहोचले आहेत. गेल्या वर्षींच्या तुलनेत कर्नाटकच्या अलमट्टी क्षेत्रातून होणारा चारा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्याने व्यापारी व पुरवठादार अडचणीत आले आहेत. वाढत्या महागड्या चाऱ्यामुळे तालुक्यातील पशुपालकांसमोर जनावरांच्या संगोपनाबाब प्रश्न निर्माण झाल्याने पशुसंवर्धन विभाग चारा साक्षरता व संवर्धनाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहे.



पृष्ठ क्र. २९




**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे- 67**


सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यभरात 'ऍनिमल बर्थ कंट्रोल (एबीसी) रूल'ची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभागामार्फत प्रभावीपणे सुरू आहे. दि. 23 सप्टेंबर 2026 पर्यंत राज्यभरात 22,855 भटक्या कुत्र्यांवर नसबंदीची शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, 2 लाख 1 हजार 517 कुत्र्यांना व 56 हजार 744 इतर प्राण्यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे.

या संपूर्ण मोहिमेत श्वान नसबंदी व रेबीज लसीकरण या दोन्ही आघाड्यांवर पुणे जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ऍनिमल बर्थ कंट्रोल रूलच्या अंमलबजावणीत एकट्या पुणे जिल्ह्यात 15,696 श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले असून, हे प्रमाण राज्यातील एकूण शस्त्रक्रियांच्या 68 टक्के आहे. या यादीत सोलापूर (2,428 शस्त्रक्रिया) दुसऱ्या, तर अहिल्यानगर (1,985 शस्त्रक्रिया) तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातील एकूण नसबंदी शस्त्रक्रियांपैकी तब्बल 88 टक्क्यांहून अधिक वाटा या तीन जिल्ह्यांचा आहे. राज्यात प्राण्यांमधील रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी एप्रिल-2026 पासून मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत एकूण 2 लाख 58 हजार 261 प्राण्यांचे यशस्वी लसीकरण करण्यात आले आहे. यात कुत्र्यांच्या लसीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. महसुली विभागांचा विचार करता, पुणे विभागाने 59 हजार 835 प्राण्यांच्या लसीकरणासह राज्यात अग्रस्थान पटकावले असून, त्यापाठोपाठ नाशिक विभागात 40 हजार 396 प्राण्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यांमध्ये नाशिक (16,728), यवतमाळ (14,756) व पुणे (13,795) या जिल्ह्यांनी कुत्र्यांच्या लसीकरणात उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. दरम्यान, नागरिक आणि प्राण्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाकडून लसीकरण मोहीम अधिक तीव्र वेगाने राबवली जात आहे.




**विशेष प्रशिक्षणामुळे मोहिमेला गती:** ही मोहीम अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे व राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 23 डिसें. 2025 रोजी औंध (पुणे) येथील 'सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल'मध्ये उजळणी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. राज्यातील 39 पशुवैद्यकीय शल्यचिकित्सकांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षित डॉक्टरांनी पुढे आपापल्या जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केले, ज्यामुळे राज्यभरात ही मोहीम प्रभावीपणे राबवणे शक्य होत आहे.




पृष्ठ क्र. ३०



# जागतिक रेबीज प्रतिबंधक दिन: राज्यभरात लसीकरणावर भर;

'जागतिक रेबीज प्रतिबंधक दिना'चे औचित्य साधून महाराष्ट्रभरात रेबीजमुक्त समाजासाठी व्यापक लसीकरण व शाळांमध्ये जनजागृती मोहीम राबवण्यात आली. राज्यभरातील स्थानिक महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने भटक्या आणि पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाला प्राधान्य देण्यात येत आहे.

पशुसंवर्धन विभागाचे नागरिकांना आवाहन: रेबीज हा घातक आजार असला तरी वेळेत लसीकरण केल्यास 100% प्रतिबंध करता येतो. नागरिकांनी आपल्या पाळीव प्राण्यांचे नियमित लसीकरण करावे आणि भटक्या प्राण्यांच्या लसीकरण मोहिमेत स्थानिक प्रशासनाला सहकार्य करावे. राज्य सरकारने 2030 पर्यंत 'रेबीजमुक्त भारत' हे ध्येय गाठण्यासाठी अशा स्वरूपाच्या लसीकरण मोहिमा सातत्याने सुरू ठेवण्याचा संकल्प जाहीर केला आहे.








# 28 सप्टेंबर जागतिक रेबीज प्रतिबंधक दिन




खेड (जि. रत्नागिरी) : येथे जागतिक रेबीज प्रतिबंधक दिनानिमित्त 30 हून अधिक पाळीव श्वानांना लसीकरण करण्यात आले.




जळगाव: जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय येथे अँटी रेबीज लसीकरण शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन जळगाव मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करिष्मा नायर यांच्या हस्ते करण्यात आले.




छत्रपती संभाजीनगर: तालुका पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय खुलताबाद येथे रेबीज प्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच उपस्थित लोकांना रेबीज रोगासंबंधित माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.





गडचिरोली: पशुसंवर्धन विभाग, गडचिरोली तर्फे आयोजित 'जागतिक रेबीज दिन' कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास गाडे (भा.प्र.से.), उपस्थित होते. यावेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे श्री. गाडे यांनी कौतुक केले.

पृष्ठ क्र. ३२



नांदेड: दि. 26 सप्टेंबर 2026 रोजी मौजे सायाळ, ता. लोहा, जि. नांदेड येथे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैरण विकास योजनेची पाहणी करण्यात आली. मा. श्री. महेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री. रत्नाकर ढगे यांच्या शेतातील चारा लागवडीची व पशुधनाची पाहणी करत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी करण्यात आलेल्या वैरण व्यवस्थापनाची माहिती घेण्यात आली. यावेळी डॉ. सखाराम खुणे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, श्री. दत्तात्रय कळसाइत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. विलास नरोटे, उपविभागीय अधिकारी, कंधार, डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, श्रीमती सुनिता वानखेडे, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती लोहा, श्री. राहुल रावसाहेब, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेड, तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



नांदेड: जिल्ह्यात अल्प पर्जन्यमानामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, अपेक्षेपेक्षा चारा उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी आगामी काळात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय व कार्यक्षम वापर करून पशुधनास सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मा. जिल्हाधिकारी, नांदेड व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात व्यापक स्वरूपात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज गोवंश सुधार प्रकल्प, मौजे घुंगराळा, ता. नायगाव, जि. नांदेड येथे दि. 02 ऑक्टोबर 2026 रोजी 'निकृष्ट चारा सकस करणे' या विषयावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये उपलब्ध सोयाबीन कुटारावर युरिया व मोलासेस (काकवी) प्रक्रिया करून निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पाचकता व रुचकरता वाढविण्याची शास्त्रीय पद्धत पशुपालकांना दाखविण्यात आली. तसेच उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन व योग्य व्यवस्थापन करून चारा टंचाईच्या काळात पशुधनासाठी त्याचा प्रभावी व काटकसरीने वापर कसा करता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास श्री. महेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड; श्री. परीक्षित यादव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड; डॉ. सखाराम खुणे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय; श्री. अमित राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा), श्री. मयूर अंदेलवाड, प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन, डॉ. निलकुमार ऐतवडे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी व परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पृष्ठ क्र. ३३

# गोजातीय प्रजनन उत्कृष्टता पुरस्कार 2026-27

**(Bovine Breeding Excellence Awards:2026-27)**



राज्यातील गोजातीय प्रजनन सेवांचा विकास, गुणवत्ता व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणाऱ्या संस्था/ व्यक्तींच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार **आहेत.**

## महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण यांचा उपक्रम
## ☆ उत्कृष्टतेला सन्मान - गुणवत्तेला प्रोत्साहन ☆

### उद्दिष्टे

1. नोंदणीकृत संस्थांना दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देणे.
2. गोजातीय प्रजनन कार्यात गुणवत्तावाढ, पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे.
3. संस्थांमध्ये SOP पालन व रेकॉर्डिंग पद्धती सुधारणे.
4. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना सन्मानित करून इतरांना प्रेरणा देणे.

### निवड कालावधी
सन २०२६-२७
(१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत)

### निवड निकष (Evaluation Criteria)
आयुक्त पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती मार्फत निश्चित करण्यात येतील. १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत NDLM व MBBRA पोर्टल वर नोंदविलेले कामकाज

### अर्जाची कार्यपद्धती
online अर्ज मागविण्यात येतील. MBBRA च्या पोर्टल वर तसेच, NDLM पोर्टल वर ३१ मार्च २०२७ अखेर झालेल्या कामकाजाची नोंद घेण्यात येईल.

### पुरस्कार
वर नमुद केल्यानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येईल.

## पुरस्कार संरचना (गटानुसार)

### 1 उत्कृष्ट रेत केंद्र (Semen Stations)
- सर्वाधिक Straws Production
- सर्वाधिक attached Semen Banks
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- CMU Gradation
- NDLM Online Reporting Records

**१ पुरस्कार**

### 2 उत्कृष्ट कार्य करणारे कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकार (AI Service Providers)
- सर्वाधिक नोंदणीकृत AI Technicians
- सर्वाधिक कृत्रिम रेतन संख्या
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- NDLM Online Reporting Records

**१ पुरस्कार**

### 3 उत्कृष्ट भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा (ET/IVF Laboratory)
- सर्वाधिक Embryos Production
- सर्वाधिक ET Calves Born
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- Lab Facility
- NDLM Online Reporting Records

**१ पुरस्कार**

### 4 उत्कृष्ट रेत बँक (Semen Banks)
- सर्वाधिक नोंदणीकृत AI Technicians on NDLM
- Storage Facility
- Equipment
- Online Reporting Records

**संख्या ३**
प्रथम, द्वितीय आणि तृतीय

### 5 जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त
- सर्वाधिक कृत्रिम रेतन संख्या
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- NDLM Online Reporting Records

**संख्या ३**
प्रथम, द्वितीय आणि तृतीय

### 6 सहायक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (ब्रीडर्स)
- सर्वाधिक कृत्रिम रेतन संख्या
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- NDLM Online Reporting Records

**संख्या ३**
प्रथम, द्वितीय आणि तृतीय

### 7 उत्कृष्ट कार्य करणारे नोंदणीकृत कृत्रिम रेतन तंत्रज्ञ (AI Technicians)
- सर्वाधिक कृत्रिम रेतन संख्या
- सर्वाधिक कन्सेप्शन दर
- NDLM Online Reporting Records

**संख्या ३**
प्रथम, द्वितीय आणि तृतीय

### 8 उत्कृष्ट कृत्रिम रेतन प्रशिक्षण केंद्र (Artificial Insemination Training Institute)
- Practical Training Facility
- Animal Shed
- Attendance Percentage
- Laboratory Facility
- Classroom Facility
- सर्वाधिक नोंदणीकृत AI Technicians

**संख्या ३**
प्रथम, द्वितीय आणि तृतीय

"गोजातीय प्रजनन उत्कृष्टता पुरस्कार २०२६-२७ (Bovine Breeding Excellence Award: 2026-27) वितरण मा. मंत्री महोदय, मा. सचिव यांच्या हस्ते एका समारंभामध्ये करण्याचा प्रयत्न राहील. सर्व संबंधितांना याबाबत प्रसिद्धी देवून माहिती देण्यात यावी जेणेकरून राज्यातील गोजातीय प्रजनन कार्यात स्पर्धात्मकता निर्माण होईल आणि याद्वारे गुणवत्तावाढ करता येईल."

# महापशुधन वार्ता

## देशोन्नती

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वैरण व्यवस्थापनावर भर !

**सायाळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्याकडून वैरण विकास योजनेची पाहणी !!**

गणपत जामगे

**नांदेड :** दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी वर्षभर पुरेसा चारा उपलब्ध राहण्यासाठी शेतकरी व

माहिती घेतली.

चारा बचतीसाठी कडबाकुट्टीचा वापर

दुष्काळाच्या काळात उपलब्ध चारा जास्तीत जास्त काळ टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी कडबाकुट्टी यंत्राचा वापर करून चाऱ्याची नासाडी कमी करावी, पिकांचे अवशेष योग्य पद्धतीने वापरावेत आणि निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढवावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

सायाळ परिसरात वैरण विकास योजनेच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या चारा लागवडीसह पशुधन व्यवस्थापनाची पाहणी करताना शेतकऱ्यांशीही संवाद साधण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी चारा, पाणी आणि पशुपोषणाचे नियोजन एकत्रितपणे करण्यावर भर देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

या पाहणीवेळी जिल्हा पशुसंवर्धन व

## लोकमत

# निकृष्ट चाऱ्यापासून सकस चारा निर्मितीचे प्रात्यक्षिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** सध्या नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या संकटात सापडले आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून, यावर मात करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी आणि पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग (जिल्हा परिषद, नांदेड) यांच्या संयुक्त विद्यमाने केव्हीकेच्या सायाळ प्रक्षेत्रावर चारा साक्षरता अभियान राबवण्यात आले. या अभियानाअंतर्गत 'निकृष्ट चाऱ्यापासून सकस चारा निर्मिती' या कृती प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या प्रात्यक्षिकादरम्यान शेतात उपलब्ध असणाऱ्या सोयाबीन भुसकटावर युरिया, मीठ आणि गूळ यांची शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करून त्याचा पौष्टिक व पाचक चारा कसा तयार करावा, याचे प्रत्यक्ष सादरीकरण पशुपालकांना करून दाखवण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी उपस्थित राहून पशुपालकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सध्याच्या करीण आणि टंचाईच्या काळात उपलब्ध असणारा

### जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

या प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी येथील अझोला निर्मिती, हायड्रोपोनिक्स चारा, जैविक निविष्ठा निर्मिती, परसातील कुक्कुटपालन आणि शेततळ्यातील मत्स्यपालन यांसारख्या विविध एकात्मिक शेती प्रात्यक्षिकांची प्रत्यक्ष पाहणी केली.

केव्हीके पोखर्णीतर्फे राबवण्यात येत असलेल्या एकात्मिक शेती पद्धती आणि टंचाईच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या दुष्काळ निवारण तंत्रज्ञान विस्तार कार्यक्रमाबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे शेतीपुरक वेगळे

## दैनिक विष्णुपूरी एक्सप्रेस

दि.03 ऑक्टोबर 2026 शनिवार

# निकृष्ट चाऱ्याला मिळणार सकसतेची जोड;रामतीर्थात चारा साक्षरता अभियानांतर्गत प्रशिक्षण संपन्न

**शंकरनगर/तोडे पाटील**

शंकरनगरनदिड जिल्हात अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि आगामी काळात उद्भवू शकणारी चारा टंचाई लक्षात घेता, पशुपालकांना उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने अधिक परिणामकारक वापर करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'चारा साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रामतीर्थ, ता. बिलोली येथे 'निकृष्ट चारा सकस करणे' या विषयावर प्रत्यक्ष प्रशिक्षण व हायड्रोपोनिक्स तसेच उपलब्ध निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करण्यासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज आहे.'शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्हातील प्रत्येक गरजू पशुपालकापर्यंत पोहोचविण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित प्रशासनाला दिल्या.

सोयाबीन व हरभरा कुटारावर युरिया-मोलासेस प्रक्रियारामतीर्थ येथील गुणवंत शिवाजीराव देगलूरे यांच्या पशुपालन प्रक्षेत्रावर आयोजित या प्रशिक्षणात उपलब्ध सोयाबीन कुटार व हरभरा कुटारावर युरिया अधिकारी, सहाय्यक आयुक्त डॉ.प्रवीणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त डॉ. गौतम खिल्लारे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बोरकर, डॉ. उदगीरे, कृषी सहायक कोकणे, मंडलाधिकारी कल्पना मुंडकर, तलाठी विजय पाटील, ग्रामसेवक श्रीपाद जाधव, सरपंच प्रतिनिधी तोडे राजेंद्र पाटील,श्याम तोडे,उपसरपंच बालाजी पाटील, बळवंत पाटील वाडेकर, शिवाजी पाटील देगलुरे, माधवराव घाटोळे, आनंदीर स्वामी, राजेंद्र जहागिरदार, गुणवंत देगलूरे, सुनील देगलूरे,

# 'निकृष्ट चारा सकस करण्या'वर घुंगराळ्यात प्रात्यक्षिक

## जिल्ह्यामध्ये चारा साक्षरता अभियान सुरू; पशुपालकांना केले जातेय मार्गदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

नांदेड, ता. ३ : अल्प पर्जन्यमानामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, चारा उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करून

मोलासेस (काकवी) प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता, पाचकता अ... वाढविण्याची शास्त्रीय... प्रत्यक्ष दाखविण्य... जिल्हा परिषदेने... महेश पाटील... अधिकारी प...




### चारा साठवणुकीवर मार्गदर्शन

■ उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन, साठवणूक व व्यवस्थापन करून टंचाईच्या

## गोदातीर समाचार

epaper.godateer.com
03 Oct 2026 - Page 6

# उपलब्ध चारा सकस करण्य...

## 'चारा साक्षरता अभियानास' प्रारंभ

### चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

नांदेड (प्रतिनिधी)- जिल्हात ...ल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या ...काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ...ागामी काळात संभाव्य चारा ...वाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी ...त्लाधिकारी राहुल कर्डिले यांनी ...वर्धन व व्यवस्थापन करण्यावर भर ...ला आहे. त्यांच्या संकल्पनेतून ...त्यात 'चारा साक्षरता अभियान' ...पक स्वरूपात राबविण्यात येत ...सून, या अभियानाची सुरुवात आज ...लोली तालुक्यातील मौजे रामतीर्थ ...ये करण्यात आली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले ...च्या उपस्थितीत प्रगतिशील शेतकरी ...पशुपालक गुणवंत शिवाजीराव ...देगलूरकर यांच्या प्रक्षेत्रावर 'निकृष्ट चारा सकस करणे' या विषयावर प्रत्यक्ष ...त्यक्षिक घेण्यात आले. संभाव्य चारा ...ाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा ...पिकापिक कार्यक्षम वापर करून पशुधनास आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या अभियानातून शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**सोयाबीन व हरभरा कुटारावर युरिया-काकवी प्रक्रिया**

रामतीर्थ येथील प्रात्यक्षिकात उपलब्ध सोयाबीन कुटार व हरभरा कुटारावर युरिया व मोलासेस (काकवी) प्रक्रिया करण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष दाखविण्यात आली. या प्रक्रियेमुळे उपलब्ध निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पाचकता व रुचकरता वाढविण्याच्या पद्धतीची माहिती पशुपालकांना देण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीत नवीन चारा उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असल्याने उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन करणे, त्याची साठवणूक करणे आणि उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे. याबाबतही या वेळी शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**चारा टंचाईच्या काळात शास्त्रीय व्यवस्थापनावर भर**

चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची पौष्टिकता वाढवून त्याचा प्रभावी वापर केल्यास पशुधनासाठी आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देता येतो. त्यामुळे पशुपालकांनी उपलब्ध चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन व संवर्धन करण्यासोबतच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार चारा प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करावा, हा संदेश या प्रात्यक्षिकातून देण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'चारा साक्षरता अभियान' अंतर्गत जिल्हातील शेतकरी व पशुपालकांना उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर, चारा संवर्धन, प्रक्रिया व व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुधनाचे पोषण अबाधित ठेवण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून जनजागृती व प्रात्यक्षिकांवर भर देण्यात येत आहे.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार काळभाईत, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माध्यमांनी घेतलेली दखल

## नवराष्ट्र

Nanded | 05 October 2026 | Page 1

## ...ारता अभियान' : नेपियर लागवड, मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक

# चारा टंचाईपूर्वीच प्रशासनाची तयारी

### अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

▶ नांदेड (वा.) दुष्काळी परिस्थितीच्या संभाव्य पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन आतापासूनच सुरू करण्यात आले आहे. चारा टंचाई निर्माण होण्यापूर्वीच त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन, कृषी, जलसंधारण, महसूल, पंचायत समिती तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून जिल्हात 'चारा साक्षरता अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.



पशुधनासाठी वर्षभर सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी, नांदेड यांच्या सहकार्याने सायाळ, ता. लोहा येथे नाला बांधावरील तसेच गाळपेरा क्षेत्रात बहुवार्षिक नेपियर चारा पिकाची लागवड करण्यात आली.

यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरुटे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, तहसीलदार विठ्ठल परळीकर, डॉ. अंकुश पाटील, डॉ. रंगनाथ पुरी, डॉ. दीपी चव्हाण, डॉ. उमेश धोंड, डॉ. बालाजी जाधव, भागवत परगे, बजरंग ढगे यांच्यासह पशुसंवर्धन, जलसंधारण, महसूल, कृषी व पंचायत समिती विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

epaper.navarashtra.com

सकाळ

# दुष्काळात पशुधनासाठी मुरघास ठरणार आधार

## उसाचे क्षेत्र घटल्याने चिंता; वाळव्यात दीड लाख पशुधनासाठी नियोजन आवश्यक

■ पोपट पाटील : सकाळ वृत्तसेवा

**ईश्वरपूर, ता. ३ : दीड लाखांहून अधिक पशुधन असलेल्या वाळवा तालुक्यात यंदा दुष्काळाची झळ केवळ पिकांपुरती मर्यादित राहणार नसून त्याचा थेट परिणाम पशुधनावर होण्याची शक्यता आहे. पिकांचे अवशेष, हिरवा चारा आणि पाण्याची उपलब्धता घटल्याने आगामी काळात चारा टंचाईचे संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रशासनासह पशुपालकांनी आतापासूनच नियोजन करण्याची गरज आहे. उपलब्ध चाऱ्यापासून तयार केलेला मुरघास पशुपालकांसाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे.**



वाळवा तालुक्यात दूध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून मोठ्या अधिक जनावरे आहेत. तालुक्यात ऊस हे प्रमुख नगदी पीक असल्याने

वाळवा तालुक्यात पशुपालकांना २१ टन चारा बियाणे वाटप केले आहे. त्यातून साधारण १२ हजार टन चारा उपलब्ध होणार आहे. पशुपालकांनी शिल्लक चाऱ्याचा मुरघास तयार करून ठेवावा व चारा टंचाईच्या काळात त्याचा वापर करावा.

**- डॉ. राजीव चंदनशिवे,** तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी

त्यापासून मुरघास तयार करून ठेवावा. दुधाळ जनावरांसाठी मुरघासाचा चारा ऐन टंचाईच्या काळात उपयोगी ठरू शकतो. पाण्याला प्राधान्य देत शेती पंपांवरील व चारा पिकांनाही त्याचा फटका बसत

### चारा पिकांकडे दुर्लक्ष

- पाणी उपलब्ध झाल्यानंतर तालुक्यात उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे पूर्वीप्रमाणे शेतातील काही क्षेत्र चारा पिकांसाठी राखून ठेवण्याची पद्धत कमी झाली. परिणामी चारा पिकांची उपलब्धता घटली आहे.

### २०१९ पशुगणना

- संकरित गायी : ४७,३६२
- म्हशी : ७३,२९
- शेळ्या : १७,२४७
- मेंढ्या : ७,२०२

सकाळ

## चाराटंचाईपूर्वी चारा साठवणुकीवर भर

कडबा, पेंढा, भुसा जाळण्याऐवजी साठवणूक करण्याचे आदेश

पुणे, ता. ८ : पावसातील तूट आणि खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम यामुळे आगामी काळात चाराटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी टंचाई निर्माण झाल्यानंतर चारा शोधण्याऐवजी उपलब्ध पिकांच्या अवशेषांची आतापासूनच साठवणूक करण्याचा निर्णय पशुसंवर्धन विभागाने घेतला आहे. कडबा, पेंढा, भुसा आणि धाटे यांसारखे अवशेष जाळण्याऐवजी त्यांचे संकलन, सुरक्षित साठवणूक आणि प्रक्रिया करून पशुधनाच्या चाऱ्यासाठी उपयोग करण्यावर पशुसंवर्धनकडून भर दिला जाणार आहे.

राज्यामध्ये 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविण्यात येणार आहे. ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर, हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा आणि धाटे यांची नासाडी किंवा जाळणे टाळून त्यांचे संकलन, सुरक्षित साठवणूक, प्रक्रिया आणि पोषणमूल्यवर्धन केले जाणार आहे. संभाव्य चाराटंचाईवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना पशुसंवर्धन विभागाने दिल्या आहेत. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त

पुरोगामी विचाराचे **एकमत**

जनजागृती | टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी कर्डिले या

## उपलब्ध चारा सकस करण्यासाठी 'चारा स

नांदेड : प्रतिनिधी

जिल्ह्यात अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात संभाव्य चारा टंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपलब्ध चाऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन व व्यवस्थापन करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात 'चारा साक्षरता अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असून, या अभियानाची सुरुवात बिलोली तालुक्यातील मौजे रामतीर्थ येथे करण्यात आली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत प्रगतिशील शेतकरी व पशुपालक सुगवंत शिवाजीराव देशमुरे यांच्या प्रक्षेत्रावर 'निकृष्ट चारा सकस करणे' या विषयावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. संभाव्य चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करून पशुधनास आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या अभियानातून शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

रामतीर्थ येथील प्रात्यक्षिकात उपलब्ध खोगवीन कुटार व हरभरा कुटारावर युरिया व गोलासेस (काकवी) प्रक्रिया करण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष दाखविण्यात आली. या प्रक्रियेमुळे उपलब्ध निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पाचकता व रुचकरता वाढविण्याच्या पद्धतीची माहिती पशुपालकांना देण्यात आली. बदलत्या परिस्थितीत नवीन चारा उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असल्याने उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन करणे, त्याची साठवणूक करणे आणि उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे. याबाबतही या वेळी शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**शास्त्रीय व्यवस्थापनावर भर**

'चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची पौष्टिकता वाढवून त्याचा प्रभावी वापर केल्यास पशुधनासाठी आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देता येतो. त्यामुळे पशुपालकांनी उपलब्ध चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन व संवर्धन करण्यावरोबरच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार चारा प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करावा, हा संदेश या प्रात्यक्षिकातून देण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या चारा साक्षरता अभियान अंतर्गत जिल्ह्यातील शेतकरी व पशुपालकांना उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर,

## चारा टंचाईवर प्रतिबंधात्मक पाऊल



राज्यातील काही भागांमध्ये पर्जन्यमानातील तूट व खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम विचारात घता, आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य टंचाई निर्माण होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक व पूर्वतयारीच्या उपाययोजना म्हणून पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.स.) यांनी यासंदर्भात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांना मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

हे अभियान कवळ जनजागृतीपुरत मर्यादित न ठवता प्रत्यक्ष प्रात्यक्षिक, पशुपालक प्रशिक्षण, उपलब्ध चाऱ्याच जतन व प्रक्रिया, चारा उत्पादन आणि स्थानिक पातळीवरील कृतीवर आधारित असल. ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर, हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा व धाट यांसारख्या पीक अवशांची नासाडी अथवा त जाळणा पूर्णपण टाळून त्यांच संकलन, सुरक्षित साठवणूक, प्रक्रिया आणि पोषणमूल्यवर्धन यावर भर दिला जाणार आहे.गावनिहाय पीक अवशांची माहिती भऊन पावसापासून संरक्षण, योग्य आर्द्रता, तुरणी प्रतिबंध आणि कोरड्या जागतील साठवणुकीवावत प्रात्यक्षिक दण्यात यणार आहत. निकृष्ट व वाळलल्या चाऱ्याची उपयोगिता वाढविण्यासाठी विविध प्रक्रिया पद्धतींच प्रशिक्षण दिल जाणार असून, कडबा व पेंढ्यावर युरिया प्रक्रिया करण्याच गावस्तरावर प्रात्यक्षिकही आयोजित कल जाणार आह. चाऱ्याची नासाडी रोखण्यासाठी कडबाकुट्टी यंत्राचा वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आह.

हिरवा चारा उपलब्ध असलल्या भागात मुरघास तयार करण्यासाठी विशष मोहीम राबविण्यात यईल.पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्य हायड्रोपोनिक युनिट विकसित करून कमी खर्चात हिरवा चारा निर्मितीच प्रात्यक्षिक दाखविण्यात यणार आह. पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अशोला वड तयार करून त्याच्या पशुआहारातील वापरावाबत मार्गदर्शन कल जाईल. सिंचन सुविधा असलल्या शतकऱ्यांना कमी कालावधीत व कमी पाण्यात यणाऱ्या चारा पिकांच वियाण उपलब्ध करून दण्यात यणार आह. भरण व तलावातील पाणी आटल्यानंतर उपलब्ध गाळापरा अंशात चारा परणीच नियोजन कल जाणार आह. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून गावगावांत पशुपालक बैठका व मळाव आयोजित कल जातील. पडीपत्रिका, माहितीपत्रक, रडिओ, डिजिटल माध्यम, व्हट्सअॅप गट आणि लघुपटांद्वार व्यापक जनजागृती करण्यात यणार आह. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तसच पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ज्ञांच मार्गदर्शन घण्यात यणार असून, स्थानिक गरजनुसार कमी खर्चातील नाबीन्यपूर्ण चारा संवर्धन उपक्रम राबवून त्यांचा विस्तार करण्यावरही भर दिला जाणार आह.अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहत.

दिनेश जाधव
वरिष्ठ उपसंपादक, नाशिक

गावस्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी व प्रशिक्षणाची जबाबदारी पशुवैद्यकीय अधिकारी व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आह. तालुका पशुसंवर्धन अधिकारी तालुक्यातील सर्व संस्थांमार्फत अंमलबजावणीचा नियमित आढावा घतील. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्ह्यासाठी कृती आराखडा तयार करून प्रत्यक्ष पडताळणी करतील, तर प्रादेशिक सहआयुक्त व सहसंचालक (पशुआहार) राज्य व विभाग स्तरावर प्रगतीच विहलपण करून आवश्यक मार्गदर्शक सूचना दतील. या उपक्रमासाठी लागणारा निधी विभागाकडील उपलब्ध निधीतून खर्च करण्यास मान्यता दण्यात आली आह.

टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पूर्वतयारीच्या उपाययोजना तातडीन राबवाव्यात, अस निर्दश पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिल आहत. पशुवैद्यकीय अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक गावगावांत जाऊन पशुपालकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दणार आहत. टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना शोधण्यापक्षा टंचाईपूर्वीच उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करण अधिक मस्त्यपाक आह. राज्यातील सर्व शतकरी व पशुपालकांनी या अभियानात उत्स्फूर्तपण सहभागी होऊन आपल्या पशुधनासाठी उपलब्ध चारा सुरक्षित करावा, तसच गरी पिकांच्या शिल्लक अवशपावर प्रक्रिया करून सकस चारा निर्मितीला प्राधान्य द्याव, अस आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीन करण्यात आल आह.

# जिल्ह्यात चारा टंचाई टाळण्यासाठी दुष्काळी भागासाठी पथदर्शी

# 'चारा साक्षरता अभियानाचा 'कर्डिले प्रयोग'

वार्ताहर ■ लोहा

दुष्काळाची भीषणता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिल्ह्यातील विविध भागात जाऊन शेतकरी, पशुपालकांशी ते थेट संवाद साधत आहेत. येत्या काळात चारा-पाण्याची टंचाई टाळण्यासाठी त्यांनी 'चारा साक्षरता अभियान' हाती घेतले आहे. हा प्रयोग राज्यातील दुष्काळी भागासाठी पथदर्शी ठरणार आहे.

लोहा तालुक्यातील मौजे सायाळ येथे जिल्हा जलसंधारण विभागाच्या सहकार्याने रत्नाकर ढगे यांच्या शेतातील नाला बांध व गाळपेरा क्षेत्रात बहुवार्षिक नेपियर चारा पिकाची लागवड करण्यात आली. यावेळी निकृष्ट चारा सकस करण्याची शास्त्रीय प्रक्रिया व मुरघास

### वर्षभर चारा उपलब्ध राहण्यासाठी नियोजन करावे



प्रशासकीय पातळीवर विविध क्षेत्रात साक्षरता अभियान राबवली जातात, मात्र पशुसंवर्धनासाठी तेही दुष्काळी काळात 'चारा साक्षरता अभियान' ही शेतकरी-पशुपालकांसाठी उपयुक्त संकल्पना [illegible] यांनी मांडली आहे. चारा उत्पादन, संवर्ध [illegible] व निकृष्ट चारा सकस करण्याबाबत शे [illegible] अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. [illegible] वापर करून वर्षभर चारा उपलब्ध राहील यासाठी समन्व [illegible] सांगितले. हा प्रयोग राज्यातील दुष्काळी भागासाठी प [illegible]

### बांधावर जाऊन संवादं

'चारा साक्षरता' अंतर्गत नाला बांधावर नेपियर लागवड, मुरघास निर्मिती व कडबा कुट्टी प्रशिक्षणावर भर दिला जात आहे. पशुसंवर्धन, कृषी, जलसंधारण, महसूल व पंचायत समिती विभागांच्या समन्वयातून हे अभियान जिल्हाभर राबवले जाणार आहे.

निर्मितीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरुटे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, तहसी [illegible] पाटी [illegible] यांच्यासह अ [illegible] उपस्थित होते. [illegible] सांगितले की, वाळलेल्या व निकृष्ट चाऱ्याची [illegible] ा वाढवणे, कडबा कुट्टीचा प्रभावी वाप [illegible] हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करू [illegible] ाठवणूक करणे आवश्यक आहे. उपलब्ध [illegible] जलसोत व गाळपेरा क्षेत्राचा वापर करू [illegible] आतापासूनच नियोजन करावे.



# महापशुधन वार्ता

आधुनिक केसरी
08 Oct 2026
https://www.adhunikkesari.com/epaper/news/98374/6ac67690d6326

## पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कृषी अवशेषांच्या औद्योगिक वापरावर निर्बंध

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी आवश्यक असलेल्या पिकांच्या अवशेषांचा अनावश्यक औद्योगिक वापर, मोठ्या प्रमाणातील खरेदी व वाहतुकीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्बंध घातले आहेत. त्याबाबतचे आदेश ७ ऑक्टोबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहेत.

सन २०२६ च्या खरीप हंगामात Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदखेड व मुखेड वगळता उर्वरित १४ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे. जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

**पिकांचे अवशेष प्रक्रिया करून सकस चारा निर्मितीवर भर**

दुष्काळी परिस्थितीत जिल्ह्यात 'चारा साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत उपलब्ध सोयाबीन, गहू, ज्वारी, हरभरा, तूर, उसाचे पाचट, उसाचा चोथा आदी पिकांच्या अवशेषांवर प्रक्रिया करून त्यापासून सकस व पशुधनासाठी उपयुक्त चारा तयार करण्यावर भर देण्यात येत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये बायोकोल, बायोमास तसेच अन्य औद्योगिक प्रक्रियांसाठी सोयाबीनचे कुटार, वाळलेला कडबा, चारा, उसाचे पाचट, उसाचा चोथा व इतर कृषी अवशेष मोठ्या प्रमाणात खरेदी करून इंधन म्हणून वापरले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

**चारा टंचाई टाळण्यासाठी प्रशासनाचा निर्णय**

दुष्काळी परिस्थितीत हेच कृषी अवशेष प्रक्रिया करून पशुधनासाठी अत्यंत उपयुक्त चारा म्हणून वापरता येतात. त्यामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वापर झाल्यास जिल्ह्यातील पशुपालकांना आगामी काळात चारा टंचाईचा सामना करावा लागू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पशुधनासाठी आवश्यक कृषी अवशेषांचा अनावश्यक औद्योगिक वापर तसेच मोठ्या प्रमाणातील खरेदी व वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

महाराष्ट्र वैरण (नियंत्रित नियंत्रक) आदेश २००१ मधील तरतुदींनुसार जिल्ह्यात उपलब्ध असलेला हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्याबाहेर विक्री अथवा वाहतूक करण्यास यापूर्वीच बंदी घालण्यात आली आहे. त्याच धर्तीवर सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी उपलब्ध कृषी अवशेषांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने सदर आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत. सदर आदेश ७ ऑक्टोबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार आहेत.



नवराष्ट्र
Latur | 05 October 2026 | Page 1

वाढविण्यासह त्यांच्या प्रवासाचा वेळ कमी करण्याची मागणी करण्यात आली. लातूर ते विकासाशी संबंधित काही मागण्या मध्य रेल्वे आणि दक्षिण मध्य रेल्वे या दोन्ही सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**'चारा-पाणी नियोजन'** ● शाश्वत ग्रामीण विकास, पशुधन व्यवस्थापनावर मार्गदर्शन

## दुष्काळात 'सायलेज बँक' प्रभावी उपाय

▸ लातूर शहर प्रतिनिधी. दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या चारा व पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर, योग्य साठवणूक तसेच उपलब्ध सिंचन व पाण्याचा कार्यक्षम वापर करून हिरवा चारा उत्पादित करणे आवश्यक आहे. ग्रामस्तरावर मुरघास अर्थात 'सायलेज बँक' उभारल्यास दुष्काळी काळात पशुधनासाठी चाऱ्याची शाश्वत उपलब्धता निर्माण करता येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी केले.महात्मा गांधी जयंतीनिमित्त गंगापूर येथे ग्रामोन्नती मित्र मंडळ व केएमबीएल प्रकल्प यांच्या सहकार्याने आणि एमएसडी पशु आरोग्यचे प्रक्षेत्र व्यवस्थापक कृणाल घुंगार्डे यांच्या पुढाकाराने 'शाश्वत ग्रामीण विकास व दुष्काळी परिस्थितीत पशुधन व्यवस्थापन' या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. भिकाने मार्गदर्शक म्हणून बोलत होते.पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे आवश्यक असून, शेततळ्यांच्या माध्यमातून पाण्याची साठवणूक करावी, असे डॉ. भिकाने यांनी सांगितले. पारंपरिक बंदिस्त गोठ्यांमध्ये जनावरे तसेच गोठा धुण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर होतो. त्यामुळे शक्य तेथे मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करावा. यामुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच जनावरांवरील उष्णते करण्यास मदत होईल, असे त्यांनी




### गंगापूरला शाश्वत ऊर्जा निर्मितीचे रोल मॉडेल बनवावे

गंगापूरला शाश्वत ऊर्जा निर्मितीचे 'रोल मॉडेल' बनवावेग्रामस्तरावर स्वावलंबी ऊर्जा निर्मितीला चालना देण्यासाठी नाशिक येथील प्रेमांकुर सामाजिक संस्थेचे हेमंत भामरे यांनी सीएसआर निधीतून गंगापूर येथे बायोगॅस युनिट कार्यान्वित केले आहे. कार्यक्रमादरम्यान या युनिटचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविण्यात आले.यावेळी डॉ. भिकाने म्हणाले की, शेण व मलमूत्रापासून बायोगॅस निर्मितीचा हा उपक्रम गंगापूरसाठी आदर्श ठरावा.

ग्रामस्थांनी या तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून गंगापूरला शाश्वत ऊर्जा व्यवस्थापनाचे रोल मॉडेल बनवावे.उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष सन्मानकार्यक्रमादरम्यान गंगापूरचे सुपुत्र आणि राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात उल्लेखनीय कार्य करणारे ३,५०० जनावरांमध्ये कृत्रिम रेतन करून अनुवंश सुधारणा कार्यात योगदान देणारे श्री. सचिन फुटाणे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन ग्रामोन्नती मित्रमंडळाचे अध्यक्ष अशोक सूर्यवंशी यांनी केले, तर आभार डॉ. शिवाजी क्षीरसागर, सहा. आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांनी मानले.कार्यक्रमास सहायक आयुक्त डॉ. राघवेंद्र पडगिलवार, गंगापूरच्या सरपंच उषाबाई गायकवाड, माजी सरपंच बाबुराव खंदाडे, उपसरपंच डॉ. सतीश कानडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, बबूसाहेब शिंदे, सुधाकर शिंदे, पशुधन पर्यवेक्षक सुनील लांडगे, ग्रामोन्नती मित्र मंडळाचे पदाधिकारी तसेच

विदर्भ मतदार

लोकमत

## पडवीत ४६ श्वानांचे रेबीज लसीकरण

**जागतिक रेबीज दिनाचे निमित्त, दौंड पंचायत समितीचा उपक्रम**

लोकमत न्यूज नेटवर्क

**भांडगाव :** जागतिक रेबीज दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग, पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती,



जागतिक रेबीज दिनानिमित्त पडवी (ता. दौ चिकित्सालयात श्वानांचे लसीकरण करता

उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये रेबीज प्रतिबंधाबाबत जागरूकता वाढण्यास

## चारा व्यवस्थापनासाठी कुट्टी मशीन, मूरघास निर्मितीचा अवलंब करा

**पशुसंवर्धन विभागाचे आवाहन; पशुपालकांना मार्गदर्शन**



विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज नागठाणा व वांगी येथील शेतशिवारांना भेट देऊन विविध शेतीपूरक व पशुपालन प्रकल्पांची णी केली. यावेळी उपस्थित क्यांना चारा व्यवस्थापन तसेच याची नासाडी रोखण्यासाठी वयाच्या प्रक्रियांबाबत मार्गदर्शन ण्यात आले.

नागठाणा येथील प्रगतिशील की रवींद्र दिलीप सोळंके यांच्या ाला भेट देऊन गोशाळा, गांडूळ खत र्मिती प्रकल्प आणि चारा पिकांची पाहणी करण्यात आली. तसेच वांगी येथील शेतकरी गोपाल ठाकरे व अक्षय ठाकरे यांच्या शेतातील जनावरांचा गोठा, पाण्याची उपलब्धता, गांडूळ खत निर्मिती आणि हिरवा चारा व्यवस्थापनाची पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. तुषार बावणे, डॉ. योगिराज वंजारी, मुख्यमंत्री फेलो कृष्णकांत चव्हाण आणि नागठाणा पशुवैद्यकीय दवाखान्याचे ज्ञानेश्वर इढोळे यांनी प्रत्यक्ष प्रक्षेत्रांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला.




# माध्यमांनी घेतलेली दखल

तरुण भारत
आपले नागपूर | 2026-09-30 | Page- 2
epaper.tarunbharat.net

**जिल्ह्यात एकाच दिवशी १६१० श्वान, मांजरींचे लसीकरण**

## रेबिजमुक्त नागपूरचा संकल्प!

**'स्ट्रॉंगर टूगेदर' थीमअंतर्गत पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम; पाळीव व भटक्या प्राण्यांना मिळाले सुरक्षा कवच**



आकडेवारी एका नजरेत

**एकूण लसीकरण झालेले प्राणी :** १६१०
**पाळीव श्वान (लसीकरण) :** १४३७
**भटके श्वान (लसीकरण) :** १२७
**मांजरी (लसीकरण) :** ४६

**प्राथमिक उपचार :** रेबीज हा एक गंभीर विषाणूजन्य रोग आहे. एकदा लक्षणे दिसायला लागली की यातून वाचण्याची शक्यता जवळजवळ 0% असते. म्हणून प्रतिबंधच सर्वात महत्वाचा आहे. कुत्रा चावल्यास जखम साबणाने १५ मिनिटे धुणे हाच सर्वात प्रभावी उपाय असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. ■

**नागपूर, २९ सप्टेंबर**

रेबीजमुक्त जगाच्या संकल्पासाठी नागपूर जिल्ह्यात 'जागतिक रेबीज दिन' मोठ्या उत्साहात आणि प्रभावीपणे पाळण्यात आला.

पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. नितीन फुके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांमध्ये विशेष लसीकरण शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

'स्ट्रॉंगर टुगेदर' ही यंदाची अधिकृत थीम डोळ्यांसमोर ठेवून राबवलेल्या या मोहिमेत तब्बल १६१० श्वान व मांजरींना रेबीज प्रतिबंधक लस टोचण्यात आली.

या व्यापक मोहिमेदरम्यान एकूण १४३७ पाळीव श्वान, १२७ भटके श्वानांसह ४६ मांजरींना अँटी रेबीजचे लसीकरण करण्यात आले.

विशेषतः जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, नागपूर येथे ५२ श्वान व १२ मांजरींना लस देण्यात आली. या मोहिमेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, सहआयुक्त डॉ. सतीश राजू व डॉ. नितीन फुके प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच भिवापूर तालुक्यात शाळांमधील विद्यार्थ्यांना रेबीजविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## चे कवच; नागपुरात १,६१० प्राण्यांचे लसीकरण

**पशुसंवर्धन विभागाचे शिबिर; भिवापूरमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**



टूगेदर' अर्थात रेबीजमुक्त जग' ही र, आंतरविभागीय हभाग आणि 'वन ोनातून रेबीज ण्याला आला आहे. बीजच्या बहुतांश ा चाऱ्यामुळे होत संवर्धन विभागाने ोकरणावर विशेष

लुक्यात शालेय करण्यात आले. जिल्हा आले. यावेळी श्वान पालकांनाही बीज आजाराची पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, रेबीजपासून बचावासाठी आवश्यक णि प्रतिबंधात्मक नागपूर येथे ५२ श्वान आणि १२ काळजी व लसीकरणाचे महत्त्व त मार्गदर्शन मांजरींचे लसीकरण करण्यात समजावून सांगण्यात आले. या

कुत्रा किंवा अन्य संशयित प्राण्याने चावा घेतल्यास जखम तातडीने वाहत्या पाण्याने आणि साबणाने किमान १५ मिनिटे धुवावी. त्यानंतर विलंब न करता वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेऊन आवश्यक प्रतिबंधात्मक उपचार व रेबीजविरोधी लस घ्यावी. जखमेवर हळद, चुना वासारखे पदार्थ लावू नयेत. पाळीव श्वान आणि मांजरींचे नियमित लसीकरण करून घेणे हाच रेबीज प्रतिबंधाचा महत्त्वाचा उपाय असल्याचे पशुसंवर्धन विभागाने स्पष्ट केले.

कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. सतीश राजू, आणि जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. नितीन फुके उपस्थित होते.

रेबीज हा विषाणूजन्य आणि अत्यंत गंभीर आजार असून, लक्षणे दिसू लागल्यानंतर तो जवळजवळ नेहमीच जीवघेणा ठरतो. संक्रमित कुत्रा, मांजर, माकड किंवा अन्य सस्तन प्राण्याच्या चाव्यामुळे अथवा संक्रमित प्राण्याची लाळ जखम, ओरखडा, डोळे, नाक किंवा तोंडाच्या संपर्कात आल्याने संसर्ग होऊ शकतो. मात्र, रेबीज हवेतून किंवा साध्या स्पर्शातून पसरत नाही.

02/10/2026| Page No: 2| City
lokshahivarta.co.in
Powered by - ePaperwale | 9702476117

पृष्ठ क्र. ३७




सध्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिना सुरु आहे. पावसाळा संपत आला असून हिवाळ्याची चाहूल लागत आहे. हवेतील अति-दमटपणा व वाढते तापमान यांमुळे सध्या गोठ्यांमध्ये बाह्य परजीवींचा, विशेषतः गोचीड, उवा आणि पिसवांचा प्रादुर्भाव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. गोचीड फक्त जनावरांचे रक्त शोषून घेत नाहीत, तर ते त्यांच्या रक्तामध्ये 'बबेसिया' व 'थायलेरिया' नावाचे घातक प्रोटोझोआ (एकपेशीय परजीवी) सोडतात. या परजीवीमुळे जास्त दूध देणाऱ्या संकरित (क्रॉसब्रीड) गाई व म्हशींमध्ये 'गोचीड ताप' हा जीवघेणा आजार होतो. वेळीच उपचार न केल्यास जनावर दगावण्याची शक्यता 90 टक्क्यांपर्यंत असते.


डॉ. परमेश्वर परिहार
(पशुवैद्यकीय अधिकारी)


डॉ. नाना सोनावणे
(सहआयुक्त पशुसंवर्धन)

भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी पश्चिम विभागीय संदर्भीय पशुरोग निदान प्रयोगशाळा / रोग अन्वेषण विभाग, पुणे, मो. क्र. 9028163594

### आजार ओळखण्याची प्रमुख लक्षणे:

गोचीड चावल्यानंतर साधारणपणे 1 ते 3 आठवड्यांत जनावरांमध्ये खालील लक्षणे दिसू लागतात:

1. तापमान 104 ते 106 अंश फॅरेनहाइटपर्यंत वाढते.
2. जनावर प्रचंड थरथरते व चारा-पाणी सोडते.
3. रक्तातील तांबड्या पेशी फुटल्यामुळे जनावराची लघवी चहा किंवा कॉफीसारख्या गडद लाल ते काळ्या रंगाची होते.
4. डोळ्यांची व पोटाची आतील त्वचा पांढरी किंवा पिवळी पडते.
5. दूध उत्पादन अचानक कमालीचे कमी होते.

### तांत्रिक मार्गदर्शन:

"गोचीड ताप जनावरांच्या शरीरातील तांबड्या पेशींचा थेट वेगाने नाश करतो. यामुळे दूध उत्पादन तर घटतेच, पण जनावराचा जीव जाण्याचाही धोका असतो. म्हणूनच आजार वाढण्याची वाट न पाहता खालील त्रिसूत्री अमलात आणली पाहिजे:"

- ❑ औषध फवारणी चक्र: गोचिडांचे जीवनचक्र पूर्णपणे तोडण्यासाठी जनावराच्या अंगावर व गोठ्यात 10 ते 15 दिवसांच्या अंतराने सलग दोन ते तीन वेळा औषध फवारणी अनिवार्य आहे. एकाच फवारणीने फक्त जनावराच्या अंगावरील गोचीड मरतात, परंतु गोठ्यातील अंडी नष्ट होत नाहीत.
- ❑ औषधांचा आलटून-पालटून वापर: बऱ्याचदा पशुपालक एकाच प्रकारचे गोचीडनाशक औषध वर्षानुवर्षे वापरतात, ज्यामुळे गोचिडांमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होते. म्हणूनच दर 6 ते 12 महिन्यांनी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने औषधाचा मूळ रासायनिक घटक (उदा. सायपरमेथ्रीनऐजी अमिताझ किंवा डेल्टामेथ्रीन) बदलून घ्यावा.
- ❑ दूध उत्पादन व शारीरिक क्षमता टिकवणे: गोचीड तापामुळे जनावरांमध्ये तीव्र रक्ताल्पता होते. यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने मूळ उपचारासोबत जनावरांना लोह आणि लिव्हर टॉनिक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून जनावराची शारीरिक क्षमता लवकर पूर्वपदावर येईल.

### ठळक मुद्दे

- पावसाळा अखेरचा काळ गोचिडांच्या प्रजननासाठी अत्यंत पूरक.
- परजीवीमुळे जनावरांना होतो जीवघेणा 'गोचीड ताप'.
- दुभत्या जनावरांचे दूध उत्पादन एकाच दिवसात ८० ते ९० टक्क्यांनी घटते.
- गोठ्यातील केवळ ५% गोचीड जनावरांच्या अंगावर, तर ९५% भेगांमध्ये लपलेले असतात.

### गोठ्यातील परजीवी नियंत्रणाचा 4-सूत्री कार्यक्रम:

1. गोठ्याची स्वच्छता व दुरुस्ती:

गोठ्यातील जमिनीला किंवा भिंतींना असणाऱ्या सर्व भेगा, चिरा सिमेंटने पूर्णपणे बुजवून घ्या. गोठ्यात कुठेही ओलावा व शेण साचणार नाही याची काळजी घ्या, कारण दमट वातावरणात परजीवी वेगाने वाढतात.

**2. ब्लो-लॅम्प किंवा मशालीचा वापर (Flame Gun):**

महिनातून एकदा गोठा रिकामा करून, भिंतींच्या व गव्हाणीच्या कोपऱ्यांवर 'ब्लो-लॅम्प' किंवा गॅस मशालीच्या साहाय्याने जाळ मारावा. यामुळे गोठ्याच्या भेगांमध्ये लपलेली कोट्यवधी अंडी जागेवरच जळून खाक होतात. हा सर्वात स्वस्त व प्रभावी उपाय आहे.

**3. रासायनिक औषधांचा संतुलित वापर:**

जनावराच्या अंगावर औषध फवारताना नेहमी केसांच्या विरुद्ध देशाने (खालून वरच्या दिशेने) लावावे, जेणेकरून औषध थेट त्वचेपर्यंत पोहोचेल. औषध लावण्यापूर्वी जनावराच्या तोंडाला मुसके बांधावे, जेणेकरून ते स्वतःला चाटणार नाही. औषध लावण्यापुर्वी सुरक्षितता पाळणे गरजेचे आहे.

**4. गोठा परिसराची फवारणी:**

ज्या दिवशी जनावरांच्या अंगावर औषध लावाल, त्याच दिवशी पूर्ण गोठ्यात व गोठ्याबाहेरील 5 ते 10 मीटर परिसरातही औषधाची फवारणी करणे अनिवार्य आहे. अन्यथा जमिनीवर पडलेले गोचीड पुन्हा जनावरांच्या अंगावर चढतात.

## गोठ्यातील परजीवी नियंत्रणाचा ४-सूत्री कार्यक्रम:




**पशुपालकांसाठी महत्त्वाचा संदेश**

पावसाळा संपताना व हिवाळा सुरू होताना तुमच्या गोठ्यात एखादे जरी जनावर सुस्त दिसले किंवा त्याची लघवी किंचित जरी बदललेली आढळली, तर कोणताही घरगुती उपचार करत वेळ न दवडता तातडीने नोंदणीकृत पशुवैद्यकाला बोलवून ब्लड स्मियर, आवश्यकतेनुसार पीसीआर व इतर रक्त तपासण्यांच्या मदतीने अचूक निदान करणे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येक ताप, अशक्तपणा किंवा लघवीतील बदल हा गोचीड तापामुळेच होतो असे नाही.

अनावश्यक किंवा चुकीच्या पद्धतीने अँटिप्रोटोझोअल औषधांचा वापर केल्यास ड्रग्ज रेजिसस्टन्स निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे पशुवैद्यकाने सुचविलेल्या आवश्यक तपासण्यांद्वारे निदान झाल्यानंतरच योग्य औषध व योग्य मात्रा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने द्यावी. गोचीड तापामध्ये सुरुवातीच्या 12 ते 24 तासांत केलेले उपचार जनावराचा जीव 100% वाचवू शकतात.

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
सर्व प्रकारच्या पशुवैद्यकीय सेवांसाठी (कॉल सेंटर) डायल करा
1962
व्हॉट्सअप चॅटबॉट सेवेसाठी डायल करा
9063142299

महापशुधन वार्ता




महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक असून, केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून राहणे आर्थिकदृष्ट्या पुरेसे ठरत नाही. हवामानातील अनिश्चितता, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांना शेतीला पूरक असा हमखास उत्पन्न देणारा व्यवसाय हवा असतो. अशा परिस्थितीत 'लावी पालन' अर्थात 'बटेर पालन' (Quail Farming) हा व्यवसाय अत्यंत कमी भांडवलात, कमी जागेत व कमी वेळात चांगले उत्पन्न मिळवून देणारा पर्याय म्हणून पुढे येत आहे. कोंबडीपालनाच्या तुलनेत या पक्ष्याचे संगोपन सोपे, जोखीम कमी आणि परतावा जलद मिळणारा असल्यामुळे राज्यातील अनेक तरुण शेतकरी व महिला बचत गट आता या व्यवसायाकडे वळत आहेत.



डॉ. प्रसाद वडजकर
पीएच. डी (कुक्कुटपालन शास्त्र)
भाकृअनुप-केंद्रीय पक्षी संशोधन संस्था,
इज्जतनगर



डॉ. सौरभ दहेकर
पशुधन विकास अधिकारी (बाह्यस्त्रोत)
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे- 67

**लावी पक्षी म्हणजे काय? :** लावी या पक्ष्याला हिंदीत 'बटेर' किंवा 'तितर', तर इंग्रजीत 'क्वेल' (Quail) असे म्हणतात. महाराष्ट्रात काही भागांत त्याला 'लाव्हरी' असेही संबोधले जाते. हा पक्षी आकाराने कोंबडीपेक्षा खूपच लहान असून, तो लवकर वाढतो आणि लवकर अंडी देण्यास सुरुवात करतो. साधारण 5 ते 6 आठवड्यांतच हा पक्षी विक्रीयोग्य वजनाचा होतो, तर 6 ते 7 आठवड्यांत मादी अंडी द्यायला सुरुवात करते. यामुळे भांडवल लवकर फिरते आणि शेतकऱ्याला वारंवार उत्पन्न मिळत राहते.

### लावी पालनाचे फायदे

- अत्यंत कमी जागेत मोठ्या संख्येने पक्षी पाळता येतात.
- कोंबडीपालनाच्या तुलनेत भांडवली गुंतवणूक खूप कमी लागते.
- पक्षी लवकर वाढतो, त्यामुळे 6 ते 7 आठवड्यांतच उत्पन्न सुरू होते.
- लावीच्या मांसात व अंड्यांत प्रथिनांचे प्रमाण जास्त व स्निग्धांश कमी असल्याने ते आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते, त्यामुळे शहरी भागातून मागणी वाढत आहे.
- रोगप्रतिकारशक्ती तुलनेने चांगली असल्याने मृत्युदर कमी राहतो.
- महिला व शेतमजुरांसाठीही घरबसल्या करता येण्याजोगा जोडधंदा.
- शेतीला पूरक उत्पन्नाचा स्थिर स्रोत तयार होतो.



पृष्ठ क्र. ४०

### व्यवसाय सुरू करताना घ्यावयाची काळजी

- 300 ते 500 पक्षी संगोपनाद्वारे सुरुवात करून अनुभव घ्यावा, त्यानंतरच व्यवसाय विस्तार करावा.
- विश्वासार्ह हॅचरीमधूनच निरोगी पिल्ले खरेदी करावीत.
- विक्रीसाठी आधीच स्थानिक बाजारपेठ किंवा हॉटेल्सशी संपर्क प्रस्थापित करावा.
- नोंदवही ठेवून खर्च व उत्पन्नाचा नियमित हिशोब ठेवावा.
- जवळच्या कृषी विज्ञान केंद्र किंवा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊनच व्यवसाय सुरू करावा.

## संगोपनासाठी आवश्यक जागा व शेड व्यवस्थापन

लावी पालनासाठी फार मोठ्या शेडची गरज नसते, हाच या व्यवसायाचा सर्वात मोठा फायदा आहे. साधारणपणे 15 चौरस फूट जाळीच्या (केज) पिंजऱ्यात 3 थरांमध्ये (लेयर) रचना केल्यास त्यात सुमारे 130 ते 150 पक्षी सहज सांभाळता येतात. त्यामुळे कमी जागेतही शेकडो पक्ष्यांचे संगोपन करता येते. शेड हवेशीर, ऊन-पावसापासून संरक्षण देणारे व कुत्रे-मांजर-उंदीर यांसारख्या भक्षकांपासून सुरक्षित असावे. पिल्ले लहान असताना त्यांना सुरुवातीचे 2 आठवडे बल्बच्या साहाय्याने उबदार तापमान (ब्रूडिंग) द्यावे लागते, त्यानंतर हळूहळू तापमान कमी करत सामान्य वातावरणाशी जुळवून घेतले जाते. पिंजऱ्याखाली विष्ठा गोळा करण्यासाठी ट्रे ठेवल्यास स्वच्छता राखणे सोपे जाते आणि ही विष्ठा उत्तम सेंद्रिय खत म्हणूनही वापरता येते.

## खाद्य व्यवस्थापन

बाजारातील चिक स्टार्टर खाद्यच लावीसाठी वापरता येते. साधारणपणे एका प्रौढ पक्ष्याला दररोज 5 ते 10 ग्रॅम खाद्य पुरेसे असते. एक पक्षी विक्रीयोग्य होईपर्यंत म्हणजेच सुमारे 6 आठवड्यांत साधारण 500 ते 550 ग्रॅम खाद्य खातो. एक किलो मांस उत्पादनासाठी सुमारे 2 ते 2.5 किलो खाद्य लागते, म्हणजेच खाद्य रूपांतरण दर (FCR) कोंबडीपेक्षाही चांगला आहे. खाद्यासोबत स्वच्छ व मुबलक पाणी सतत उपलब्ध असणे आवश्यक आहे. शक्य असल्यास मका, सोयाबीन पेंड, तांदळाचा कोंडा यांसारखे स्थानिक घटक वापरून स्वस्तात संतुलित खाद्य तयार केल्यास खर्च वाचतो.

## आरोग्य व लसीकरण व्यवस्थापन

लावी पक्षी तुलनेने कणखर व रोगप्रतिकारक असले, तरी नियमित स्वच्छता, कोरडे वातावरण व योग्य खेळती हवा यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पिंजरे व भांडी वेळोवेळी निर्जंतुक करावीत. नवीन पक्षी आणताना ते वेगळ्या जागी काही दिवस ठेवून निरीक्षण करावे (क्वारंटाईन). पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने आवश्यक ती लसीकरण व जंतनाशक औषधोपचार वेळेत करून घ्यावेत, जेणेकरून मृत्युदर कमी राहून नफा वाढतो.

## बाजारपेठ व मागणी

लावीच्या मांसाला व अंड्यांना शहरी भागांत व आरोग्यसजग ग्राहकांकडून सातत्याने मागणी असते. कमी स्निग्धांश व उच्च प्रथिनयुक्त आहार म्हणून डॉक्टर व आहारतज्ज्ञ अनेकदा लावीच्या मांसाची व अंड्यांची शिफारस करतात, काही भागांत करार-शेती पद्धतीनेही लावी पालन केले जाते, ज्यामध्ये कंपनी पिल्ले, खाद्य व मार्गदर्शन पुरवते आणि तयार माल विकत घेते.



## आर्थिक गणित (अंदाजे)

खालील तक्त्यात लावी पालनाचे ढोबळ आर्थिक गणित दिले आहे. प्रत्यक्ष खर्च व उत्पन्न हे स्थानिक बाजारभाव, खाद्याचा दर्जा व व्यवस्थापनानुसार कमी-अधिक होऊ शकते.

| तपशील | अंदाजे रक्कम / प्रमाण |
|---|---|
| एका पिल्लाची किंमत | रु. 3 ते रु. 4 (प्रती पक्षी) |
| 6 आठवड्यांसाठी लागणारे खाद्य | सुमारे 500 ते 550 ग्रॅम (प्रती पक्षी) |
| 1 किलो वजनवाढीसाठी लागणारे खाद्य (FCR) | सुमारे 2 ते 2.5 किलो खाद्य |
| प्रती पक्षी एकूण संगोपन खर्च (6 आठवडे) | अंदाजे रु. 9 ते रु. 10 |
| विक्री दर (होलसेल, प्रती पक्षी) | अंदाजे रु. 14 ते रु. 18 |
| विक्री दर (किरकोळ, प्रती पक्षी) | अंदाजे रु. 20 ते रु. 25 |
| अंडी उत्पादन (वर्षभरात प्रती मादी) | सुमारे 250 ते 300 अंडी |

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, एका पक्ष्यामागे सुमारे 9 ते 10 रुपये खर्च येऊन तो 14 ते 18 रुपयांना होलसेलमध्ये विकला जातो, म्हणजेच अवघ्या 6 आठवड्यांत प्रती पक्षी 40 ते 50 टक्क्यांपर्यंत नफा मिळू शकतो. 500 ते 1000 पक्ष्यांच्या छोट्या युनिटपासून सुरुवात केल्यास कमी जोखमीत हा व्यवसाय समजून घेता येतो व हळूहळू विस्तार करता येतो. वरील आकडेवारी अंदाजे व सर्वसाधारण मार्गदर्शनासाठी दिली आहे. प्रत्यक्ष व्यवसाय सुरू करण्यापूर्वी स्थानिक बाजारभाव, हवामान व शासकीय योजनांची अद्ययावत माहिती संबंधित पशुसंवर्धन विभाग किंवा कृषी विज्ञान केंद्राकडून जरूर घ्यावी.

### शासकीय योजना व अर्थसहाय्य:

कुक्कुटपालनाप्रमाणेच लावी पालनासाठीही राज्य व केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजनांतून अनुदान व कर्ज सुविधा उपलब्ध होऊ शकतात. राष्ट्रीय पशुधन अभियान, बँकांकडून मिळणारे कृषी पूरक व्यवसाय कर्ज, तसेच जिल्हास्तरीय योजनांची माहिती घेऊन शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. योजनेच्या अटी, अनुदानाचे प्रमाण व आवश्यक कागदपत्रे यांबाबत अद्ययावत माहितीसाठी जवळच्या पशुसंवर्धन कार्यालयाशी किंवा कृषी विज्ञान केंद्राशी संपर्क साधावा, कारण या योजनांच्या अटी वेळोवेळी बदलत असतात. लावी (बटेर) पालन हा व्यवसाय कमी जागा, कमी भांडवल व कमी कालावधीत उत्पन्न देणारा असल्यामुळे महाराष्ट्रातील अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांसाठी एक उत्तम संधी आहे.

योग्य नियोजन, शास्त्रोक्त व्यवस्थापन व हक्काची बाजारपेठ यांची सांगड घातल्यास हा जोडधंदा शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढवण्यास निश्चितच हातभार लावू शकतो. शासकीय योजनांचा लाभ घेत, प्रशिक्षण घेऊन सुरुवात केल्यास लावी पालन हे शेतीला पूरक असे शाश्वत उत्पन्नाचे साधन ठरू शकते.



# महाराष्ट्राची पहिली नोंदणीकृत वराह जात: करकंबी



भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) च्या वराह जातींच्या नोंदणी प्रक्रियेद्वारे या जातीला अधिकृत मान्यता मिळाली असून, करकंबी ही महाराष्ट्रातील पहिली नोंदणीकृत वराह जात ठरली आहे. तसेच, करकंबी ही भारतामध्ये नोंदणीकृत झालेली १५ वी स्वदेशी वराह जात आहे. ही नोंदणी महाराष्ट्रातील स्वदेशी वराह अनुवंशिक संसाधनांच्या संवर्धन व राष्ट्रीय स्तरावरील मान्यतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा आहे. करकंबी वराह जातीला मिळालेली ही राष्ट्रीय मान्यता महाराष्ट्रातील स्वदेशी पशुधनाच्या अनुवंशिक संसाधनांच्या संवर्धनातील एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे. या नोंदणीमुळे ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने जतन केलेल्या करकंबी वराहांना औपचारिक राष्ट्रीय ओळख प्राप्त झाली आहे. तसेच, या जातीचे शास्त्रोक्त संवर्धन, गुणवैशिष्ट्यांचे शास्त्रीय मूल्यमापन, पैदासवाढ व शाश्वत उपयोग यासाठी अधिक भक्कम आधार निर्माण झाला आहे.





डॉ. जी. एस. सोनवणे

डॉ. व्हि. एस. धायगुडे

क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर
संपर्क : 8796448707 ईमेल: gokulsonwane@mafsu.ac.in

**उगमस्थान व पैदासक्षेत्र:**

करकंबी वराह जातीचे उगमस्थान सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील करकम गाव व त्याच्या आजूबाजूचा परिसर मानला जातो. ही जात सोलापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यांतील ग्रामीण तसेच कोरडवाहू भागात, विशेषतः वेड्या बाभळीच्या वनक्षेत्रात, मोठ्या प्रमाणावर आढळून येते. या जातीचे पारंपरिक संगोपन व पालन प्रामुख्याने वडार, कैकाडी, सलगर आणि टकारी या समुदायांकडून केले जाते. स्थानिक वराहपालक या वराहांचा उपयोग विविध सण-उत्सव, धार्मिक विधी तसेच पितरांना नैवेद्य अर्पण करण्यासाठी करतात. तसेच, काही समुदायांमध्ये विवाह समारंभाच्या प्रसंगी वराह भेट म्हणून देण्याची प्रथाही आढळून येते.

**बाह्य गुणधर्म:** करकंबी वराह जात आकारमानाने बहुतांश विदेशी वराह जातींपेक्षा लहान असते. या वराह जातीचा चेहरा लांब व निमुळता असून कान आखूड, लहान व शंकाकृती असतात. कान साधारणपणे वरच्या दिशेने उभे असतात. शरीराचा रंग प्रामुख्याने काळा असून क्वचित प्रसंगी चेहरा व खुरांवर पांढरे डाग आढळून येतात. नर वराहाच्या मुखाग्रावर काळ्याभोर मिशा असून वयात आल्यानंतर मानेवर दाट आयाळ विकसित होते आणि शरीरावर काळेभोर, लांब, दाट केस वाढतात. मानेवरील केसांची लांबी नरामध्ये साधारण 14 ते 19 सेंमी, तर मादीमध्ये 9 ते 13 सेंमी आढळते. केसांच्या टोकांना दुभाजक (forked/split ends) स्वरूप दिसून येते.

## करकंबी वराह जात – एका दृष्टीक्षेपात

| बाब | तपशील |
|---|---|
| जात | करकंबी वराह |
| दर्जा | महाराष्ट्रातील पहिली नोंदणीकृत वराह जात |
| राष्ट्रीय मान्यता | भारतीय कृषी अनुसंधान परिषद – राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो (ICAR-NBAGR, कर्नाल) |
| नोंदणी/मान्यता | भारतीय कृषी अनुसंधान परिषदेची वराह जात नोंदणी समिती (Breed Registration Committee – BRC) |
| मान्यता दिनांक | ६ जानेवारी, २०२५ |
| प्रवेश क्रमांक (Accession No.) | INDIA_PIG_1100_KARKAMBI_09015 |
| उगमक्षेत्र | महाराष्ट्र |
| प्रमुख प्रसारक्षेत्र | सोलापूर, पुणे, सातारा आणि सांगली जिल्हे |
| प्रमुख उपयोग | मांस उत्पादन व औषधी चरबी |
| पालन पद्धती | प्रामुख्याने मुक्त संचार (Scavenging) व कमी निविष्ठा आधारित (Low-input) पद्धतीने पालन |
| शासकीय प्रजनन क्षेत्र | क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय (KNPCVS), शिरवळ, माफसू, नागपूर, महाराष्ट्र |
| संबंधित शास्त्रज्ञ | डॉ. एम. बी. आमले, डॉ. जी. एस. सोनवणे आणि डॉ. व्ही. एस. धायगुडे |


करकंबी वराह मादी


करकंबी वराह नर

करकंबी वराहाची शेपटी तुलनेने लांब असून ती खालच्या दिशेने निमुळती होत जाते. शेपटीच्या टोकाला काळ्याभोर केसांचा गोंडा असतो. या जातीच्या वराहांचे पोट तुलनेने सपाट असून ते चांगले धावक असतात. नैसर्गिक परिस्थितीत मुक्त संचार करण्याची क्षमता व वातावरणाशी जुळवून घेण्याची अनुकूलता ही करकंबीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. घामग्रंथी कमी असल्याने उन्हाळ्यात शरीराचे तापमान स्थिर राखण्यासाठी, उन्हापासून वाचवण्यास तसेच अंगावरील परजीवी नियंत्रण राहण्यासाठी चिखलात लोळतात.

**विशेषता:** करकंबी नर हे मादीला आकर्षित करण्यासाठी किंवा आपल्या शत्रूला घाबरवण्यासाठी अंगावरील केस पिंजारून तोंडातून एक विशिष्ट आवाज करून सफेद फेस तोंडातून बाहेर

वराह जात ही अतिशय काटक असून ही पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी तसेच बाभळीच्या काटेरी जंगलात यांचा मुक्त वावर असतो. उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी अंगावरील केस गळणे ही या जातीतील नैसर्गिक ऋतुनिष्ठ प्रक्रिया आहे. त्यामुळे बदलत्या ऋतुमानाशी जुळवून घेण्यास या वराहांना मदत होते.

**वजन व मोजमापे:** प्रौढ नरामध्ये शारिरीक लांबी, छातीचा घेर, मानेचा घेर व उंची (सेमी) अनुक्रमे 87.95, 92.06, 68.24, 64.10 असुन मादी मध्ये 86.74, 90.32, 67.94, 63.90 असते. जन्माच्या वेळी या वरांहामधील वजन 0.4 ते 0.7 किलो पर्यंत असते. पुर्ण वाढ झालेल्या प्रौढ नराचे वजन 45 ते 50 किलो तर मादीचे वजन 40 ते 45 किलो भरते.

## करकंबी वराह जातीचे वयावरील सरासरी वजन (कि.ग्रॅ.)

| अ.क्र. | लिंग | जन्मतः | विलगीकरण (२ महिने) | ३ महिने | ६ महिने | १२ महिने | प्रौढ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नर | ०.५९ | ३.९२ | ५.७० | १३.४९ | २९.४० | ४५.११ |
| २ | मादी | ०.५६ | ४.०३ | ५.६३ | ११.२४ | २८.१५ | ४३.१५ |

**मांस उत्पादन गुणधर्म:** करकंबी वराहांमध्ये उपलब्ध टाकाऊ अन्नघटकांचे प्रभावीपणे रूपांतर करून रुचकर व पौष्टिक मांस उत्पादन करण्याची चांगली क्षमता आढळून येते. स्थानिक व नैसर्गिक परिस्थितीत उपलब्ध खाद्यस्रोतांचा उपयोग करून मांस उत्पादन करण्याची क्षमता हे या जातीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

## मांस गुणधर्म

| बाब | तपशील |
|---|---|
| कत्तलीचे सरासरी वय (महिने) | १५ ते १८ महिने |
| कत्तलीचे सरासरी वजन (कि.ग्रॅ.) | ३० ते ३२ कि.ग्रॅ. |
| मांसाचा उतारा (%) | ६३ % |

**उपयुक्तता:** करकंबी वरहात टाकाऊ अन्नघटकापासून रुचकर मांस तयार करण्याची उत्तम क्षमता आढळून येते. त्यांच्या चरबीचा वापर हा सांधेदुखी तसेच शरीरावरील सूज कमी करण्यासाठी प्रामुख्याने केला जातो. याशिवाय यांच्या केसांचा वापर हा ब्रश तयार करण्यासाठी तर लेंडी पासून खत निर्मिती केली जाते. करकंबी वराह जात ही अतिशय काटक असून ही पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी तसेच बाभळीच्या जंगलात यांचा मुक्त वावर असतो. अर्धबंदिस्त व्यवस्थापनासाठी ही प्रजाती उपयुक्त असून रोगप्रतिकारशक्ती चांगली असल्याने लसीकरणाशिवाय ती स्थानिक वातावरणात चांगली टिकाव धरते.








करकंबी वराहांची क्षेत्रीय माहिती नोंदणी क्षणचित्रे


डॉ. जी. एस. सोनवणे, प्रभारी अधिकारी, वराह फार्म, KNPCVS, शिरवळ यांच्या मार्गदर्शनाखाली करकंबी वराहांच्या उत्पादन व व्यवस्थापनासंदर्भातील प्रशिक्षण कार्यक्रम नियमित आयोजित केले जातात. या प्रशिक्षणांमुळे विद्यार्थ्यांना तसेच संबंधितांना करकंबी वराह जातीच्या शास्त्रीय पालन, व्यवस्थापन, प्रजनन व संवर्धनाबाबत प्रत्यक्ष अनुभव व व्यावहारिक ज्ञान प्राप्त होते.

**प्रजनन गुणधर्म:** करकंबी मादीमध्ये स्तनाच्या पाच जोड्या आढळतात. मादी साधारणपणे एका वेळी 2 ते 10 पिल्लांना जन्म देते. मादीमध्ये नैसर्गिक मातृत्वाची प्रवृत्ती चांगली असल्यामुळे पिल्लांची योग्य काळजी घेतली जाते व पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाण तुलनेने कमी आढळते. सुरुवातीचे दोन महिने पिल्ले मादीचे दूध पितात. त्यानंतर पिल्लांचे मादीपासून विलगीकरण (Weaning) केले जाते. नैसर्गिक संगोपन, चांगली मातृत्व क्षमता व पिल्लांचे संगोपन करण्याची प्रवृत्ती ही करकंबी वराह जातीची महत्त्वाची प्रजनन वैशिष्ट्ये आहेत.




## प्रजनन गुणधर्म

| | |
|---|---|
| प्रथम माजावर येण्याचे वय | ७-८ महिने |
| प्रथम गर्भधारणेचे वय | ९ महिने |
| प्रथम विण्याचे वय | १२.७० महिने |
| गाभन काळ | ११२-११९ दिवस |
| दोन वेतातील अंतर | ६ ते ७ महिने |
| ऋतुचक्राचा कालावधी | १९ ते २३ दिवस |
| जन्माच्या वेळी सरासरी पिल्लांची संख्या | ६-८ संख्या |


















सध्या ही वराह जात फक्त ग्रामीण आणि दुर्गम भागात आढळते. ही स्थानिक अनुवंशिक संपत्ती असून तिचे शाश्वत संवर्धन, संगोपन व आनुवंशिक सुधारणा करणे आवश्यक आहे. स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेतलेल्या या जातीचे संवर्धन केल्यास ग्रामीण भागातील उपजीविका, जैवविविधता व स्थानिक पशुधनाच्या अनुवंशिक संसाधनांचे संवर्धन करण्यास मदत होऊ शकते. यासाठी शास्त्रशुद्ध पैदास व संगोपन धोरण राज्यस्तरावर निश्चित करणे आवश्यक आहे.

वराह उत्पादन व व्यवस्थापन विषयक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (ETP)


... उर्वरित पुढील पृष्ठावर












## करकंबी वराहांचे मांस व केसांच्या (ब्रिसल्स) गुणधर्मांचे मापन




NASC संकुल, ICAR कृषी भवन, नवी दिल्ली येथे डॉ. सोनवणे व डॉ. धायगुडे यांना प्राप्त झालेले वराह जाती नोंदणी प्रमाणपत्र




क्रांतीसिह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे आयोजित वराहपालन प्रशिक्षण कार्यक्रमा दरम्यान उपस्थित प्रशिक्षणार्थी

# ‘ममीफाईड फिटस’ ते नवजीवन:
## एका बापाची जिद्द आणि पशुवैद्यकाची किमया

**नोव्हेंबर २०२४** ची ती एक शांत सकाळ होती. दुसऱ्या कार्यक्षेत्रातून, जवळपास ४० किलोमीटरचा रस्ता पार करत एक पशुपालक दवाखान्यात आला. त्याच्या डोळ्यांत एक अनामिक आशेचा किरण होता, पण मनात मोठी घालमेल होती. त्याच्या गाईचे कृत्रिम रेतन (AI) होऊन तब्बल बारा महिने उलटले होते, तरीही गाय व्यालेली नव्हती. “तारीख चुकली असेल, गाय सात महिन्यांची गाभण आहे,” असे सल्ले त्याला काही जणांनी दिले होते.


पण जेव्हा तिची प्रत्यक्ष तपासणी केली, तेव्हा सत्य काही वेगळेच समोर आले—तिच्या गर्भाशयात **‘ममीफाईड फिटस’** (सुकलेला / कडक झालेला विकसित मृत गर्भ) अडकले होते.

औषधोपचारांनी तो गर्भ बाहेर आला नाही, शेवटी सिझर करून तो कडक झालेला मृत गर्भ बाहेर काढावा लागला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली, पण पुढचा प्रवास सोपा नव्हता. पुढील वर्षभर ती गाय वारंवार माजावर येत होती, पण गर्भधारणा होत नव्हती. अंतर खूप जास्त असल्याने स्थानिक ‘पॅराव्हेट’मार्फत उपचार सुचवले, तरीही यश येत नव्हते. शेवटी, त्या पशुपालकाच्या आग्रहास्तव डिसेंबर २०२५ मध्ये स्वत: जाऊन तिचे पुन्हा ‘एआय’ केले, आणि निसर्गाने शेवटी त्या जिद्दीचा मान राखला—गाय गाभण राहिली!

जेव्हा त्या गाईने एका अतिशय गोंडस आणि सुदृढ वासराला जन्म दिला, तेव्हा तो क्षण फक्त एका डॉक्टरसाठी व्यावसायिक यशाचा नव्हता, तर एका बापाच्या आत्मिक समाधानाचा होता.



डॉ. विठ्ठल हटवार



**या कथेमागचे खरे मर्म काय होते?**

त्या पशुपालकाची व गाईची ही गोष्ट साधी नव्हती; त्यामागे एक काळीज पिळवटून टाकणारे सत्य दडले होते. त्या पशुपालकाचा मुलगा अगदी आवडीने व जिवापाड तिची देखभाल करायचा. पण दुर्दैवाने, एका भीषण अपघातात त्या तरुण मुलाचा अंत झाला. घरचा कुलदीपक निघून गेला... मुलाच्या आठवणी जपण्यासाठी त्या बापाने गाईलाच आपल्या मुलाचे रूप मानले व तिचा सांभाळ करायला सुरुवात केली.

ज्यावेळी गाईच्या पोटातील गर्भ सुकल्याचे समजले व सिझरची वेळ आली, तेव्हा त्या पशुपालकाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. लोकांनी सल्ले दिले, "गाय विक्री करून टाक, कशाला पैसा व वेळ वाया घालवतोस?" पण बाप खचला नाही. "मला माझ्या मुलाच्या आवडत्या गाईचे जिवंत वासरू बघायचेच आहे," हा एकच ध्यास आणि निर्धार त्याच्या उराशी होता. गत महिन्यात जेव्हा त्या चिमुकल्या वासराचा पहिला श्वास व गाईचे प्रेमाचे हुंकार त्या गोठ्यात गुंजले, तेव्हा त्या पशुपालकाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहिले. ते अश्रू दुःखाचे नव्हते, तर आपल्या मुलाला अर्पण केलेल्या एका खऱ्या व पवित्र श्रद्धांजलीचे होते. मुलाच्या आठवणींचा तो गोड अंकुर गाईला झालेल्या वासराच्या रूपाने डोळ्यांसमोर हुंदडत व बहरत होता.

एका संवेदनशील पशुवैद्यकाच्या हातांनी जेव्हा ही वैद्यकीय किमया घडली, तेव्हा एका बापाचे स्वप्न साकार झाले. "अशा कठीण प्रसंगात त्या जिद्दी पशुपालकाच्या पाठीशी उभे राहण्याची व या भावुक प्रवासाचा साक्षीदार होण्याची संधी मला मिळाली, हे माझे महद्भाग्य!" अशी निरागस भावना डॉ. विठ्ठल हटवार यांच्या मनात कायमची कोरली गेली आहे. जिथे वैद्यकीय शास्त्राची सीमा संपते, तिथे कदाचित प्रेमाची व भावनेची ताकद विजय मिळवते. ही कथा त्याच अथांग प्रेमाचे आणि विश्वासाचे प्रतीक आहे.




"परिस्थिती बदलण्याची वाट पाहण्यापेक्षा, परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला व स्वतःची वाट तयार करताना इतरांनाही सोबत घेतले..." ही केवळ एका तरुणाची कहाणी नाही; तर संघर्षाचे रुपांतर संधीमध्ये करून शेकडो शेतकऱ्यांना समृद्धीचा मार्ग दाखवणाऱ्या एका ध्येयवेड्या कृषी-उद्योजकाचा प्रेरणादायी जीवनप्रवास आहे.



गणेश ऊर्फ लक्ष्मण सोपान दाईंगडे
रा. प्रतापूर, ता. जत, जि. सांगली, महाराष्ट्र – 416403

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील जांभुळवाडी या छोट्याशा गावात 1 ऑगस्ट 1994 रोजी एका ऊसतोड मजुराच्या कुटुंबात गणेश यांचा जन्म झाला. घरात दारिद्र्य व डोक्यावर कर्जाचा डोंगर. आई पूर्णपिणे अशिक्षित, तर वडिलांचे शिक्षण फक्त सहीपुरते. अशा कठीण परिस्थितीत गणेश यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल (धावडवाडी) येथे पूर्ण झाले.

पुढील शिक्षणासाठी ते सांगलीत आले. शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी विश्रामबाग येथील 'गणेश नाश्ता सेंटर' मध्ये त्यांनी वेटर म्हणून काम केले. एका हातात कामाचा ट्रे अन् दुसऱ्या हातात अभ्यासाचे पुस्तक... या समीकरणातून त्यांनी विलिंग्डन कॉलेजमधून बी.ए. (इंग्रजी) पदवी संपादन केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी D.Ed., हॉटेल मॅनेजमेंट व कन्स्ट्रक्शन सुपरवायझर डिप्लोमा देखील पूर्ण केला. "शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे, तर परिस्थिती बदलण्याचे साधन आहे," हे त्यांनी कष्टाने सिद्ध केले.

शिक्षणादरम्यानच त्यांनी मुंबईतील वाशी भाजीपाला मार्केटमध्ये सुमारे दोन वर्षे माथाडी कामगार म्हणून काम केले. या काळात शेतीमालाची खरेदी-विक्री, बाजारातील चढ-उतार व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी त्यांनी जवळून अनुभवल्या.

हॉटेल मॅनेजमेंटनंतर पुण्याच्या ऑर्चिड हॉटेल व गोव्याच्या डेल्टीन रॉयलमध्ये काम केल्यानंतर, 2015-16 मध्ये त्यांना मलेशियात चांगल्या नोकरीची संधी मिळाली. परदेशात असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी गावाकडील लोकांशी संपर्क टिकवून ठेवला. परदेशातील आकर्षक पगाराची नोकरी सोडून आपल्या मातीत परतण्याचा धाडसी निर्णय गणेश यांनी घेतला आणि हाच त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट ठरला.

गावी परतल्यावर घरची आर्थिक स्थिती बिकट होती. राहायला स्वतःचे घरही नव्हते; अवघ्या 10 बाय 10 च्या पत्र्याच्या खोलीत त्यांनी कुटुंबासह संसार थाटला. स्वतःची जमीन बँकेकडे गहाण ठेवून पुन्हा धाडसाने कर्ज घेतले. शेतात विहीर, पाईपलाईन व सपाटीकरण करून नियोजनबद्ध शेतीला सुरुवात केली. ढोबळी मिरची, वांगी, टोमॅटो, मका व ऊस या पिकांसोबतच त्यांनी गायपालन व हॅटसन डेअरीशी संबंधित व्यवसाय सुरु केला. कष्टाच्या जोरावर आर्थिक स्थैर्य मिळवत, ज्या परिस्थितीत घर नव्हते, तेथे त्यांनी 2021 मध्ये स्वतःचे 20 लाख रुपये खर्चाचे पक्के घर उभे केले.

# राष्ट्रीय पशुधन अभियान आणि शेळीपालनातील झेप

केंद्र सरकारचे राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM) हे पशुपालन क्षेत्राचा शाश्वत विकास, उद्योजकता निर्मिती आणि पशुपालकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी 50% भांडवली अनुदान देणारी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा पुरेपूर लाभ घेत त्यांनी ₹99.65 लाख एकूण भांडवलाचा आणि 500 शेळ्या + 25 बोकड असा भव्य व्यावसायिक प्रकल्प उभा केला. या साहसी पावलाला शासकीय पाठबळ मिळाले आणि त्यांना तब्बल ₹49.80 लाखांचे शासकीय अनुदान मंजूर झाले.



हा प्रकल्प उभारताना पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अत्यंत मोलाचे प्रशासकीय सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर, स्थानिक स्तरावरील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी शेळ्यांचे आरोग्य, लसीकरण व आधुनिक व्यवस्थापनाबाबत केलेले मोलाचे सल्ला-मार्गदर्शन या प्रवासात अत्यंत निर्णायक ठरले. शासकीय पाठबळ, अधिकाऱ्यांचे सहकार्य आणि स्वतःच्या व्यावसायिक दृष्टिकोनाच्या बळावर त्यांनी आधुनिक पशुपालनात आज स्वतःची एक आगळीवेगळी व यशस्वी ओळख निर्माण केली आहे.




गणेश दाईंगडे यांच्या या उत्तुंग यशामध्ये त्यांच्या आई-वडिलांचे संस्कार, भाऊ-बहीण व कुटुंबाचे पाठबळ, तसेच विविध सरकारी अधिकारी, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ व मित्रांचे मार्गदर्शन मोलाचे राहिले.

ऊसतोड मजुराचा मुलगा, वेटर, हमाली कामगार, परदेशातील नोकरदार ते करोडो रुपयांची उलाढाल असणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपनीचा संस्थापक... गणेश दाईंगडे यांचा हा प्रवास महाराष्ट्रातील प्रत्येक तरुणांसाठी व शेतकऱ्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

**गणेश ऊर्फ लक्ष्मण सोपान दाईंगडे यांच्या जीवनप्रवासाचे 3 मुख्य सूत्रे:**

1. शिक्षणाचा वापर व्यावहारिक आयुष्यात सक्षम होण्यासाठी करणे.
2. सरकारी योजना व संसाधनांचा अभ्यासपूर्ण लाभ घेणे.
3. वैयक्तिक प्रगतीसोबत समाजातील इतर घटकांना एकत्र घेऊन पुढे जाणे.

पृष्ठ क्र. ४९



# दूध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळ : अन्नसुरक्षेचे गंभीर आव्हान

दूध हे संपूर्ण अन्न म्हणून ओळखले जाते. बालकांच्या वाढीपासून ते वृद्धांच्या आरोग्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर दुधाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश असून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि पोषणाविषयी वाढलेली जागरूकता यामुळे दुधाची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र, या वाढत्या मागणीसोबत दुध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीची समस्या देखील गंभीर बनत चालली आहे. अधिक आर्थिक लाभ मिळविण्यासाठी काही ठिकाणी दुधात पाणी, स्टार्च, युरिया, डिटर्जंट किंवा इतर रसायनांची भेसळ केली जाते. ही भेसळ केवळ दुधाची गुणवत्ता कमी करत नाही, तर ग्राहकांच्या आरोग्यासाठीही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे दुधातील भेसळीचे स्वरूप, त्याचे परिणाम व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यांविषयी जागरूकता निर्माण करणे ही आजची गरज बनली आहे.

## दुधाचे पोषणमूल्य व महत्त्व

दुधामध्ये सुमारे 87 टक्के पाणी, 3 ते 4 टक्के प्रथिने, 3 ते 6 टक्के स्निग्ध पदार्थ (चरबी), 4 ते 5 टक्के दुग्धशर्करा (लॅक्टोज) तसेच विविध खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. दुधातील केसीन आणि व्हे प्रथिने ही उच्च जैविक मूल्याची प्रथिने असून शरीराच्या वाढीस, ऊतींच्या दुरुस्तीस व रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करतात. कॅल्शियम आणि फॉस्फरस ही खनिजे हाडे व दातांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. याशिवाय जीवनसत्त्व अ, ड, $ब_2$ शरीरातील विविध जैविक क्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. बालकांच्या वाढीसाठी, किशोरवयीन मुलांच्या शारीरिक विकासासाठी, गर्भवती व स्तनदा महिलांच्या पोषणासाठी तसेच वृद्धांच्या आरोग्यासाठी दूध विशेष उपयुक्त मानले जाते. म्हणूनच दूध हे 'संपूर्ण अन्न म्हणून ओळखले जाते. मात्र, दुधामध्ये भेसळ झाल्यास त्याचे पोषणमूल्य कमी होण्याबरोबरच ग्राहकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे दुधाची शुद्धता व गुणवत्ता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.




डॉ.ऋतुजा प्रविणकुमार घुले ,
(Ph.D. Scholar- Livestock Products Technology)
ICAR - IVRI , इज्जतनगर ,बरेली (उत्तरप्रदेश)
(7588431623)



डॉ.प्रविणकुमार पंढरीनाथ घुले ,
MVSc (Bacteriology)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ,नांदेड ( 9960160624 )




पृष्ठ क्र. ५०

### दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ म्हणजे काय?

दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांची नैसर्गिक गुणवत्ता, शुद्धता, पोषणमूल्य अथवा सुरक्षितता कमी करणाऱ्या कोणत्याही पदार्थांची जाणूनबुजून किंवा अजाणतेपणी केलेली मिसळ भेसळ म्हणून ओळखली जाते. अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या (FSSAI) व्याख्येनुसार, अन्नपदार्थाच्या मूळ रचनेत बदल करून ग्राहकांची दिशाभूल करणे किंवा आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने निकृष्ट अथवा परकीय पदार्थ मिसळणे ही भेसळ आहे.

दूधामध्ये पाणी, स्टार्च, युरिया, डिटर्जंट, साखर किंवा कृत्रिम रसायनांची भेसळ केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे तूप, लोणी, पनीर, खवा, दही व इतर दुग्धजन्य पदार्थांमध्ये स्वस्त वनस्पती तेल, कृत्रिम रंग, स्टार्च किंवा इतर निकृष्ट घटक मिसळले जाऊ शकतात. अशा भेसळीमुळे उत्पादनाचे पोषणमूल्य कमी होते, गुणवत्ता घसरते आणि ग्राहकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे दूध व दुग्धजन्य पदार्थांची शुद्धता व सुरक्षितता सुनिश्चित करणे ही अन्नसुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

### दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळणारे प्रमुख भेसळकारक

दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी, साठवणुकीतील अडचणी व अधिक आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे भेसळकारक पदार्थ वापरले जातात. हे पदार्थ उत्पादनाचे प्रमाण, घनपदार्थ (SNF) किंवा फॅटचे प्रमाण कृत्रिमरीत्या वाढविण्यासाठी अथवा निकृष्ट दर्जाचे उत्पादन चांगले असल्याचा भास निर्माण करण्यासाठी मिसळले जातात. जे अंतिमत: मानवी आरोग्यास अतिशय हानीकारक आहेत.

| भेसळकारक | वापरण्याचे कारण | आढळणारे पदार्थ | आरोग्यावर होणारे परिणाम |
|---|---|---|---|
| पाणी | दुधाचे प्रमाण वाढविणे | दूध | पोषणमूल्य घट, दूषित पाण्यामुळे संसर्ग |
| स्टार्च | घनता वाढविणे | दूध, खवा, पनीर | पचन विकार, मधुमेहींसाठी हानिकारक |
| युरिया | SNF कृत्रिमरीत्या वाढविणे | दूध, पनीर | मूत्रपिंड व यकृतावर ताण |
| डिटर्जंट | कृत्रिम दूध निर्मिती, फेस वाढविणे | दूध | मळमळ, उलट्या, अतिसार |
| साखर/ग्लुकोज | चव व घनता वाढविणे | दूध | मधुमेहींसाठी धोका |
| मीठ | SNF वाढवून तपासणीची फसवणूक | दूध | उच्च रक्तदाबाचा धोका |
| वनस्पती तेल/ तूप | खर्च कमी करणे | तूप, लोणी, खवा | पोषणमूल्य व गुणवत्ता कमी होणे |
| कृत्रिम रंग | आकर्षक रंग देणे | पनीर, मिठाई, आईस्क्रीम | ॲलर्जी व इतर आरोग्य समस्या |
| कृत्रिम स्वादद्रव्ये | चव सुधारण्याचा भास निर्माण करणे | विविध दुग्धजन्य पदार्थ | संवेदनशील व्यक्तींत प्रतिकूल परिणाम |

**भेसळीची कारणे:** दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ ही केवळ अन्नसुरक्षेची समस्या नसून आर्थिक, तांत्रिक आणि व्यवस्थापनाशी संबंधित विविध कारणांमुळे उद्भवते. वाढती मागणी, पुरवठ्यातील मर्यादा व अधिक नफा मिळविण्याची प्रवृत्ती यामुळे काही व्यक्ती किंवा व्यावसायिकांकडून भेसळीचा मार्ग अवलंबला जातो. भेसळीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:




1. **आर्थिक लाभ मिळविण्याची प्रवृत्ती:** कमी खर्चात अधिक नफा मिळविण्यासाठी दुधात पाणी किंवा इतर स्वस्त पदार्थ मिसळले जातात. हे भेसळीमागील सर्वात प्रमुख कारण आहे.

2. **दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी :** लोकसंख्या वाढ, शहरीकरण व दुग्धजन्य पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ती मागणी पूर्ण करण्यासाठी भेसळीचा अवलंब केला जातो.

3. **ग्राहकांमध्ये जागरूकतेचा अभाव:** भेसळ ओळखण्याच्या पद्धती आणि अन्नसुरक्षेविषयी माहिती नसल्यामुळे ग्राहक सहज फसवले जाऊ शकतात.

4. **साठवणूक व वाहतुकीतील अडचणी :** दूध हे लवकर खराब होणारे अन्न आहे. योग्य शीतसाखळी उपलब्ध नसल्यास गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी काहीवेळा अनधिकृत पदार्थ मिसळले जातात.

5. **अपुरी तपासणी व कायद्याची अंमलबजावणी :** नियमित तपासणी व कठोर कारवाई अभावी भेसळखोरांना प्रोत्साहन मिळू शकते.

6. **दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादन खर्चात वाढ :** तूप, पनीर, खवा व इतर पदार्थांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या दुधाच्या वाढत्या किमतीमुळे काही उत्पादक स्वस्त पर्यायांचा वापर करून अधिक नफा मिळविण्याच्या विकृत उद्शाने भेसळ करतात. या भेसळीचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

पृष्ठ क्र. ५१

## भेसळीमुळे होणारे आरोग्यावरील परिणाम

दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ ही केवळ अन्नाची गुणवत्ता कमी करत नाही, तर मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम देखील घडवू शकते. भेसळकारक पदार्थांचे स्वरूप, प्रमाण व सेवनाचा कालावधी यानुसार त्यांचे दुष्परिणाम वेगवेगळे असू शकतात. लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध व्यक्ती व रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींमध्ये हे परिणाम अधिक तीव्र स्वरूपात दिसून येऊ शकतात.

| भेसळकारक | आरोग्यावरील परिणाम |
|---|---|
| पाणी (दूषित) | अतिसार, टायफॉईड, कॉलरा व इतर जलजन्य रोग |
| स्टार्च | अपचन, पोट फुगणे, मधुमेहींमध्ये रक्तातील साखर वाढणे |
| युरिया | मूत्रपिंड व यकृतावर ताण, चयापचयातील बिघाड |
| डिटर्जंट | मळमळ, उलट्या, अतिसार, पचनसंस्थेची जळजळ |
| मीठ | उच्च रक्तदाबाचा धोका, हृदयविकारांमध्ये वाढ |
| साखर/ग्लुकोज | मधुमेहींसाठी हानिकारक, रक्तातील साखरेत वाढ |
| कृत्रिम रंग | त्वचेची ऍलर्जी, श्वसनविकार, अतिसंवेदनशीलता |
| वनस्पती तेल/वनस्पती तूप | पोषणमूल्य कमी होणे, गुणवत्तेत घट |



भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थांचे नियमित सेवन केल्यास शरीराला आवश्यक पोषक घटक पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. परिणामी कुपोषण, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे, मुलांच्या वाढीवर परिणाम होणे तसेच विविध दीर्घकालीन आजारांचा धोका वाढू शकतो. काही रासायनिक भेसळकारक पदार्थांचे दीर्घकाळ सेवन केल्यास मूत्रपिंड, यकृत आणि पचनसंस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात.

### भेसळ शोधण्यासाठी उपलब्ध चाचण्या व आधुनिक तंत्रज्ञान

दूध व दुग्धजन्य पदार्थांची शुद्धता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विविध पारंपरिक तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित चाचण्या उपलब्ध आहेत. या चाचण्यांच्या साहाय्याने भेसळकारक पदार्थांची उपस्थिती, दुधाची गुणवत्ता आणि पोषणमूल्यांचे परीक्षण करता येते.

1.पारंपरिक चाचण्या

- लॅक्टोमीटर चाचणी : दुधाचे विशिष्ट गुरुत्व (Specific Gravity) मोजण्यासाठी लॅक्टोमीटरचा वापर केला जातो. दुधामध्ये पाणी मिसळल्यास त्याची घनता कमी होते, त्यामुळे प्राथमिक स्तरावर भेसळीचा अंदाज घेता येतो.
- स्टार्च चाचणी :- दुधामध्ये आयोडीन द्रावण टाकल्यास निळा रंग निर्माण झाला तर स्टार्चची भेसळ असल्याचे समजते.
- डिटर्जंट चाचणी :- दूध हलविल्यानंतर असामान्य प्रमाणात फेस निर्माण झाल्यास डिटर्जंटच्या भेसळीची शक्यता असते.
- युरिया चाचणी :- रासायनिक अभिक्रियांद्वारे दुधातील युरियाची उपस्थिती तपासता येते.

2. उदयोन्मुख व आधुनिक तंत्रज्ञान

- बायोसेन्सर्स: दुधातील भेसळ काही मिनिटांत ओळखण्यासाठी संवेदनशील जैवसंवेदक विकसित केले जात आहेत.
- नॅनोतंत्रज्ञान आधारित सेन्सर्स: अत्यल्प प्रमाणातील भेसळकारक पदार्थांचेही अचूक निदान करण्यास सक्षम.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग: स्पेक्ट्रल डेटा आणि प्रतिमांचे विश्लेषण करून भेसळ शोधण्यासाठी AI-आधारित प्रणाली विकसित होत आहेत.
- स्मार्टफोन-आधारित निदान प्रणाली: स्मार्टफोन कॅमेरा, प्रतिमा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या साहाय्याने क्षेत्रीय स्तरावर जलद व कमी खर्चात भेसळ तपासणी करणे शक्य होत आहे.




भेसळ रोखण्यासाठी प्रभावी कायदे, नियमित तपासणी, आधुनिक निदान तंत्रज्ञान व FSSAI सारख्या नियामक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचबरोबर उत्पादकांची नैतिकता, विक्रेत्यांची जबाबदारी व ग्राहकांची जागरूकता हे देखील अन्नसुरक्षेचे महत्त्वाचे घटक आहेत. सुरक्षित, दर्जेदार आणि भेसळमुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी शासन, उद्योग क्षेत्रासह ग्राहकांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. अन्नसुरक्षा ही केवळ कायद्याची बाब नसून सार्वजनिक आरोग्याशी निगडित सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे "भेसळमुक्त दूध - निरोगी समाज" हे ध्येय साध्य करण्यासाठी प्रत्येक घटकाने सजग राहणे ही काळाची गरज आहे.

## अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) ची भूमिका

दूध व दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता, शुद्धता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (Food Safety and Standards Authority of India - FSSAI) महत्त्वाची भूमिका बजावते. FSSAI ची स्थापना अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, 2006 अंतर्गत करण्यात आली असून देशातील अन्नपदार्थांसाठी वैज्ञानिक मानके निश्चित करणे आणि अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे ही त्याची प्रमुख जबाबदारी आहे.

दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या बाबतीत FSSAI विविध गुणवत्ताविषयक निकष जसे की चरबी (Fat), स्निग्धेतर घनपदार्थ (SNF), सूक्ष्मजैविक गुणवत्ता आणि भेसळकारक पदार्थांच्या मर्यादा निश्चित करते. दूध संकलन, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक आणि विक्री या सर्व टप्प्यांवर अन्नसुरक्षा नियमांचे पालन होत आहे की नाही यावर देखरेख ठेवली जाते. FSSAI कडून देशभरात नियमित नमुना तपासणी, सर्वेक्षण आणि विशेष मोहिमा राबविल्या जातात. सणासुदीच्या काळात खवा, पनीर, तूप, मिठाई आणि इतर दुग्धजन्य पदार्थांची विशेष तपासणी करून भेसळयुक्त उत्पादनांवर कारवाई केली जाते. याशिवाय "Detect Adulteration with Rapid Test (DART)" सारख्या उपक्रमांद्वारे ग्राहकांमध्ये भेसळीविषयी जनजागृती करण्यात येते.

अन्न व्यवसायिकांसाठी परवाना (Licensing) व नोंदणी (Registration) प्रणाली राबविणे, अन्न हाताळणीविषयी प्रशिक्षण देणे, प्रयोगशाळांचे सक्षमीकरण करणे आणि भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे ही देखील FSSAI ची महत्त्वाची कार्ये आहेत.

## ग्राहकांनी घ्यावयाची काळजी

दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीमुळे आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी ग्राहकांनी खरेदी करताना व वापरताना काही महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जागरूक ग्राहक हे भेसळ रोखण्याचे एक प्रभावी माध्यम ठरू शकतात.

1. FSSAI प्रमाणित (Certified) स्रोतांकडून खरेदी करावी : दूध व दुग्धजन्य पदार्थ नेहमी FSSAI परवानाधारक (Licensed) किंवा प्रमाणित उत्पादक, नोंदणीकृत विक्रेते, सहकारी दुग्धसंस्था अथवा विश्वासार्ह ब्रँड्सकडूनच खरेदी करावेत. उत्पादनावरील FSSAI परवाना क्रमांक तपासल्यास उत्पादनाची वैधता आणि अन्नसुरक्षा नियमांचे पालन होत असल्याची खात्री करता येते.
2. पॅकेजवरील माहिती तपासावी : उत्पादनाची उत्पादन तारीख, वापरण्याची अंतिम तारीख, FSSAI परवाना क्रमांक आणि साठवणुकीच्या सूचना तपासूनच खरेदी करावी.
3. उत्पादनाच्या गुणवत्ता वैशिष्ट्यांकडे लक्ष द्यावे : दूध, तूप, पनीर, दही किंवा इतर दुग्धजन्य पदार्थांचा रंग, वास, चव व पोत यामध्ये असामान्य बदल आढळल्यास त्याचा वापर टाळावा.
4. योग्य साठवणूक करावी : दूध आणि दुग्धजन्य पदार्थ शिफारस केलेल्या तापमानात साठवावेत. अयोग्य साठवणुकीमुळे गुणवत्तेत घट होऊन आरोग्याचा धोका वाढू शकतो.
5. संशयास्पद उत्पादनांची तक्रार करावी : भेसळीचा संशय आल्यास स्थानिक अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन (FDA) किंवा FSSAI कडे तक्रार नोंदवावी.
6. अन्नसुरक्षेविषयी जागरूक राहावे : FSSAI आणि इतर शासकीय संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या अन्नसुरक्षाविषयक माहितीचा लाभ घेऊन भेसळीच्या नव्या प्रकारांविषयी माहिती ठेवावी.




कुक्कुटपालन (पोल्ट्री) उद्योग हा जगभरातील कृषी क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या भागांपैकी एक आहे. मानवी लोकसंख्येच्या सतत वाढीमुळे कृषी व्यवस्थेवरील ताण अधिक वाढणार आहे. 2050 च्या अखेरीस, पोल्ट्री मांसाची मागणी दुप्पट होईल आणि अंड्यांची मागणी 40% ने वाढण्याचा अंदाज आहे. हा अत्यंत मौल्यवान आणि स्वस्त प्रथिनांचा (प्रोटीन) एक महत्त्वाचा स्रोत आहे. परवडणाऱ्या प्रथिनांच्या, विशेषतः चिकन व अंड्यांच्या वाढत्या मागणीमुळे, उत्पादकता वाढवणे, प्राण्यांचे कल्याण सुधारणे, रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे व पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करणे यासाठी शेतकरी आणि उत्पादकांवर दबाव वाढत आहे.



डॉ सागर डुकरे,
M.V.Sc. & Ph.D. (Poultry Science), MBA, MA, PGDRDA
पशुवैद्यकीय अधिकारी पवैद चौक
ता. खालापूर, जि. रायगड

## पोल्ट्री 4.0 (Poultry 4.0) म्हणजे काय?

पोल्ट्री 4.0 म्हणजे कुक्कुटपालनामध्ये रीअल-टाइम मॉनिटरिंग (थेट देखरेख), ऑटोमेशन (स्वयंचलित प्रणाली), प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स (अंदाजात्मक विश्लेषण) व अचूक निर्णय घेण्यास सक्षम करणाऱ्या स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करणे होय. यामुळे कुक्कुटपालन हे कष्टाच्या व केवळ संकट आल्यावर उपाय करणाऱ्या पद्धतीकडून बदलून स्वयंचलित, अंदाज वर्तवणारे आणि अचूक बनत आहे. सामान्यतः, 'उद्योग 4.0' चा उद्देश विकेंद्रीकृत निर्णय प्रक्रिया व माहितीची पारदर्शकता यांसारख्या तत्त्वांची अंमलबजावणी करून, मानवी श्रमाच्या जागी स्वयंचलित व डिजिटल पद्धतीने चालणारे उत्पादन सुरू करणे हा आहे.

## पोल्ट्री 4.0 ला गती देणारी तंत्रज्ञाने:

- **आरोग्य देखरेख व रोगांचा अंदाज:**
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सेन्सर्स, कॅमेरे व पर्यावरणीय मॉनिटर्सच्या डेटाचे विश्लेषण करून रोगांचे लवकर निदान करते. पक्ष्यांच्या खाण्यापिण्यातील बदल, हालचाल, बसण्याची पद्धत, आवाज व विष्ठेची गुणवत्ता यांमधील सूक्ष्म बदल ओळखते, ज्यामुळे रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळेवर उपाययोजना करणे शक्य होते.
- **वर्तन व कल्याण मूल्यमापन:** AI-शक्तीवर चालणारी विजन सिस्टम व डीप लर्निंग मॉडेल्स प्राण्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवतात. पक्ष्यांची आक्रमकता, गर्दी, पंख गळणे, पंखांची फडफडाट आणि घरटी बनवण्याच्या पद्धती यांसारख्या गोष्टींवर लक्ष ठेवून त्यांना उत्तम राहणीमान दिले जाते आणि त्यांचा ताण कमी केला जातो.

पृष्ठ क्र. ५४



- **पर्यावरण नियंत्रण आणि अचूक शेती:** AI अल्गोरिदम हे IoT (इंटरनेट ऑफ थिंग्ज) उपकरणांच्या डेटाचा वापर करून तापमान, आर्द्रता, वायुवीजन (व्हेंटिलेशन), प्रकाश आणि अमोनिया व $CO_2$ सारख्या वायूंचे प्रमाण स्वयंचलितपणे नियंत्रित करतात. यामुळे शेडमधील वातावरण स्थिर राहते आणि पक्ष्यांचे आरोग्य व उत्पादकता सुधारते.
- **अंडी उत्पादन आणि गुणवत्तेचे व्यवस्थापन:** AI प्रणाली दैनंदिन अंडी उत्पादनावर लक्ष ठेवते, अंड्यांच्या वैशिष्ट्यांचे (आकार, स्वरूप, कवचाची गुणवत्ता) विश्लेषण करते आणि अंडी देण्याच्या सर्वोच्च कालावधीचा अंदाज लावते. अंड्यांचे उत्पादन आणि गुणवत्ता दोन्ही वाढवण्यासाठी ही प्रणाली आहारातील आणि वातावरणातील बदलांचे योग्य सल्ले देते.
- **खाद्य व्यवस्थापन आणि पुरवठा साखळी:** AI पक्ष्यांचे वय, वर्तन आणि पर्यावरणीय घटकांवरून खाद्याच्या गरजेचा अंदाज लावून खाद्याचा वापर सुयोग्य करते. यामुळे अन्नाचा अपव्यय कमी होतो, पोषणाचा समतोल राखला जातो आणि खाद्याच्या वापरावर रीअल-टाइम लक्ष ठेवले जाते. तसेच, मागणीचा अंदाज घेऊन पुरवठा साखळी (सप्लाय चेन) कार्यक्षमतेने व्यवस्थापित करते.
- **अनुवांशिक सुधारणा आणि प्रजनन (Breeding):** AI जलद वाढ, रोग प्रतिकारशक्ती आणि खाद्य कार्यक्षमता यांसारखी उत्तम वैशिष्ट्ये ओळखण्यासाठी जीनोमिक आणि फिनोटिपिक डेटाचे विश्लेषण करते. यामुळे अचूक प्रजनन कार्यक्रमांना गती मिळते आणि इनब्रीडिंगचे (अंतःप्रजनन) धोके कमी होतात.
- **रोबोटिक्स व ऑटोमेशन:** AI-चलित रोबोट्स शेतातील अंडी गोळा करणे, विष्ठा किंवा कचरा साफ करणे, पक्ष्यांचे वजन करणे, प्रतवारी करणे आणि शेडचे निर्जंतुकीकरण करणे यांसारखी कष्टाची कामे करतात. या प्रणालींमुळे स्वच्छता सुधारते, मजुरांवरील अवलंबित्व कमी होते आणि थकवा न येता सतत देखरेख करणे शक्य होते.

**पोल्ट्री 4.0 लागू करण्यातील आव्हाने**

- **सुरुवातीची मोठी गुंतवणूक:** पोल्ट्री 4.0 लागू करण्यातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे या प्रगत तंत्रज्ञानाचा सुरुवातीचा मोठा खर्च. स्मार्ट पोल्ट्री सिस्टमसाठी IoT उपकरणे, मशीन लर्निंग सॉफ्टवेअर, स्वयंचलित फीडर, हवामान नियंत्रण उपकरणे आणि मॉनिटरिंग कॅमेरे एकत्र करावे लागतात, ज्यासाठी मोठा भांडवली खर्च येतो.
- **डिजिटल साक्षरतेचा अभाव:** तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी शेतकऱ्यांमध्ये डिजिटल कौशल्ये आणि प्रशिक्षणाचा अभाव ही एक गंभीर मर्यादा आहे. अनेक पोल्ट्री शेतकरी, विशेषतः ग्रामीण किंवा निमशहरी भागातील, स्मार्ट शेती साधने किंवा डेटा ॲनालिटिक्सचा वापर करण्यास सरावलेले नसतात. त्यांना डिजिटल उपकरणे चालवणे किंवा सिस्टममधील त्रुटी सुधारणे कठीण जाऊ शकते.
- **डेटा गोपनीयतेची चिंता:** पोल्ट्री 4.0 सिस्टीम पक्ष्यांचे आरोग्य, शेडमधील वातावरण आणि व्यवसाय मेट्रिक्स यांसारखा प्रचंड डेटा गोळा करते. त्यामुळे डेटाची गोपनीयता आणि मालकी हे महत्त्वाचे मुद्दे बनतात. आपला डेटा कुठे साठवला जातोय, तो कोणाकडे शेअर होतोय आणि त्याचा कसा वापर केला जातोय याबद्दल शेतकरी अनभिज्ञ किंवा साशंक असू शकतात.
- **पायाभूत सुविधांची कमतरता:** पोल्ट्री 4.0 ची कार्यक्षमता मुख्यत्वे हाय-स्पीड इंटरनेट आणि विश्वसनीय वीज पुरवठ्यावर अवलंबून असते. परंतु, भारतासारख्या देशांतील अनेक ग्रामीण पोल्ट्री फार्म्समध्ये खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी, वारंवार वीज खंडित होणे आणि कमकुवत मोबाईल नेटवर्क यांसारख्या समस्या आहेत.
- **बदलाला विरोध:** सांस्कृतिक आणि मानसिक पातळीवर नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास होणारा विरोध देखील पोल्ट्री 4.0 चा वेग कमी करतो. अनेक पारंपारिक शेतकरी त्यांच्या अनुभवावर आणि जुन्या पद्धतींवर विसंबून असतात, त्यामुळे ते ऑटोमेशन आणि AI कडे संशयाने पाहू शकतात.

पृष्ठ क्र. ५५




## वास्तविक जगातील उदाहरणे (Real World Examples)

- भारतात व जागतिक स्तरावर अनेक नाविन्यपूर्ण कंपन्या पोल्ट्री फार्मिंगमध्ये AI आणि IoT चा वापर वाढवत आहेत. भारतात, e Feed व Stell apps यांसारखे स्टार्टअप्स लहान आणि मध्यम पोल्ट्री फार्म्सना स्मार्ट सेन्सर्स आणि डेटा विश्लेषणाद्वारे खाद्याचे व्यवस्थापन आणि पक्ष्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करत आहेत. Fasal आणि Krishi Hub पोल्ट्री हवामान नियंत्रण आणि पुरवठा साखळी जोडणीसाठी त्यांचे डिजिटल प्लॅटफॉर्म वाढवत आहेत, तर Animall पोल्ट्री शेतकऱ्यांना प्रजनन आणि आरोग्य उपायांसह जोडते. Ag Next मांस आणि अंड्यांच्या गुणवत्तेच्या मूल्यांकनासाठी कॉम्प्युटर विजन क्षेत्रात काम करत आहे.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर, Microsoft व Intel सारख्या कंपन्या पोल्ट्री फार्म्ससोबत काम करत आहेत. अमेरिकेतील TARGAN कंपनी पिल्लांचे लसीकरण व वर्गीकरणासाठी रोबोटिक्स व AI चा वापर करते, तर जर्मनीची Evonik Industries पोल्ट्री पोषण वृद्धीसाठी AI चा वापर करत आहे.

## पोल्ट्री 4.0 चे भविष्य: पुढे काय?

- AI-चलित अचूक प्रजनन: कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व जेनेटिक्स एकत्र येऊन पोल्ट्री प्रजननात क्रांती घडवत आहेत. मशीन लर्निंग मॉडेल्सद्वारे रोग प्रतिकारशक्ती व जास्त अंडी / मांस देणारे सर्वोत्तम पक्षी निवडणे सोपे झाले आहे.
- मोबाईल ॲप्सद्वारे दूरस्थ शेती: स्मार्टफोनमुळे शेतकऱ्यांना दूरवरूनही पोल्ट्रीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. IoT सिस्टीमशी जोडलेल्या ॲप्सद्वारे शेतकरी तापमान, आर्द्रता किंवा पक्ष्यांच्या हालचालींचे रीअल-टाइम अलर्ट मिळवू शकतात व प्रकाश किंवा व्हेंटिलेशन दूरवरूनही नियंत्रित करू शकतात.
- शाश्वत पोल्ट्री कचरा व्यवस्थापन: IoT-सक्षम कचरा व्यवस्थापन प्रणाली खत व इतर टाकाऊ पदार्थांचे व्यवस्थापन करून पोल्ट्री फार्म अधिक शाश्वत बनवत आहेत. या प्रणाली कचऱ्याचे प्रमाण आणि रचनेवर लक्ष ठेवतात आणि काही प्रकरणांमध्ये कचऱ्याचे सेंद्रिय खत किंवा बायोगॅसमध्ये रूपांतर स्वयंचलित करतात.
- CRISPR आणि जीन एडिटिंग: CRISPR-Cas9 सारखी जनुक-संपादन (gene-editing) साधने पक्ष्यांमध्ये बर्ड फ्लू किंवा न्यूकॅसल रोगासारख्या आजारांविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी विशिष्ट जनुकांमध्ये बदल करत आहेत.
- डिजिटल ट्विन्स: डिजिटल ट्विन म्हणजे सेन्सर्स व उपकरणांच्या रीअल-टाइम डेटाचा वापर करून तयार केलेली प्रत्यक्ष पोल्ट्री फार्मची एक 'आभासी प्रतिकृती' होय. याद्वारे शेतकरी प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी खाद्यातील बदल किंवा रोगाचा प्रादुर्भाव यांसारख्या परिस्थितींचे आभासी परीक्षण करू शकतात.
- कार्बन फूटप्रिंट मॉनिटरिंग: हवामानावरील परिणाम कमी करण्यासाठी पोल्ट्री फार्म्सचा कार्बन फूटप्रिंट ट्रॅक करण्यासाठी ब्लॉकचेन व AI तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. IoT सेन्सर्स मिथेन व अमोनियासारख्या उत्सर्जनाचे मोजमाप करतात.

पृष्ठ क्र. ५६




## दुकानातला माल आणि गोठ्यातला माल

कापड व्यापाऱ्याने महिनाभर दुकान बंद ठेवले, तरी परत आल्यावर कपड्यांचे गठ्ठे जिथे होते तिथेच मिळतात. त्यांना ताप येत नाही, त्यांचे वजन घटत नाही, आणि त्यांनी महिनाभर काहीही खाल्लेले नसते. पण तुमच्या गोठ्यातली गाय, म्हैस किंवा शेळी? ती रात्री तुम्ही झोपलेले असतानाही 'मीटर' चालू ठेवते. हीच आहे 'जिवंत इन्व्हेंटरी' (Living Inventory) — जी श्वास घेते, हालचाल करते, भावना ठेवते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, रोज खाते. दूध दर पडले, तुम्ही आजारी पडलात किंवा बाजारात मंदी आली, तरी तिची भूक मंदावत नाही.



डॉ. रोहित धुमाळ

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
तालुका पशुवैद्यकीय दवाखाना,
धर्माबाद, नांदेड

### हा व्यवसाय किती मोठा आहे?

भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. पशुधन क्षेत्र आता शेतीच्या एकूण मूल्यवर्धनाचा जवळपास एक-तृतीयांश वाटा उचलते, म्हणजे तुम्ही एका प्रचंड, वाढत्या उद्योगाचा भाग आहात.

| आकडा | मूल्य |
|---|---|
| दूध उत्पादन (2023-24) | 239.30 दशलक्ष टन (+3.78%) |
| दरडोई दूध उपलब्धता | 471 ग्रॅम/दिवस |
| मांस उत्पादन (2023-24) | 10.25 दशलक्ष टन (+4.95%) |
| शेती GVA मध्ये पशुधनाचा वाटा | 24.32% (2014-15) → 30.38% (2022-23) |
| देशातील एकूण पशुधन (20 वी पशुगणना, 2019) | 535.78 दशलक्ष |
| गाई-बैल / म्हशी / शेळ्या | 192.49 / 109.85 / 148.88 दशलक्ष |

मोठा उद्योग म्हणजे सोपा उद्योग नव्हे, या लेखात पाहूया 'खाणारी इन्व्हेंटरी ते कमाई योग्य मशीन कशी बनवायची!'

पृष्ठ क्र. ५७

### 1. मशीन विरुद्ध प्राणी: फॅक्टरीचे नियम गोठ्यात चालत नाहीत

नवखा फॅक्टरी मॅनेजर डेअरी फार्मवर आला की त्याची अवस्था 'पाण्यात पडलेल्या मांजरासारखी' होते. कारण नट-बोल्टची मशीन व जिवंत प्राणी यांत खूप फरक आहे.

❑ 'पॉझ बटण' नाहीच!

कारखान्यात मालाला मागणी नसेल तर मेन स्विच बंद केला की वीज बिल शून्य. पण गाईच्या शरीरावर 'पॉझ बटण' निसर्गाने बनवलेलेच नाही. मंदी असो, महापूर असो की खिशात पैसे नसोत, तिचे 'मेटाबॉलिक इंजिन' 24 तास धडधडत राहते.'कॉपी-पेस्ट' चालत नाही

फॅक्टरीतून निघालेली पहिली व हजारावी कार हुबेहूब सारखी असते. पण तुमच्या गोठ्यातल्या 100 गाई म्हणजे 100 वेगवेगळ्या 'व्यक्ती' आहेत: एकीची पचनशक्ती दांडगी, दुसरीचे पोट नाजूक; एकीला 40°C सहन होते, दुसरीला पंखा बंद होताच धाप लागते. इथे प्रत्येक जनावराच्या डोळ्यात बघून निर्णय घ्यावा लागतो.

### एका नजरेत फरक

| मुद्दा | निर्जीव मशीन / माल | जिवंत प्राणी |
|---|---|---|
| बंद ठेवता येते का? | हो, स्विच ऑफ, खर्च थांबतो | नाही, चारा, पाणी, औषध रोज |
| साठवण खर्च (Holding Cost) | नाममात्र (भाडे) | रोजचा चारा-खाद्य, सर्वात मोठा खर्च |
| एकसारखेपणा | 100% सारखे (Batch) | प्रत्येक जनावर वेगळे (Individual) |
| किंमत कशी कमी होते | हळूहळू घसारा | एका रात्रीत मृत्यू शक्य |
| नादुरुस्त झाल्यावर किंमत | भंगार किंमत मिळते | शून्य; उलट विल्हेवाट खर्च |
| एकाकडून दुसऱ्याला बिघाड | पसरत नाही | साथीचा रोग संपूर्ण कळपात पसरतो |

### 2.'खाणारी मालमत्ता' व कॅश फ्लोचा सापळा:


सिमेंटच्या 500 गोण्या महिनाभर पडून राहिल्या तर खर्च फक्त गोदामाचे भाडे. गोण्यांना सकाळी नाश्ता लागत नाही. पण तुमची गाय, म्हैस, शेळी रोज सकाळी उठते आणि हक्काने चारा मागते, ती विकली जावो वा न जावो, दूध असो वा नसो.

• सापळा 1: पहिले 20 महिने फक्त खर्च

शेळीपालनात नवीन आलेले बहुतेक उद्योजक इथेच अडकतात. शेळ्या आधी 6 महिने स्थिरावतात, मग 5 महिने गाभण राहतात, आणि पिल्ले विक्रीयोग्य होईपर्यंत आणखी 6-9 महिने लागतात. या संपूर्ण काळात पैसा फक्त बाहेर जातो.

**पहिल्या उत्पन्नाआधी २० महिन्यांत ₹३.३५ लाख खिशातून बाहेर**

१० शेळ्या + १ बोकड युनिट · एकत्रित रोख स्थिती (उदाहरणादाखल गणित)





गृहीत: खरेदी ₹१.१ लाख · चारा ₹८०० प्रति शेळी/महिना (गाभण काळात +२०%) · पिल्लांवर ₹३०० प्रति पिल्लू/महिना

*(उदाहरणादाखल गणित · 10 शेळ्या + 1 बोकड, 20 महिने)*

ज्याच्याकडे या काळाचा राखीव पैसा (Buffer Money) नसतो, तो 15 व्या महिन्यात हवालदिल होतो आणि अर्धवट वाढलेली पिल्ले कवडीमोल भावाने विकतो. पहिली विक्री देखील एकूण खर्चाचा फक्त एक तृतीयांश भाग भरून काढते.

### सापळा 2: भाकड काळाचा बोजा

गाय 365 दिवस दूध देत नाही. साधारण 300 दिवस दूध दिल्यानंतर 60-90 दिवस ती भाकड असते. नवीन उद्योजकाची एक्सेल शीट 365 दिवसांचे उत्पन्न मांडते, पण पोटात वासरू वाढत असल्याने या काळात आहार कमी करता येत नाही.




*उदाहरणादाखल गणित · एक संकरित गाय, एक वेत (12 महिने)*


यशस्वी पशुपालक दुधाच्या पैशातूनच या 'बिन-उत्पन्नाच्या दिवसांची' तरतूद आधी बाजूला काढतो. जो हे करत नाही, त्याच्यासाठी भाकड गाय पांढरा हत्ती ठरते.

"धडा: इतर उद्योगात खेळते भांडवल 'विस्तारासाठी' असते; पशुपालनात ते जनावरांना 'जिवंत ठेवण्यासाठी' असते. गोठ्याच्या भिंतींना रंग नाही दिला तरी चालेल, पण 6 महिन्यांच्या चाऱ्याचा पैसा बँकेत असल्याशिवाय पहिले जनावर गोठ्यात उतरवू नका."

## 1. घसारा विरुद्ध मृत्यू: हृदयाचा ठोका चुकवणारे गणित

शेतकरी मित्रांनो, जेव्हा एखादा चार्टर्ड अकाऊंटंट किंवा एमबीए झालेला मॅनेजर तुमच्या डेअरीचा ताळेबंद (Balance Sheet) बनवतो, तेव्हा त्याच्यासाठी 'नुकसान' हे फक्त एका आकड्याच्या स्वरूपात असते. लॅपटॉपवर काम करताना तो सहज एका रकाण्यातून 50 हजार रुपये वजा करतो. पण गोठ्यात राबणाऱ्या पशुपालकासाठी ते 50 हजार म्हणजे केवळ एक आकडा नसून, संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करणारा एक मोठा 'आर्थिक धक्का' असतो!

कॉर्पोरेट जगाचे अर्थशास्त्र आणि आपल्या गोठ्याचे अर्थशास्त्र यात एक अत्यंत मूलभूत आणि जीवघेणा फरक आहे, जो अनेक नवीन व्यावसायिक समजून घेण्यात कमी पडतात. हा फरक म्हणजे 'घसारा' आणि 'मृत्यू' (Mortality) यातील तफावत.




*उदाहरणा दाखल गणित · ट्रॅक्टर: दरवर्षी १०% घसारा; शेळी: अचानक मृत्यू*

पशुपालन आणि डेअरी व्यवसायात उतरताना अनेक तरुण उद्योजक कागदावर गणिते मांडतात. या गणितांमध्ये फॅक्टरीच्या नियमानुसार 10% 'घसारा' (Depreciation) दाखवला जातो. म्हणजे एखादे मशीन दरवर्षी थोडे थोडे जुने होते आणि त्याची किंमत कमी होते. पण, पशुपालन हा निर्जीव मशिनींचा नाही, तर जिवंत जनावरांचा (Biological) व्यवसाय आहे. इथे 'घसारा' नसतो, इथे थेट 'मृत्यू' (Mortality) असतो. आणि हा मृत्यू जेव्हा अचानक गोठ्यात धडकतो, तेव्हा तो जो आर्थिक भूकंप घडवून आणतो, त्यालाच व्यावसायिक भाषेत 'कॅपिटल शॉक' (Capital Shock) असे म्हणतात.

उर्वरीत भाग : पुढील अंकात




डॉ. सुनिता चौगुले : सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (जिवाणू लस विभाग), पजैपनिसं
डॉ. याहयाखान पठाण : सहआयुक्त पशुसंवर्धन, पजैपनिसं
डॉ. सदाशिव बेडक्याळे : उपायुक्त पशुसंवर्धन (जिवाणू लस विभाग), पजैपनिसं
डॉ. प्रकाश धामण्णापाटील : पशुधन विकास अधिकारी (जिवाणू लस विभाग), पजैपनिसं
डॉ. ऋषीकेश काळे : पशुधन विकास अधिकारी (जिवाणू लस विभाग), पजैपनिसं
डॉ. ज्योती माने : पशुधन विकास अधिकारी (जिवाणू लस विभाग), पजैपनिसं

पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण आधारस्तंभ असून, पशुआरोग्याचे संरक्षण हे शाश्वत पशुपालनासाठी अत्यंत आवश्यक आहे. संसर्गजन्य रोगांचे अचूक निदान, प्रभावी नियंत्रण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना यासाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज बनली आहे. बदलत्या वातावरणात रोगकारक सूक्ष्मजीवांमध्ये होणारे जनुकीय बदल, नवीन जिवाणू प्रजातीचा उदय व प्रचलित प्रतिजैविकांस प्रतिरोध यांसारख्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अत्याधुनिक जैवतंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक आहे.

पारंपरिक सूक्ष्मजीवशास्त्रीय व जैवरासायनिक पद्धतींनी जिवाणूंची ओळख पटवली जात असली तरी, आधुनिक जनुकीय विश्लेषणावर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे रोगकारक जिवाणूंची अधिक अचूक, जलद आणि विश्वासार्ह ओळख करणे शक्य झाले आहे. विविध जिवाणू प्रजातीच्या जनुकीय वैशिष्ट्यांचे विश्लेषण हे आज पशुवैद्यकीय संशोधन, रोगनिदान आणि लसनिर्मिती क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण साधन बनले आहे.

यामध्ये Polymerase Chain Reaction (PCR), Gene Sequencing (GS), Whole Genome Sequencing (WGS) आणि Multi-locus Sequence Typing (MLST) यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांचा वापर केला जातो. त्या माध्यमातून जिवाणूंची अचूक ओळख, जनुकीय रचना, रोगनिर्मितीशी संबंधित घटक, प्रतिजैविक प्रतिकारशक्तीशी संबंधित जनुके तसेच उत्क्रांती दरम्यान होणाऱ्या जनुकीय बदलांचा सखोल अभ्यास करणे शक्य होते. परिणामी रोगजंतूंची अचूक ओळख, सूक्ष्म जंतूंचे अलगीकरण व लस निर्मिती करीता मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेणे सोयीचे ठरत असून प्रभावी नियंत्रणात्मक उपाययोजना व अधिक परिणामकारक लस विकासासाठी हे तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे ही महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत कार्यरत असलेली एक अग्रगण्य जैविक उत्पादन करणारी संस्था असून, पशुधनासाठी सुरक्षित, प्रभावी व गुणवत्तापूर्ण लसमात्रा व जैविक उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. लस निर्मिती, गुणवत्ता नियंत्रण व संशोधन प्रक्रियेला अधिक सक्षम करण्यासाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेत आधुनिक जनुकीय विश्लेषण तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे उपयोग करण्यात येत असून Polymerase Chain Reaction (PCR), Gene Sequencing (GS) व Whole Genome Sequencing (WGS) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांच्या माध्यमातून लस निर्मितीमध्ये ...

पृष्ठ क्र. ६०

त्यामुळे वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित आणि जनुकीय स्तरावर तपासलेल्या जिवाणू लस प्रजातीच्या (Vaccine Strain) आधारे शेतकऱ्यांसाठी अधिक सुरक्षित, प्रभावी आणि लक्षित रोग प्रतिबंध करणाऱ्या लसमात्रा उपलब्ध करून देणे शक्य होईल.

### आधुनिक जनुकीय विश्लेषण तंत्रज्ञानाचे महत्त्व:

- या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून: जिवाणू लस प्रजातीची जनुकीय ओळख व प्रमाणीकरण अधिक अचूकपणे करता येते, ज्यामुळे लसमात्रेची विश्वासार्हता सुनिश्चित होते.
- उत्पादन प्रक्रियेदरम्यान जिवाणू लस प्रजातीची शुद्धता, स्थिरता आणि सातत्य तपासून जैविक उत्पादनांची गुणवत्ता व परिणामकारकता कायम ठेवता येणार.
- या संशोधनातून प्राप्त झालेली जनुकीय माहिती भविष्यात क्षेत्रीय जिवाणू प्रजातीमध्ये होणारे जनुकीय बदल व उत्परिवर्तन (Mutations) ओळखण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संदर्भ आधार म्हणून उपयोगी ठरणार आहे.
- विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये आढळणाऱ्या जिवाणू प्रजातीच्या जनुकीय वैशिष्ट्यांचा अभ्यास करून प्रदेश विशिष्ट लसीकरण धोरण व लक्षित लसीकरण उपाययोजना विकसित करण्यास मदत होणार आहे.

याशिवाय, या संशोधनातून प्राप्त झालेली सविस्तर जनुकीय माहिती वैज्ञानिक समुदायासाठी उपलब्ध झाल्यास, तुलनात्मक जनुकीय अभ्यास, रोग संनिरीक्षण, नवीन निदान पद्धती व जैव तंत्रज्ञान आधारित उपाययोजनांच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे येथील जनुकीय विश्लेषणावर आधारित संशोधन हे केवळ लस गुणवत्तावृद्धी व उत्पादन प्रक्रियेच्या मजबुतीकरणासाठीच नव्हे, तर भविष्यातील पशुधनातील नवीन आजाराचे निदान व संनिरीक्षण यांसारख्या आव्हानांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून सामोरे जाण्यासाठी भक्कम आधार निर्माण करणारे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

पशुधनातील घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार यांसारख्या महत्त्वाच्या जीवाणूजन्य रोगांविरुद्ध प्रभावी लस निर्मितीमध्ये पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. लस निर्मितीची गुणवत्ता, सुरक्षितता व परिणामकारकता अधिक सक्षम करण्यासाठी संस्थेमध्ये विविध महत्त्वाच्या जिवाणू लस प्रजातीचे आधुनिक जनुकीय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विश्लेषण करण्यात आलेले आहे. या अंतर्गत घटसर्प करीता *Pasteurella multocida* P52, फऱ्या करीता *Clostridium* chauvoei आणि आंत्रविषार करीता *Clostridium perfringens* Type D या जिवाणू लस प्रजातीचे Polymerase Chain Reaction (PCR) आधारित परीक्षण, Gene Sequencing व Whole Genome Sequencing (WGS) द्वारे विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासामध्ये संबंधित जिवाणू लस प्रजातीची जनुकीय ओळख, स्थिरता व वैशिष्ट्यांचे सखोल विश्लेषण "गुजरात बायोटेक्नॉलॉजी रिसर्च सेंटर (GBRC), गांधीनगर" या राष्ट्रीय पातळीवरील नामांकित संशोधन संस्थेच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

*Pasteurella multocida* P52, *Clostridium* chauvoei व *Clostridium perfringens* Type D जिवाणू प्रजातीच्या विशिष्ट जनुकांचे सिक्वेन्सिंग केल्यानंतर प्राप्त झालेल्या अनुक्रमाचे त्याच्या संदर्भ अनुक्रमा बरोबर 100% जनुकीय अनुक्रम साम्य आढळून आले असून संबंधित जिवाणू लस प्रजातीची अचूक जनुकीय ओळख व प्रमाणीकरण निश्चित करण्यात मदत झाली आहे.

या संशोधनामुळे पशुधनातील सुरक्षित, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण लसमात्रांच्या विकास आणि निर्मितीसाठी भक्कम वैज्ञानिक आधार उपलब्ध होत असून अशा प्रकारची जनुकीय विश्लेषण व संशोधनातून लस निर्मिती करणारी भारतातील एकमेव पशुवैद्यकीय लसमात्रा निर्माण करणारी संस्था ठरली आहे. पशुधन आरोग्य क्षेत्रातील संशोधन, जैवतंत्रज्ञानाचा वापर व आधुनिक लस विकासाला चालना देण्यासाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे सोबत विविध राष्ट्रीय संशोधन व शैक्षणिक संस्थांनी संशोधन सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे.

संस्थेकडे उपलब्ध असलेला लस निर्मितीतील प्रदीर्घ अनुभव, तांत्रिक कौशल्य, विकसित होत असलेली बौद्धिक संपदा व आधुनिक जैवतंत्रज्ञानावर आधारित संशोधन क्षमता यामुळे संयुक्त संशोधनासाठी नवीन संधी उपलब्ध होत आहेत. CSIR–नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (NCL), पुणे, Symbiosis School of Biological Science (SSBS), Symbiosis International Deemed University, पुणे तसेच जैविक उत्पादन क्षेत्रातील विविध नामांकित खाजगी संस्था व उद्योग समूह पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे सोबत संशोधन सहकार्य करण्यास इच्छुक आहेत.

या सहकार्याद्वारे पशुरोग निरीक्षण, आधुनिक निदान तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आधारित उपाययोजना आणि आधुनिक लस विकास व संशोधनाच्या क्षेत्रात नवीन दिशेने वाटचाल होत आहेत. अशा सहकार्यामुळे अत्याधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान व पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे मधील पशुरोग व लस निर्मितीचा सखोल अनुभव यांचा प्रभावी समन्वय साधला जाणार आहे. अशा प्रकारचे राष्ट्रीय स्तरावरील संशोधन सहकार्य संस्थेला आधुनिक जैवतंत्रज्ञानाच्या तसेच पशुरोग आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यास व पर्यायाने लस संशोधन व निर्मिती या "आत्मनिर्भर भारत" च्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास सक्षम करत आहे.

**संशोधनातून नवकल्पकता..**
**नवकल्पनेतून आत्मनिर्भरता!**

# पशु तपासणीत सुरक्षितता आणि सुलभता महत्वाचीच



पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून पशु तपासणी करताना दवाखान्यात असणाऱ्या ट्रॅव्हिस किंवा क्रेट म्हणजे लोखंडी खोड्याचा वापर सहज होतो. अनेक वेळा पशु तपासणी ग्रामीण भागात, गोठ्यात, प्रक्षेत्रावर करताना प्रकारची सोय उपलब्ध असणे अशक्य असते. गोशाळा, मोठ्या संख्येची पशु प्रक्षेत्रे या ठिकाणी नियमित पशु तपासणी गरजेची असली तरी चांगल्या प्रकारे जनावरांना तपासणीच्या वेळी बांधण्यासाठी मजूर वर्गाची कमतरताही दिसून येते.



तापट जनावरे, गोठ्यातील बांधलेली जनावरे, पशुचिकित्सा शिबिरे, लसीकरण, दैनंदिन खरारा यासाठी नेहमी " लाथरोधक " साधन वापरा. खर्च रुपये 400.00/-, नेहमी वापरून स्वत:, पशुवैद्यक इजा होऊ देवू नका व अंगावर शेणही पडून कपडे भरणार नाहीत यासाठी काळजी घ्या.

'फायबर इ्रम'चा सुरक्षित व प्रभावी वापर

- सोपी रचना व वाहतूक
- उत्कृष्ट सुरक्षितता, स्वच्छतेस सोपे
- महिला पशुवैद्यकांसाठी उपयुक्त



प्राध्यापक डॉ. नितीन मार्कंडेय
माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक
(पशुप्रजनन शास्त्र विभाग) पशुवैद्यकीय
महाविद्यालय, परभणी मो. 9422657251

दुधाळ जनावरांच्या बाबतीत प्रजनन तपासणी करताना मागच्या बाजूने पशुवैद्यकाचा जनावराशी संपर्क येतो. आणि प्रतिकार करणाऱ्या जनावरांकडून बाजूच्या दिशेने उगारण्यात आलेली पायाची लाथ पशुवैद्यकास धोक्याची ठरू शकते. कडक खुरांचा पशुवैद्यकाच्या पायावर आणि प्रामुख्याने नडगीच्या हाडावर, गुडघ्यावर, मांडीवर होणारा आघात अस्थिभंगासाठी पूरक ठरतो.

बहुतांश जनावरात लाथ मारण्याची अजिबात सवय नसते, मात्र मानसिक अस्वस्थता, होणाऱ्या तपासणीबाबत अनिश्चितता, वेदना होण्याची शक्यता अशा अनेक कारणांमुळे झालेल्या प्रहारमुळे पशुवैद्यकास इजा पोहोचू शकते. पशुवैद्यकीय शिक्षणात जनावरांची प्रजनन तपासणी योग्यप्रकारे करण्यासाठी प्रात्यक्षिक प्रशिक्षणे एकाचवेळी अनेक विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जातात प्रत्येक विद्यार्थ्यासाठी सुरक्षित खोड्यामध्ये असणारे पशुधन उपलब्ध असणे अजिबात अपेक्षित नसते. प्रशिक्षणाच्या कालावधीत बेसावध असणारी सगळी तरुण मंडळी जनावरांकडून होणाऱ्या लाथेच्या प्रकारास सामोरी जात असतात.

सुरक्षित आणि सुलभ पशु तपासणीसाठी अत्यंत कमी खर्चात व सहज उपलब्ध होणारी सोय शेतकरी - पशुपालकांच्या कल्पनाशक्तीतून निर्माण करण्यात आलेली आहे. घरातील जुन्या प्लास्टिक खुर्च्या , प्लास्टिक स्टूल यांचा वापर पशु तपासणीसाठी अनेक वेळा केला जातो. मात्र, याहीपेक्षा सुलभ अशा फायबर इ्रमचा वापर करता येणे अधिक सोयीस्कर ठरते. सर्व द्रव रसायनांचे फायबर इ्रम वापरात आणून तपासणी अतिशय सुलभपणे करता येऊ शकते असे दिसून आले आहे.

पृष्ठ क्र. ६२

महापशुधन वार्ता

# अमरावती जिल्ह्यातील गायरानावरील पक्षी जैवविविधता



प्रत्येक गावानजीक गायरान असते. आणि त्या गायरानावर एक समृद्ध जैवविविधता नांदत असते. या जैवविविधतेच्या साखळीमधील महत्वाची कडी म्हणजे पक्षी. पक्षी म्हंटले की आपल्याला केवळ गाई म्हशींच्या अंगाखांद्यावर दिसणारा गायबगळा (Cattle Egret) डोळ्यासमोर येतो. पण त्या व्यतिरीक्त खुपसे पक्षी त्या गायरानाचा महत्वाचा भाग असतात. अमरावती जिल्हा हा जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रदेश असून येथे वनक्षेत्र, शेती, पाणथळ जागा, गायरान, माळरान आणि विविध प्रकारची मानवी-वापरातील मोकळी क्षेत्रे आढळतात. या अधिवासांपैकी गायरान म्हणजे चराई क्षेत्रांकडे अनेकदा केवळ पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देणारी जमीन म्हणूनच पाहिले जाते. मात्र प्रत्यक्षात ही क्षेत्रे अनेक पक्ष्यांसाठी अन्न, निवारा आणि खाद्यशोधासाठी महत्त्वाची अधिवासस्थळे असतात.



किरणसिंह प्रकाशसिंह मोरे
सहाय्यक पशुधन अधिकारी
फिरता पशुवैद्यकीय दवाखाना,
चिखलदरा, अमरावती

गेल्या वीस वर्षात अमरावतीची पक्षीसूची (चेकलिस्ट) अद्यावत करतांना मी गायरानावरील पक्ष्यांवर विशेष लक्ष दिले. आणि मागील वर्षीपर्यंत एकूण 43 प्रकारच्या पक्षी प्रजातींची नोंद गायरानावर केली. अमरावती जिल्ह्यातील विविध गवताळ व खुल्या अधिवासांमध्ये विविध प्रकारचे निवासी तसेच स्थलांतरित पक्षी आढळतात. अमरावती जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे बारा हजार चौरस किलोमीटर आहे. अमरावती जिल्ह्यात मेळघाटातील डोंगराळ वनप्रदेश तसेच विस्तृत सपाट प्रदेशांचा समावेश होतो. त्यातील वनक्षेत्र सुमारे साडेतीन हजार. अमरावतीच्या पोहरा मालखेड वनपरीक्षेत्रातील व मेळघाट जवळील असलेल्या गावानजीकचे गायरान पक्ष्यांनी नेहमीच समृद्ध दिसून येतात.

तसे तितर (Francolin) लावा (Quail) हे आपल्या नियमित परिचयाचे. पण काही पक्षी प्रजाती ईथे नेहमीच दुर्लक्षित राहतात. त्यापैकी एक म्हणजे चंडोल आणि तीरचीमणी प्रजाती. गायरानावर प्रामुख्याने चंडोल(Lark)दिसून येतात. ज्यांची घरटी जमिनीवरच असतात. चंडोल मधील एकूण सहा प्रजाती स्थानिक तर एक चिमणीसारखी दिसणारी ग्रेटर शॉर्टटोड लार्क स्थलांतरीत असते. हिवाळ्यात तीस चाळीसचा असणारा थवा एप्रिल पर्यंत चारशेपर्यंत पोहचतो. परतीचा प्रवास करण्यासाठी जेव्हा पक्षी एकवटतात तेव्हा ही संख्या आणखी वाढते. हिमाचल भागातून नियमितपणे स्थलांतर करून येत असतात. याउलट तीरचिमणीचे (पिपिट)आहे. त्यांची एक प्रजाती स्थानिक आहे तर ईतर पाच प्रजाती स्थलांतरीत आहे. चंडोल आणि तीरचीमणी या प्रजाती दुरून एकसारख्या आणि चिमण्यां सारख्याच दिसतात. त्यामुळे त्यांना ओळखण्यात बऱ्याचदा गफलत होते. सावर्डी, तिवसा क्षेत्रातील गायरानामध्ये चंडोल दिसून येतात. कारण या भागात माळरानाचा भाग अजूनही टिकून आहे. त्यामुळेच या भागात मेंढपाळ अधिक दिसतात. ईथल्या भागातील चंडोल पक्षी यांच्याशी एकरूप झालेले आढळतात. ईथे चंडोलच्या बऱ्याचश्या घरट्यात मेंढीचे केस आढळून आले. तसेच लार्क प्रजातीवर आठ वर्षाअगोदर आम्ही आंतरराष्ट्रीय माहितीपट बनविला होता. त्यात मेंढपाळ वाजवत असलेल्या शिट्टीची नक्कल (मिमिक्री) सुद्धा साईक्सचा चंडोल(Syke's Lark) करतांना आम्हाला आढळला.

पृष्ठ क्र. ६३


साईकचा चंडोल ( Syke's Lark)





भारतीय धाविक (Indian Courser)

कोतवाल (Drongo) हा पक्षीविश्वातील निडर पक्षी. काळा कुळकुळीत असाणाऱ्या या पक्षाचे वर्तन नावाप्रमाणेच आहे. त्याच्या घरट्याजवळ कुठलाही मोठा पक्षी आला कि त्याला तो हाकलून लावतो. मग तो गरुडासारखा मोठा का असेना! म्हणून त्याच्या जवळ राहण्यात इतर पक्षी स्वत:ला सुरक्षित समजतात आणि प्रजाती घरटे बांधण्यास प्राधान्य देतात. खाटिकच्या (Shrike) तीन स्थानिक तर एक स्थलांतरीत प्रजाती गायरानावर दिसून येते. खाटिक पक्षी आपले खाद्य जसे उंदीर, सरडा मारून झाडाच्या काटेला टांगून ठेवतो. प्रजनन काळामध्ये मादीला आकर्षित करण्यासाठी नर ही कृती करत असतो. आणि त्याच्या या सवयीमुळे त्याला मराठी खाटिक असे नाव पडले आहे. विदर्भातील गायरानावर मोठ्या प्रमाणात हिवर आणि बाभूळीचे छोटी झुडुपे असतात. तेव्हा खाटिक हा या परिसंस्थेमध्ये प्रामुख्याने दिसतो.

गायरान व माळरानासारख्या खुल्या अधिवासांमध्ये गुरांची उपस्थिती व त्यांच्या हालचालींमुळे निर्माण होणारे सूक्ष्म बदल पक्ष्यांच्या खाद्यशोधावर परिणाम करू शकतात. गायबगळ्याच्या आहारात गाई म्हशीवरील गोचीडाचाही समावेश असतो. तसे गुरे व बगळे सोबत आढळतात. गुरे स्वछंदपणे चरताना त्यांच्या फिरण्याने गवताबाहेर येणारे किडे, नाकतोडे बगळे मटकावतात.

आपल्याला बऱ्यापैकी माहिती असलेले मैना (Common Myna) साळुंकी (Starling) सारखे पक्षी गुरांच्या शेणातील किडे टिपताना गायरानावर दिसतात. गायरानावर गुरांचे शेण हे पक्ष्यांसाठी अप्रत्यक्षपणे महत्त्वाचे खाद्यस्रोत निर्माण करणारे घटक असते. गुरे गायरानावर चरतात आणि तिथे शेण टाकतात. शेणामध्ये सेंद्रिय पदार्थ असल्यामुळे त्यावर व त्यामध्ये विविध गोमाश्या, शेणभुंगे, भुंगे, मुंग्या, माशांच्या अळ्या, इतर अपृष्ठवंशी (Invertebrate) आकर्षित होतात. हे कीटक अनेक पक्ष्यांसाठी खाद्य बनतात. गायरानाच्या परिस्थितीनुसार खालील पक्षी शेणाभोवती निर्माण होणारे कीटक किंवा इतर अपृष्ठवंशी खाताना दिसू शकतात. गायबगळा गुरांच्या हालचालींमुळे बाहेर पडणारे कीटक तसेच शेणाभोवतीचे कीटक शोधतो. मैना विविध कीटक व अळ्या खाते. पांढऱ्या चिमणीसदृश / वॅगटेल गटातील पक्षी उघड्या जमिनीवरील लहान कीटकांचा शोध घेतात. स्टार्लिंग, ड्रोंगो कीटकभक्षी पक्षी उपलब्धतेनुसार कीटकांचा वापर करू शकतात. सर्व तऱ्हेचा आहार घेणारे कावळे तर नेहमीच शेणाभोवती उपलब्ध होणारे विविध अपृष्ठवंशी व इतर खाद्यघटकाच्या शोधात असतात. नियंत्रित गुरेचराईमुळे गायरानावरील गवताची उंची आणि घनता संतुलित राहण्यास मदत होते. त्यामुळे अतिउंच गवताची वाढ नियंत्रित होऊन मोकळ्या जमिनीचे व कमी उंचीच्या गवताचे क्षेत्र उपलब्ध राहते. अशा अधिवासाच्या विविधतेच्या गवताळ प्रदेशातील पक्ष्यांच्या खाद्यशोध वर्तनावर आणि अधिवास वापरावर परिणाम होऊ शकतो. गायबगळा, मैना, लार्क, वॅगटेल, ड्रोंगो यांसारख्या पक्ष्यांसाठी जमिनीवर किंवा गवतामध्ये असलेले कीटक शोधणे काही परिस्थितींमध्ये सोपे होऊ शकते.

अमरावती जिल्ह्यातील एकूण 14 तालुके आहे. बदलत्या काळाप्रमाणे गायरानाची संख्या झपाट्याने कमी होत आहे. तसे पक्ष्यांच्या प्रजाती मधील घडलेले बदल अधिक ठळक होतात. जसे पुर्वी गायरानावर प्रामुख्याने दिसणारा धाविक (Indian Courser) हा पक्षी आता क्वचितच दिसतो. IUCN च्या रेडलिस्ट नुसार Near Threatened (NT) संकट समीप या श्रेणीत त्याला समाविष्ट करण्यात आले आहे. अमरावती शहरालगत गावातल्या गायरान पक्ष्यांच्या दृष्टीने जास्त प्रभावित झालेले दिसते.

तिवसा तालुक्यामध्ये माळरानाचा भाग अधिक असल्याने ईथले गायरान समृद्ध आहे. मोर्शी वरुड भागात शेतीचे संक्रमण अधिक दिसून येते. तसेच धारणी चीखलदरा भागात घनदाट जंगलालगतची गावांमधील गायरान पुर्णपणे वेगळी ठरतात. गायरानाचा गुरे आणि पक्ष्यांच्या दृष्टीने विचार करता ते एकमेकांना पूरकच दिसून येतात. किंबहुना गायारानावरील पक्षीप्रजाती पाळीव गुरांना लाभदायीच ठरलेली दिसते. भविष्यात गायरानावर जैवविविधतेच्या दृष्टीने अधिक अभ्यास करणे महत्वाचे आहे.

पृष्ठ क्र. ६४



जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सांगली नूतन इमारतीचे उद्घाटन नुकतेच मा. पालकमंत्री ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते व माजी मंत्री आ. डॉ सुरेश खाडे, आ. इद्रिस नाईकवाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली श्री. विशाल नरवाडे, सभापती कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध शाळा समिती श्रीमत्ती सावित्री तमन्ना गौडा रवी पाटील ह्यांच्या उपस्थितीत झाले.

## सोमठाणा : पशुपालकांना शास्त्रीय चारा व्यवस्थापनाचे मार्गदर्शन



भोकर, :नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध चाचाचा शास्त्रीय व कार्यक्षम वापर करून पशुधनास सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मा. जिल्हाधिकारी, नांदेड व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या संकल्पनेतून व नियोजनातून जिल्हाभर 'चारा साक्षरता अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत दिनांक 09 ऑक्टोबर 2026 रोजी मौजे सोमठाणा, ता. भोकर, जि. नांदेड येथे पशुसंवर्धन विभाग, भोकर यांच्या वतीने शेतकरी व पशुपालकांसाठी चारा व्यवस्थापन व पोषणविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी व पशुपालकांना दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध असलेल्या निकृष्ट दर्जाच्या चाचाची पौष्टिकता वाढविणे, चाचाची नासाडी टाळणे, पर्यायी चारा उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे तसेच उपलब्ध चाचाचे योग्य नियोजन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

पृष्ठ क्र. ६५



# बैलगाडा शर्यतीसाठी बैलांचे योग्य आहार व्यवस्थापन

महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीमध्ये बैलगाडा शर्यती केवळ स्पर्धा नसून शेतकऱ्यांच्या मेहनतीचे, बैलांवरील प्रेमाचे आणि पारंपरिक संस्कृतीचे प्रतीक आहेत. या शर्यतींसाठी तयार केले जाणारे बैल हे शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच जपले जातात. त्यांच्या आरोग्याची, पोषणाची, प्रशिक्षणाची व विश्रांतीची योग्य काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. शर्यतीतील बैलांकडून वेगाबरोबरच ताकद, सहनशक्ती व नियंत्रित शारीरिक कार्यक्षमतेची अपेक्षा असते. त्यामुळे त्यांना केवळ भरपूर खाद्य देणे पुरेसे नसून संतुलित, गुणवत्तापूर्ण व शारीरिक गरजेनुसार नियोजित आहार देणे आवश्यक आहे. योग्य आहार व्यवस्थापन हे बैलांच्या कार्यक्षमतेसोबतच त्यांच्या आरोग्याचेही महत्त्वाचे आधारस्तंभ आहे.



डॉ. अमित मुकुंद क्षीरसागर
पशुवैद्यकीय अधिकारी
जि.प.स.चि. औंध, पुणे-67



डॉ. चैत्राली आव्हाड
पशुवैद्यकीय अधिकारी
पशुवैद्यकीय चिकित्सालय, शेवाळेवाडी
ता. हवेली, जि. पुणे.

| आहार घटक | प्रमुख उपयोग |
|---|---|
| ज्वारी, मका, बाजरी इ. धान्ये | ऊर्जेचा स्रोत |
| हरभरा, उडीद इ. कडधान्ये | प्रथिने व पोषक घटक |
| हिरवा चारा | तंतू, जीवनसत्त्वे व पचनासाठी उपयुक्त |
| वाळलेला चारा | रवंथ व पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी |
| तेलबिया/तेलपेंड | प्रथिने व ऊर्जा |
| गूळ | सहज उपलब्ध ऊर्जा; मर्यादित प्रमाणात |
| खनिज मिश्रण | कॅल्शियम, फॉस्फरस व सूक्ष्म खनिजांची पूर्तता |
| मीठ | शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलनासाठी |
| स्वच्छ पाणी | शरीरातील सर्व जैविक क्रियांसाठी अत्यावश्यक |

## संतुलित आहाराचे महत्त्व

शर्यतीच्या बैलांचा आहार त्यांच्या शरीराचे वजन, वय, शारीरिक स्थिती, दैनंदिन व्यायाम, प्रशिक्षणाची तीव्रता आणि हवामान यानुसार ठरवावा. आहारात ऊर्जा, प्रथिने, तंतुमय पदार्थ, खनिजे, जीवनसत्त्वे आणि पाणी यांचा योग्य समतोल असणे आवश्यक आहे.





**संतुलित आहाराबाबत महत्त्वाचे:** धान्य / उच्च-ऊर्जा खाद्य अचानक मोठ्या प्रमाणात वाढवू नये. आहारातील बदल हळूहळू करावेत.

### चारा आणि तंतुमय पदार्थ

बैलांच्या आहारामध्ये पुरेशा प्रमाणात तंतुमय पदार्थ असणे अत्यंत आवश्यक आहे. हिरवा चारा, वाळलेला चारा किंवा चांगल्या प्रतीचे गवत यामुळे रवंथ, पचनक्रिया व पोटातील सूक्ष्मजीवांचे संतुलन राखण्यास मदत होते. उपलब्धतेनुसार नेपियर, लुसर्न/अल्फाल्फा, ज्वारीचा हिरवा चारा तसेच चांगल्या प्रतीचा वाळलेला चारा वापरता येतो. मात्र, अतिप्रमाणात एकाच प्रकारचा हिरवा चारा देण्याऐवजी उपलब्धतेनुसार विविध चाऱ्यांचा संतुलित वापर करणे अधिक योग्य आहे.

### ऊर्जायुक्त खाद्याचे व्यवस्थापन

शर्यतीसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या बैलांना त्यांच्या वाढलेल्या शारीरिक कार्यक्षमतेनुसार अतिरिक्त ऊर्जा आवश्यक असू शकते. त्यासाठी ज्वारी, मका, बाजरी यांसारख्या धान्यांचा वापर केला जाऊ शकतो. मात्र धान्याचे प्रमाण अचानक वाढवणे किंवा फक्त धान्यावर आधारित आहार देणे टाळावे. यामुळे आम्लता, अपचन, रवंथ कमी होणे आणि इतर पचनविकार उद्‌भवू शकतात. धान्याचे प्रमाण बैलाच्या शरीराचे वजन, प्रशिक्षणाची पातळी आणि एकूण आहाराच्या आधारे पशुवैद्यक किंवा पशुपोषण तज्ज्ञांच्या सल्ल्याने ठरवावे.

### प्रथिनांचे योग्य व्यवस्थापन

प्रशिक्षणादरम्यान स्नायूंची देखभाल व शरीराची पुनर्बांधणी यासाठी पुरेशा प्रमाणात प्रथिने आवश्यक असतात. हरभरा, उडीद, तेलपेंड, सोयाबीन आधारित खाद्य किंवा इतर संतुलित प्रथिनयुक्त खाद्यांचा वापर करता येतो. फक्त प्रथिनांचे प्रमाण वाढवणे म्हणजे ताकद वाढवणे नव्हे. ऊर्जा, प्रथिने, खनिजे आणि तंतू यांचा संतुलित आहार अधिक महत्त्वाचा आहे. बाजारातील कोणतेही प्रोटीन सप्लिमेंट किंवा कन्सन्ट्रेट पशुवैद्यकीय सल्ल्याशिवाय वापरू नये.

### गूळ आणि तेलाचा वापर

काही ठिकाणी शर्यतीच्या बैलांना गूळ किंवा तेल दिले जाते. गूळ हा सहज उपलब्ध कार्बोहायड्रेटचा स्रोत असून तेलातून ऊर्जा मिळते.

मात्र त्यांचा **अतिवापर करू नये.** गूळ किंवा तेल हे संतुलित आहाराचा पर्याय नाहीत. त्यांचे प्रमाण बैलाच्या एकूण आहारातील ऊर्जा गरजेनुसार ठरवावे.

### खनिज मिश्रण आणि मीठ

शर्यतीच्या बैलांच्या आहारात खनिजांचे योग्य प्रमाण असणे आवश्यक आहे. कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि इतर सूक्ष्म खनिजे हाडे, स्नायू आणि शरीरातील विविध जैविक क्रियांसाठी महत्त्वाची आहेत. पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार **गुणवत्तापूर्ण मिनरल मिक्सचर** वापरावे. मीठ योग्य प्रमाणात देणे आवश्यक आहे; मात्र अतिरिक्त मीठ किंवा इलेक्ट्रोलाइट्स अनावश्यकपणे मोठ्या प्रमाणात देऊ नयेत.

### पाण्याचे व्यवस्थापन – अत्यंत महत्त्वाचे!

पाणी हे शर्यतीच्या बैलांच्या आरोग्य आणि कार्यक्षमतेतील सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी एक आहे.

- ❑ नेहमी स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध करून द्यावे.
- ❑ हवामान, व्यायाम व घामाच्या प्रमाणानुसार पाण्याची गरज वाढते.
- ❑ प्रशिक्षणानंतर शरीरातील पाण्याची कमतरता होऊ नये याची काळजी घ्यावी.
- ❑ पाणी जाणूनबुजून दीर्घकाळ रोखून ठेवणे टाळावे.
- ❑ अत्यंत दमलेल्या किंवा गरम झालेल्या बैलाला अचानक मोठ्या प्रमाणात बर्फासारखे थंड पाणी देण्याऐवजी परिस्थितीनुसार नियंत्रित पाणी द्यावे.

पाणी कमी देऊन कामगिरी वाढवण्याची पद्धत वैज्ञानिकदृष्ट्या योग्य नाही आणि ती बैलाच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

### शर्यतीपूर्व आहार व्यवस्थापन

शर्यतीच्या काही दिवस आधी आहारात अचानक मोठे बदल करू नयेत.

### शर्यतीपूर्व काळात

- 15–30 दिवस आधी: संतुलित आहार, नियमित प्रशिक्षण आणि पुरेशी विश्रांती यावर भर द्यावा.
- 7 दिवस आधी: कोणतेही नवीन खाद्य / सप्लिमेंट अचानक सुरू करू नये. नेहमीचा संतुलित आहार सुरू ठेवावा.
- 4 दिवस आधी: अतिरिक्त किंवा जड खाद्य देणे टाळावे. प्रशिक्षणाची तीव्रता कमी करून पुरेशी विश्रांती द्यावी.
- शर्यतीच्या दिवशी: बैलाला उपाशी ठेवू नये. मात्र, शर्यतीच्या अगदी आधी मोठ्या प्रमाणात धान्य किंवा जड खाद्य देणे टाळावे. आहाराची वेळ आणि प्रमाण पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार निश्चित करावे.

### विश्रांती आणि मानसिक स्वास्थ्य

फक्त आहार व प्रशिक्षणामुळेच चांगली कामगिरी मिळत नाही. पुरेशी विश्रांती, आरामदायी निवारा, स्वच्छता व तणावमुक्त वातावरण यांचाही तितकाच महत्त्वाचा वाटा आहे.

- ❑ बैलांना पुरेशी विश्रांती,
- ❑ आरामदायी व हवेशीर निवारा,
- ❑ मोकळ्या हालचालीची योग्य संधी,
- ❑ स्वच्छ पिण्याचे पाणी,
- ❑ नियमित शरीर तपासणी

यांची व्यवस्था असावी. अतिप्रशिक्षण किंवा अपुरी विश्रांती यामुळे कामगिरी कमी होण्याबरोबरच दुखापतींचा धोका वाढू शकतो.

### चुकीच्या आहार पद्धती टाळा

खालील चुका टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे:

- एकदम मोठ्या प्रमाणात धान्य देणे.
- फक्त धान्यावर आधारित आहार देणे.
- अचानक खाद्य बदलणे.
- पशुवैद्यकीय सल्ल्याशिवाय विविध सप्लिमेंट्स देणे.
- पाणी जाणीवपूर्वक रोखून ठेवणे.
- प्रशिक्षणाच्या प्रमाणात अचानक वाढ करणे.
- आजारी किंवा थकलेल्या बैलाकडून जबरदस्तीने व्यायाम करून घेणे.

प्रत्येक बैलाची शारीरिक क्षमता, शरीराचे वजन, वय, पचनक्षमता, प्रशिक्षणाची पातळी आणि आरोग्यस्थिती वेगळी असते. त्यामुळे एका बैलाला योग्य ठरणारा आहार दुसऱ्या बैलालाही तितकाच योग्य असेलच असे नाही.

### आहार देण्याची वेळ

बैलांना दररोज शक्यतो ठरावीक वेळेत व अंतराने खाद्य द्यावे. प्रशिक्षणाच्या वेळेनुसार आहाराचे नियोजन करावे.

उदाहरणार्थ दैनिक व्यवस्थापन

**सकाळी**

- ❑ स्वच्छ पाणी
- ❑ हिरवा/वाळलेला चारा
- ❑ नियोजित प्रमाणात संतुलित कन्सन्ट्रेट खाद्य

**दुपारी**

- ❑ विश्रांती
- ❑ आवश्यकतेनुसार चारा आणि पाणी

**संध्याकाळी**

- ❑ प्रशिक्षणानंतर शरीराला विश्रांती
- ❑ चारा व संतुलित खाद्य
- ❑ पुरेसे पाणी

**रात्री**

- ❑ आवश्यकतेनुसार वाळलेला चारा
- ❑ स्वच्छ पाण्याची उपलब्धता

हे वेळापत्रक प्रत्येक बैलासाठी समान असणे आवश्यक नाही. प्रशिक्षणाची वेळ, हवामान, शरीरस्थिती आणि स्थानिक उपलब्धता यानुसार त्यात बदल करावा.



बैलगाडा शर्यतीसाठी बैलाची तयारी ही केवळ अधिक खाद्य देणे किंवा अधिक व्यायाम करणे यापुरती मर्यादित नाही. संतुलित आहार + पुरेसे पाणी + योग्य प्रशिक्षण + पुरेशी विश्रांती + नियमित पशुवैद्यकीय तपासणी या सर्वांचा एकत्रित परिणाम बैलाच्या आरोग्यावर आणि कार्यक्षमतेवर होतो. योग्य आहार, योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी हे सूत्र लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शर्यत जिंकणे महत्त्वाचे असले, तरी त्याहून महत्त्वाचे म्हणजे आपल्या बैलांचे आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण. निरोगी आणि आनंदी बैल हाच खरा शेतकऱ्याच्या मेहनतीचा विजय आहे.

महापशुधन वार्ता

# दुष्काळसदृश परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य आणि त्याच्या व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक तत्त्वे

दीर्घकाळ चाललेल्या दुष्काळामुळे राज्यातील पशुधनावर अत्यंत शारीरिक व जैविक ताण येऊ शकतो, ज्यामुळे हिरव्या चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते. या पर्यावरणीय ताणामुळे चयापचय क्रियेत थकवा (Metabolic Exhaustion) येऊ शकतो आणि मूलभूत रोगप्रतिकारशक्ती कमी होते. परिणामी कळपामध्ये संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव, स्थानिक परजीवींचा प्रादुर्भाव आणि अपघाती पौष्टिक विषबाधा (Nutritional Toxicities) होण्याची शक्यता वाढते. पशुधनाचा मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि कृषी अर्थव्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी, पश्चिम प्रादेशिक रोग निदान प्रयोगशाळा (WRDDL), राष्ट्रीय आपत्कालीन योजना (श्रीनिवास राव आणि इतर, 2015) आणि जागतिक दुष्काळ नियंत्रण मानकांनुसार (ब्रोकन आणि इतर, 2005) तयार केलेली ही मार्गदर्शक तत्त्वे, पशुपालक, क्षेत्रीय यंत्रसामग्री, पशुवैद्यकीय अधिकारी आणि संस्थात्मक हितधारकांसाठी जारी करीत आहे.

## कार्यप्रणाली मानक: दुष्काळातील प्राण्यांची पाच स्वातंत्र्ये (The Five Freedoms)

दुष्काळात आपल्या पशुधनाची योग्य काळजी घेण्यासाठी जागतिक प्राणी आरोग्य संघटनेच्या (WOAH) मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही 5 मूलभूत स्वातंत्र्ये निश्चित केली गेली आहेत. :

1. भूक व तहान यांपासून स्वातंत्र्य: जनावरांना वेळेवर सकस, पौष्टिक आहार व सतत स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्या. यामुळे जनावरांची ताकद टिकून राहते, त्यांचे अवयव निकामी होत नाहीत आणि पचनक्रिया व्यवस्थित राहते.

2. ऊन व अस्वस्थतेपासून स्वातंत्र्य: कडक उन्हापासून वाचण्यासाठी जनावरांना पुरेशी सावली द्या, बसण्यासाठी कोरडी व आरामदायी जागा ठेवा व निवाऱ्याच्या ठिकाणी खेळती हवा राहील याची सोय करा. त्यामुळे जनावरांना उन्हाचा व उष्णतेचा त्रास होणार नाही.

3. छाती/शरीराला इजा, वेदना व आजारांपासून स्वातंत्र्य: जनावरांना वेळेवर लस द्या, गोठा/निवारा सतत स्वच्छ व जंतूमुक्त ठेवा तसेच आजारी जनावरांवर लगेच उपचार करा. यामुळे रोगांचा प्रसार थांबतो व जनावरांचे आजारांपासून रक्षण होते.

4. मोकळेपणाने वागण्याचे स्वातंत्र्य: तात्पुरते गोठे किंवा छावण्या बांधताना जनावरांना पुरेशी मोकळी जागा द्या. खूप गर्दी करू नका, जेणेकरून जनावरे एकत्र सहज राहू शकतील. जनावरांवर ताण येत नाही व ती एकमेकांना दुखापत करत नाहीत.

5. भीती आणि ताणतणावापासून स्वातंत्र्य: जनावरांना मारहाण न करता प्रेमाने व हळुवारपणे हाताळा. अति आजारी किंवा त्रास होत असलेल्या जनावरांवर वेळीच दयाळू दृष्टिकोनातून योग्य उपचार करा. जनावरांच्या मनातील भीती दूर होते व ती शांत राहतात.

दुष्काळाच्या काळात या 5 गोष्टींची काळजी घेतल्यास आपले पशुधन सुरक्षित, निरोगी आणि तणावमुक्त राहण्यास मदत होते. तसेच पशुधनाची उत्पादकताही टिकून राहण्यास मदत होते.




दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य व जीवन वाचवण्यासाठी जागतिक मानकांनुसार ही 'पाच स्वातंत्र्ये' पाळणे अत्यंत गरजेचे आहे. जनावरांना वेळेवर पौष्टिक आहार व स्वच्छ पाणी देणे, कडक उन्हापासून संरक्षणासाठी सावली व खेळती हवा पुरवणे, वेळेवर लसीकरण व गोठ्याची स्वच्छता राखून आजारांपासून दूर ठेवणे, त्यांना पुरेशी मोकळी जागा देणे व भीती किंवा मारहाणीशिवाय प्रेमाने हाताळणे हे यामागचे मुख्य उद्देश आहेत. या 5 सोप्या नियमांचे पालन केल्यास दुष्काळातही आपले पशुधन निरोगी, सुरक्षित व ताणतणावमुक्त राहू शकते.

पृष्ठ क्र. ६९

### 3. चाऱ्याचे व्यवस्थापन, पोषण आणि विषबाधा प्रतिबंध

चाऱ्याच्या तीव्र टंचाईमुळे अनेकदा पर्यायी खाद्यावर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे नैदानिक (Clinical) विषबाधा आणि अंतर्गत चयापचय विकारांचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. दुष्काळप्रवण क्षेत्रांमध्ये प्रशासकीय चारा उपाययोजनांतर्गत स्थानिक खाद्य लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी धोरणात्मक जलसंधारणाचा समावेश असावा (शर्मा व समख्ती, 2004).

- ❑ प्रूसिक ॲसिड / सायनाइड विषबाधा (HCN Toxicity): पाण्याच्या तीव्र ताणाखाली असलेल्या अपरिपक्व ज्वारीच्या पिकांमध्ये हायड्रोसायनिक ॲसिड (ज्याला स्थानिक भाषेत 'धुरिन' म्हणतात) मोठ्या प्रमाणात जमा होते. पशुधनाला 40 ते 45 दिवसांपेक्षा कमी वाढीची अपरिपक्व ज्वारी कधीही खाऊ घालू नये. अधूनमधून पडणाऱ्या पावसानंतर किंवा अचानक झालेल्या तुटक सिंचनानंतर वेगाने उगवणाऱ्या कोवळ्या कोंबांमध्ये किंवा खोडव्यामध्ये अत्यंत उच्च व प्राणघातक विषारी अंश असतो.
- ❑ बुरशीयुक्त चारा व मायकोटॉक्सिकोसिस: सुका चारा व पेंढा दमट / असुरक्षित परिस्थितीत साठवल्यास बुरशीच्या वाढीस चालना मिळते. संशयित बुरशीयुक्त खाद्य देणे पूर्णपणे टाळले पाहिजे, कारण बुरशीजन्य मायकोटॉक्सिनमुळे यकृतास गंभीर स्वरूपात इजा होते व पशुधनाचा मृत्यू होऊ शकतो.
- ❑ युरिया प्रक्रिया करताना घ्यावयाची खबरदारी: कमी प्रतीच्या सुक्या पिकांच्या अवशेषांवर किंवा पेंढ्यावर कच्च्या प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी युरियाची प्रक्रिया करताना, शिफारस केलेल्या अचूक प्रमाणाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. युरियाचे प्रमाण थोडे जरी चुकले किंवा मोजमाप न करता जास्त डोस दिला गेला, तर जनावरांना वेगाने आणि प्राणघातक अमोनिया विषबाधा होते.
- ❑ आहारातील अचानक बदलांचे परिणाम कमी करणे: नवीन चाऱ्याची अचानक ओळख किंवा उच्च-केंद्रित खाद्याकडे अचानक वळल्यास स्थानिक रुमेन (कोठीपोट) मधील सूक्ष्मजीवांमध्ये व्यत्यय येतो, ज्यामुळे तीव्र 'रुमेन ॲसिडोसिस' किंवा पोटफुगी निर्माण होते. नवीन खाद्य किमान 7 दिवसांच्या कालावधीत जुन्या खाद्यासोबत टप्प्याटप्प्याने समाविष्ट केले पाहिजे.
- ❑ आहारात खनिज मिश्रणाचा अंतर्भाव: शारीरिक रोगप्रतिकारशक्ती स्थिर करण्यासाठी व गाभण जनावरांचे रक्षण करण्यासाठी, दैनंदिन खाद्यामध्ये जीवनसत्व 'अ' (Vitamin A) सोबत 50 ते 100 ग्रॅम उच्च दर्जाच्या खनिज मिश्रणाचा (ज्यामध्ये जस्त, तांबे आणि कोबाल्टचे संतुलित प्रमाण असेल) पूरक म्हणून समावेश करणे आवश्यक आहे.

### 4.आपत्कालीन पशुधन छावण्यांसाठी मार्गदर्शक सूचना

दुष्काळात जनावरांची योग्य काळजी घेण्यासाठी उभारल्या जाणाऱ्या पशुधन छावण्या सुरक्षित, स्वच्छ व नियोजनबद्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा छावण्यांमध्ये पुढील बाबींची विशेष काळजी घ्यावी.

#### 1. जनावरांसाठी पुरेशी जागा

- ❑ प्रत्येक प्रौढ जनावराला छताखाली किमान 4.5 ते 5.5 चौ.मी. जागा उपलब्ध असावी.
- ❑ जनावरांना मुक्तपणे हालचाल करता यावी यासाठी छावणीला लागून असलेल्या मोकळ्या आवारात याच्या दुप्पट जागा असावी.

#### 2. योग्य सावलीची व्यवस्था

- ❑ छावणीचे छप्पर किमान 3.5 मीटर उंचीचे असावे.
- ❑ छप्पर पूर्व-पश्चिम बांधल्यास उन्हाचा त्रास कमी होतो.
- ❑ उष्णता कमी राहण्यासाठी शक्यतो पांढरा परावर्तक रंग किंवा लेप वापरावा.

#### 3. पावसाचे व सांडपाण्याचे व्यवस्थापन

- ❑ छावणीची जमीन उंच व थोडी उताराची असावी, जेणेकरून पाणी साचणार नाही.
- ❑ विश्रांतीच्या ठिकाणी पेंढा, ऊसाचा चोथा किंवा इतर स्वच्छ कृषी अवशेष अंथरावेत. यामुळे खूरांचे आजार व सांध्यांवरील ताण कमी होण्यास मदत होते.

#### 4. पुरेशा पिण्याच्या पाण्याची उपलब्धता

- ❑ मोठ्या जनावरांसाठी दररोज किमान 60 लिटर पाणी उपलब्ध असावे.
- ❑ शेळ्या, मेंढ्या यांसारख्या लहान रवंथ करणाऱ्या प्राण्यांसाठी किमान 30 लिटर पाणी उपलब्ध असावे.

#### 5. पाण्याची गुणवत्ता तपासणी

- ❑ टँकर किंवा इतर स्रोतांमधून आणलेले पाणी स्वच्छ व सुरक्षित असल्याची खात्री करावी.
- ❑ पाण्यात हानिकारक घटक किंवा जड धातू नसावेत.
- ❑ पाण्याच्या टाक्या व कुंड्या दर 48 तासांनी स्वच्छ धुवाव्यात;जेणेकरून शेवाळ व जंतूंची वाढ होणार नाही.

#### 6. जनावरांचा दैनंदिन आहार

प्रत्येक मोठ्या जनावरासाठी दररोज खालील प्रमाणात खाद्य उपलब्ध करून द्यावे :

- ❑ 15 किलो हिरवा चारा
- ❑ 6 किलो सुका चारा किंवा पीक अवशेष
- ❑ 1 ते 1.5 किलो संतुलित पशुखाद्य (खुराक)

योग्य निवारा, स्वच्छ पाणी व संतुलित आहार यांची व्यवस्था केल्यास दुष्काळातही जनावरांचे आरोग्य चांगले राखता येते आणि उत्पादनक्षमता टिकवून ठेवता येते.

**5. पशुधन छावण्यांमध्ये रोग प्रतिबंध, जैवसुरक्षा व लसीकरण:** दुष्काळाच्या काळात उभारल्या जाणाऱ्या पशुधन छावण्यांमध्ये विविध गावांतील व भागांतील जनावरे एकत्र येतात. त्यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याचा धोका वाढतो. म्हणून छावण्यांमध्ये रोग प्रतिबंधासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

1. लसीकरणाला प्राधान्य: जनावरे छावणीत आणण्यापूर्वीच त्यांचे आवश्यक लसीकरण पूर्ण करावे. विशेषतः घटसर्प (HS), फऱ्या (BQ) व लाळ्या-खुरकुत या रोगांविरुद्ध लसीकरण करणे आवश्यक आहे. हे लसीकरण शक्यतो जनावरे छावणीत येण्याच्या किमान 14 दिवस आधी पूर्ण झालेले असावे.

2. मेंढ्या व शेळ्यांसाठी विशेष संरक्षण: स्थलांतरित किंवा सामायिक कुरणांवर जाणाऱ्या मेंढ्या व शेळ्यांना एन्टेरोटॉक्सिमिया (ET) आणि पीपीआर (PPR) या रोगांविरुद्ध लसीकरण करावे. यामुळे मोठ्या प्रमाणावर होणारे आजार व मृत्यू टाळण्यास मदत होते.

3. परजीवी नियंत्रण: छावणीत दाखल होताच सर्व जनावरांचे कृमिनाशन व गोचीड नियंत्रण करावे. यामुळे शरीरातील कृमी, गोचीड व इतर परजीवींवर नियंत्रण मिळते. परिणामी जनावरांचे आरोग्य सुधारते व टिक फिव्हर सारख्या रोगांचा धोका कमी होतो.

4. विलगीकरणाची व्यवस्था: आजारी किंवा संशयित जनावरांसाठी स्वतंत्र जागा राखून ठेवावी. ही जागा मुख्य छावणीपासून किमान 50 मीटर अंतरावर असावी. नवीन आलेल्या जनावरांची तपासणी होईपर्यंत त्यांना स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे.

5. कीटक व माशांचे नियंत्रण: छावणी परिसरात माश्या, डास व गोचीड यांचे प्रमाण कमी ठेवण्यासाठी नियमित फवारणी करावी. स्वच्छता राखल्यास रोगांचा प्रसार कमी होण्यास मदत होते.

6. मोबाईल पशुवैद्यकीय सेवांचा वापर: दुष्काळग्रस्त भागांमध्ये मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स (MVU) कार्यरत ठेवाव्यात. यामुळे दुर्गम भागांतील पशुपालकांना वेळेवर उपचार, औषधे आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळू शकते.

**6. नव्याने उद्भवणाऱ्या व संसर्गजन्य रोगांवर सतत लक्ष ठेवणे**

दुष्काळामुळे जनावरांचे स्थलांतर वाढते, पाण्याचे स्रोत कमी होतात आणि विविध भागांतील जनावरे एकत्र येतात. त्यामुळे काही गंभीर रोगांचा प्रसार होण्याचा धोका वाढतो. यासाठी सतत निरीक्षण आणि त्वरित प्रतिसाद आवश्यक आहे.

1. महत्त्वाच्या रोगांवर विशेष लक्षपशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुढील रोगांबाबत सतर्क राहावे :

लंपी त्वचा रोग (LSD) – गोवंशामध्ये

आफ्रिकन स्वाइन फीव्हर (ASF) – डुकरांमध्ये

एव्हीअन इन्फ्लूएंझा (बर्ड फ्लू)-कुक्कुट पक्ष्यांमध्ये

2. संशयास्पद घटनांची त्वरित माहिती: जनावरांमध्ये असामान्य लक्षणे दिसल्यास किंवा अचानक मृत्यू झाल्यास त्याकडे गांभीर्याने पाहावे. अशा घटनांची माहिती तात्काळ संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग आणि रोग अन्वेषण यंत्रणेला द्यावी.

3. प्रयोगशाळा तपासणी: रोगाचा संशय आल्यास आवश्यक नमुने तात्काळ गोळा करावेत. नमुने योग्य पद्धतीने थंड साखळी राखून प्रयोगशाळेकडे पाठवावेत. वेळेवर निदान झाल्यास रोग नियंत्रणाची कार्यवाही अधिक प्रभावीपणे करता येते. "लसीकरण, स्वच्छता, विलगीकरण व सतत निरीक्षण हीच दुष्काळी पशुधन छावण्यांमधील रोग प्रतिबंधाची चार महत्त्वाची सूत्रे आहेत."






दुष्काळाच्या काळात नेहमीचा हिरवा चारा वेळेवर उपलब्ध होत नाही. अशा वेळी पशुपालकांना अपारंपरिक चारा, वाळलेला पाला किंवा पिकांचे उरलेले अवशेष वापरावे लागतात. परंतु, या पर्यायी चाऱ्यामध्ये नैसर्गिकरीत्या काही घातक रासायनिक घटक असतात, ज्यांना वैज्ञानिक भाषेत 'अँटीन्यूट्रिशनल फॅक्टर्स' (ANFs) म्हणतात. हे घटक जनावरांच्या शरीरात अन्नद्रव्ये शोषून घेण्यास अडथळा आणतात आणि गंभीर आजार किंवा विषबाधा घडवू शकतात.



डॉ. सोपान दिवटे ,(पशुवैदकीय अधिकारी , DIS पुणे),
9657853738

## 1. प्रमुख पर्यायी चारा, त्यातील घातक घटक व सुरक्षा उपाय

| पर्यायी चारा / वनस्पती | त्यात असणारा घातक घटक (ANF) | जनावरांवर होणारा दुष्परिणाम | सुरक्षित वापरासाठी सोपे उपाय |
|---|---|---|---|
| ज्वारीचा कोळवा / लहान कोंब | हायड्रोसायनिक ॲसिड (HCN / प्रूसिक ॲसिड) | ऑक्सिजन वहन रोखल्यामुळे जनावर धाप टाकते, पोट फुगते व अचानक मृत्यू होऊ शकतो. | पाण्याचा ताण पडलेली किंवा कोवळी ओली ज्वारी खाऊ घालू नये. ज्वारी फुलोऱ्यावर आल्यावरच चारावी. किंवा 2-3 दिवस उन्हात वाळवून/मुरघास करून दिल्यास हे विष नष्ट होते. |
| उसाचे वाढे (सतत जास्त दिल्यास) | ऑक्झॅलेट्स (Oxalates) | रक्तातील कॅल्शियम कमी होऊन जनावर खाली बसते (Milk Fever) आणि मूत्रपिंडाला इजा होते. | उसाच्या वाढ्यासोबत प्रति जनावर 50 ते 100 ग्रॅम चांगल्या दर्जाचे खनिज मिश्रण आणि चुना पावडर द्यावी. उसाचे वाढे एकूण आहाराच्या 30% पेक्षा जास्त नसावे. |
| सुबाभूळ / शेवरी | मिमोसिन (Mimosine) | हे अमिनो ॲसिड असल्यामुळे जनावरांचे केस गळतात, लाळ गळते आणि थायरॉईड ग्रंथी सुजतात. | सुबाभाळाचा पाला एकूण आहाराच्या 20 ते 30% पेक्षा जास्त देऊ नये. (शेळ्या-मेंढ्या 50% पर्यंत पचवू शकतात). |
| सरकी पेंड | गॉसिपॉल (Gossypol) | यकृत व हृदयाला इजा पोहोचते. गाभण जनावरांमध्ये गर्भपाताचा धोका असतो. | लहान वासरांना सरकी पेंड देऊ नये. मोठ्या जनावरांना आहारासोबत फेरस सल्फेट दिल्यास या घटकाचा प्रभाव निष्क्रिय होतो. |
| वाळलेला पाला व झुडपे (कडुनिंब, शिरीष) | टॅनिन्स (Tannins) | चारा कडू लागतो, प्रथिनांचे पचन थांबल्याने जनावरांचे वजन वेगाने घटते. | पाला 24 तास उन्हात वाळवून, कुट्टी करून त्यावर 1% युरिया-गुळाचे पाणी फवारावे. |

पृष्ठ क्र. ७२

## 2. सुक्या चाऱ्याची पौष्टिकता वाढवण्याच्या तांत्रिक पद्धती

1. सुक्या चाऱ्यावरील 4% युरिया प्रक्रिया

•फायदा: धान्याचा पेंढा किंवा गव्हाच्या भुशातील प्रथिनांचे प्रमाण (Crude Protein) 3% वरून थेट 7 ते 8% पर्यंत वाढते आणि कडक चारा मऊ व पाचक बनतो.

•साहित्य: 100 किलो सुका कुट्टी केलेला चारा + 4 किलो खत ग्रेड युरिया + 60 ते 65 लिटर स्वच्छ पाणी.

•कृती: पाण्यात युरिया विरघळवून चाऱ्याच्या थरावर फवारावा आणि ताडपत्रीने 21 दिवस हवाबंद ठेवावा. वापरण्यापूर्वी अर्धा तास हवेवर पसरवून मगच जनावरांना द्यावा.

2. युरिया-गूळ-खनिज मिश्रण फवारणी (तत्काळ पद्धत)

•फायदा: जुना वाळलेला चारा जनावरे आवडीने खात नाहीत. ही प्रक्रिया केल्यास चाऱ्याची चव आणि पौष्टिकता तत्काळ सुधारते.

•कृती: 100 किलो चाऱ्यासाठी 1 किलो युरिया + 2 किलो गूळ + 1 किलो खनिज मिश्रण 30 लिटर पाण्यात मिसळून रोज चारा टाकण्यापूर्वी त्यावर फवारावे.

3. बायपास प्रोटीन आणि बायपास फॅट

•बायपास प्रोटीन: हे प्रथिने कोठीपोटात न विरघळता थेट चौथ्या पोटात पचतात, ज्यामुळे दुभत्या जनावरांचे दूध उत्पादन टिकून राहते.

•बायपास फॅट: आहारातून रोज 100 ते 150 ग्रॅम बायपास फॅट दिल्यास दुष्काळात जनावरांचे वजन घटत नाही आणि दुधातील फॅटचे प्रमाण टिकून राहते.

4. युरिया मोलासेस मिनरल ब्लॉक (UMMB - चाटण विटा)

•युरिया, गूळ, खनिज मिश्रण, मीठ आणि सिमेंट यांपासून बनवलेला हा ब्लॉक गोठ्यात टांगून ठेवावा. जनावरांनी तो चाटल्यामुळे लाळेतील पाचक रस वाढतात आणि पचनक्रिया सुधारते.








## 3. झाडपाला व शेळ्या-मेंढ्यांचे आहार व्यवस्थापन

झाडपाल्याचा हुशारीने वापर: नेहमीचा हिरवा चारा उपलब्ध नसताना सुबाभूळ, शेवरी, कडुनिंब, अंजन, पिंपळ, वड आणि चिंचेचा पाला शेळ्यांसाठी वरदान ठरतो. हा पाला प्रथिनांचा उत्तम स्रोत आहे.

वाळलेला पाला साठवणूक: वेगवेगळ्या झाडांचा पाला गोळा करून सावलीत वाळवून ठेवावा. ऐन टंचाईच्या काळात हा वाळलेला पाला धान्याच्या भुशासोबत किंवा पेंढ्यासोबत मिक्स करून देता येतो.

अपरिपंपरिक पिकांचे अवशेष: सोयाबीनचे भुसे, हरभऱ्याचे कुटार, गव्हाचा भुसा किंवा भाताचा पेंढा यांचा वापर करावा. मात्र, याची पाचकता वाढवण्यासाठी यावर 1% युरिया-गुळाचे पाणी फवारावे.

खुराकाचे प्रमाण: केवळ सुक्या चाऱ्यावर शेळ्या जगू शकत नाहीत. यासाठी प्रती प्रौढ शेळीला शरीराच्या गरजेनुसार 150 ते 250 ग्रॅम ऊर्जायुक्त खुराक (जसे की भरडलेली मका, ज्वारी, बाजरा किंवा कोंडा) देणे अत्यंत गरजेचे आहे.

## 4 . घातक घटक (Anti-Nutritional Factors)

झाडपाल्यातील मिमोसिन व टॅनिन्स: सुबाभळाच्या पाल्यामध्ये मिमोसिन हा घातक घटक असतो, ज्यामुळे शेळ्यांचे केस गळतात. त्यामुळे सुबाभळाचा पाला एकूण आहाराच्या 50% पेक्षा जास्त असू नये. तसेच कडुनिंब व इतर पाल्यातील टॅनिन्स मुळे प्रथिनांचे पचन रोखले जाते, म्हणूनच पाला 24 तास उन्हात सुकवून मगच द्यावा.

हायड्रोसायनिक ॲसिड (HCN) विषबाधा: पाण्याचा ताण पडलेली किंवा अर्धवट वाढलेली ज्वारी शेळ्यांना चुकूनही चारू नये. यात प्रूसिक ॲसिड असते, ज्यामुळे शेळ्यांचा अचानक मृत्यू होऊ शकतो.

पशुखाद्यातील बुरशी (Mycotoxins): टंचाईच्या काळात साठवलेल्या खुराकाला किंवा पेंडीला ओल लागल्यास ॲफ्लाटॉक्सिन ही बुरशी वाढते. बुरशीयुक्त खाद्य खाल्ल्याने शेळ्यांचे यकृत निकामी होते व त्यांची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णपणे ढासळते. यासाठी खाद्य नेहमी कोरड्या आणि उंचावलेल्या जागेवर साठवावे.




चाऱ्यातील व पशुखाद्यातील विषारी किंवा पचनास अडथळा आणणारे घटक म्हणजेच 'अँटीन्यूट्रिशनल फॅक्टर्स' (ANFs) कमी करण्यासाठी प्रामुख्याने भौतिक, रासायनिक आणि जैविक अशा तीन सोप्या पद्धतींचा वापर केला जातो. या शास्त्रीय प्रक्रियांमुळे चाऱ्यातील विषारी घटकांचे विघटन होते, चाऱ्याची गुणवत्ता सुधारते आणि जनावरांची पचनक्षमता वाढते.

1. भौतिक व यांत्रिक पद्धती:

या सहज करता येणाऱ्या अत्यंत सोप्या प्राथमिक पद्धती आहेत:

•उन्हात वाळवणे किंवा सुकवणे: सुबाभळातील *मिमोसिन* आणि कोवळ्या ज्वारीतील *हायड्रोसायनीक ॲसिड (HCN)* हे विषारी घटक कमी करण्याचा हा उत्तम उपाय आहे. हिरवा चारा 2 ते 3 दिवस कडक उन्हात वाळवल्यास किंवा 24 ते 48 तास सुकवून घेतल्यास हे विषारी घटक हवेत उडून जातात किंवा त्यांचा प्रभाव 70 ते 80 टक्क्यांपर्यंत कमी होतो.

•बारीक कुट्टी करणे: कुट्टी केल्याने किंवा बिया भरडल्याने वनस्पतींच्या पेशींची भिंत तुटते. यामुळे जनावरांच्या पाचक रसांचा अन्नद्रव्यांशी थेट संपर्क येतो व टॅनिन्स किंवा ऑक्झॅलेट्सचा वाईट प्रभाव कमी होण्यास मदत होते.

•उकळणे किंवा भाजणे : सोयाबीन किंवा शेंगवर्गीय पिकांमध्ये 'ट्रिप्सिन इनहिबिटर्स' असतात, जे प्रथिनांचे पचन रोखतात. या बियांना योग्य तापमानावर भाजल्याने अथवा उकळल्याने हे घटक पूर्णपणे निष्क्रिय होतात आणि प्रथिने सहज पचतात.

2. रासायनिक पद्धती: खाद्याची प्रत सुधारण्यासाठी विशिष्ट रसायनांचा सुरक्षित वापर केला जातो:

•युरिया प्रक्रिया: वाळलेल्या पेंढ्यावर किंवा टणक चाऱ्यावर 4% युरिया प्रक्रिया केली असता अमोनिया वायू तयार होतो. हा वायू चाऱ्यातील टणक भाग (लिग्निन) मऊ करतो व टॅनिन्सचा प्रभाव निष्क्रिय करतो, ज्यामुळे चारा पाचक बनतो.

•चुन्याचा वापर: उसाच्या वाड्यात मोठ्या प्रमाणात 'ऑक्झॅलेट्स' असतात. आहारात अतिरिक्त कॅल्शियम किंवा चुन्याच्या पाण्याचा वापर केल्यास हे ऑक्झॅलेट रक्तातील कॅल्शियम शोषण्याऐवजी पचनसंस्थेतच बद्ध होऊन शेणावाटे शरीराबाहेर पडतात.

•बुरशी रोधक रसायने: साठवलेल्या पशुखाद्यात बुरशी वाढून 'ॲफ्लाटॉक्सिन' हे घातक विष तयार होऊ नये म्हणून प्रोपियोनिक ॲसिड किंवा वनस्पतीजन्य बुरशीनाशकांचा वापर केला जातो.

3. जैविक आणि साठवणूक पद्धती

चाऱ्याची साठवणूक व आंबवण प्रक्रियेद्वारे विषारी घटक नष्ट करण्याच्या पद्धती:

•मुरघास निर्मिती: हा तांत्रिकदृष्ट्या अत्यंत प्रभावी उपाय आहे. हिरवा चारा खड्ड्यात किंवा सायलेज बॅगमध्ये दाबून पूर्णपणे हवाविरहित (ॲनेरोबिक) स्थितीत साठवला जातो. या आंबवण प्रक्रियेदरम्यान तयार होणाऱ्या लॅक्टिक ॲसिडमुळे चाऱ्यातील HCN आणि मिमोसिनसारखी विषारी द्रव्ये पूर्णपणे नष्ट होतात.

•टॉक्सिन बाइंडरचा वापर: पशुखाद्यातील बुरशीजन्य विष (मायकोटॉक्सिन्स) शमवण्यासाठी खाद्यात बेंटोनाईट किंवा झिओलाईटसारख्या खनिज मातीचे मिश्रण दिले जाते. हे बाइंडर्स जनावरांच्या पोटातील विष शोषून घेतात आणि ते रक्तात मिसळू न देता बाहेर टाकतात.

•साठवणुकीतील ओलावा नियंत्रण: पशुखाद्य व सुक्या चाऱ्यामध्ये बुरशीची वाढ रोखण्यासाठी साठवणीच्या वेळी ओलाव्याचे प्रमाण 12 ते 14% पेक्षा कमी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

पृष्ठ क्र. ७४



# परसातील कोंबड्यांच्या आतड्यांतील परजीवींचे नियंत्रण करण्याचे उपाय

परजीवी (Parasite) हा असा जीव आहे जो दुसऱ्या जीवावर (ज्याला यजमान किंवा 'होस्ट' म्हणतात) राहतो व त्या जीवाच्या कमकुवतपणाचा स्वतःला फायदा करून घेतो. कोंबड्यांना त्रास देणारे अंतर्गत परजीवी हे प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात: जंत (Worms) आणि प्रोटोझोआ (Protozoa). परजीवींचे प्रमाण कमी असल्यास सहसा कोणताही धोका नसतो आणि त्यावर उपचार न करताही चालते. परंतु, परजीवींचा संसर्ग जास्त प्रमाणात झाल्यास कोंबड्या अशक्त होणे, त्यांची वाढ नीट न होणे, खाल्लेले अन्न शरीराला न लागणे, अंडी देण्याचे प्रमाण घटणे आणि गंभीर प्रकरणांमध्ये कोंबड्या मरणे अशी लक्षणे दिसून येतात. याशिवाय, परजीवीमुळे कळपाची इतर आजारांना बळी पडण्याची शक्यता वाढते किंवा आधीच असलेला आजार अधिक बळावतो. हा लेख प्रामुख्याने कोंबड्यांच्या उत्पादनावर आणि आरोग्यावर आतड्यांतील परजीवींच्या होणाऱ्या परिणामांवर आणि कोंबड्यांमधील परजीवींचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठीच्या नियंत्रण धोरणांवर प्रकाश टाकतो.



डॉ. नेत्रा बाबाराव अस्वार
पशुवैद्यकीय अधिकारी (गट-अ) पशुवैद्कीय चिकित्सालय, कामार्ली, ता. पेन, जि. रायगड MVSc Ph.D- Veterinary Public Health, PGDOH

परसातील कोंबड्यांच्या आतड्यांतील परजीवींचा (जंत) संसर्ग होणे सामान्य आहे. थोडेफार परजीवी असण्याने सहसा काही अडचण येत नाही. याउलट, परजीवींची संख्या जास्त असल्यास कोंबड्यांची वाढ, अंडी उत्पादन व त्यांच्या एकूण आरोग्याला गंभीर हानी पोहोचू शकते. कोंबड्या राहतात त्या वातावरणात परजीवींच्या अंड्यांची संख्या किती आहे, यावर संसर्गाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. गोगलगायी, गांडुळे किंवा इतर कीटक (मध्यस्थ यजमान) जे परजीवींची अंडी पसरवू शकतात, त्यांना खाल्ल्याने किंवा दूषित अन्न, पाणी किंवा विष्ठा/कचरा (लिटर) खाण्याने कोंबड्यांना थेट परजीवींच्या अंड्यांचा संसर्ग होऊ शकतो.

अशक्तपणा, अपुरी वाढ व अन्नाचे शरीराला न लागणे, अंड्यांचे उत्पादन कमी होणे आणि गंभीर परिस्थितीमध्ये मृत्यू होणे ही परजीवी संसर्गाची वैद्यकीय लक्षणे आहेत. तसेच, परजीवी कळपाची आजारांविरुद्ध लढण्याची प्रतिकारशक्ती कमकुवत करू शकतात व आधीच असलेल्या आजारांची स्थिती अधिक खराब करू शकतात.

मोठे गोलजंत (Ascaridia galli) हे आतड्यांतील जंत कोंबड्यांना सर्वाधिक नुकसान पोहोचवतात. तरुण पक्ष्यांवर याचा जास्त वाईट परिणाम होतो. कमी संसर्ग असल्यास सहसा ते लक्षात येत नाही. तथापि, जंतांची संख्या जास्त असल्यास ते अन्न शोषून घेण्याच्या प्रक्रियेत अडथळा आणतात, ज्यामुळे कोंबड्यांची वाढ आणि उत्पादकता खालावते. तीव्र संसर्गाच्या प्रकरणांमध्ये, जंत प्रत्यक्षात आतडे ब्लॉक (अडवून) करू शकतात, जे जीवघेणे ठरू शकते. बाधित कोंबड्या अशक्त होतात आणि इतर आजारांना लवकर बळी पडतात. परजीवी असलेल्या नाकतोड्यांना किंवा गांडुळांना खाल्ल्याने, किंवा विष्ठेने दूषित झालेले अन्न, पाणी किंवा कचऱ्यामधील परजीवींची अंडी थेट गिळल्याने हे गोलजंत एका पक्ष्यापासून दुसऱ्या पक्ष्यामध्ये पसरू शकतात.

### सिकल जंत (Cecal worm - Heterakis gallinarum)

हा कोंबड्यांमध्ये वारंवार आढळणारा आणखी एक जंत आहे. जरी यामुळे कोंबड्यांना क्वचितच त्रास होतो, तरी त्याचे मुख्य आर्थिक नुकसान म्हणजे तो 'हिस्टोमोनास मेलेग्रिडिस' (Histomonas melegridis) नावाच्या जीवाणूचा वाहक म्हणून काम करतो, ज्यामुळे टर्की पक्ष्यांमध्ये 'ब्लॅकहेड' (Blackhead) हा प्राणघातक आजार होतो. कोंबड्यांच्या विष्ठेतील कचऱ्यामधून गांडुळे सिकल जंतांच्या अंड्यासोबत हिस्टोमोनाड जीव देखील शरीरात घेतात. ही गांडुळे खाल्ल्यानंतर टर्की पक्षी बाधित होतात. टर्की पक्षी थेट सिकल जंताच्या अंड्यामधूनही हिस्टोमोनाड जीव शरीरात घेऊ शकतात. म्हणूनच, कोंबड्या आणि टर्की पक्ष्यांना कधीही एकत्र ठेवू नये किंवा कोंबड्यांनी आधी वापरलेल्या जागेत टर्की पक्ष्यांना फिरू देऊ नये असा सल्ला दिला जातो.

पृष्ठ क्र. ७५

लहान गोलजंत (Capillaria sp.) हा आतड्यांतील परजीवीचा आणखी एक प्रकार आहे जो त्रासदायक ठरू शकतो. हे परजीवी आतड्यांवर हल्ला करतात, ज्यामुळे आतड्यांना सूज येते (भिंती जाड होतात) आणि रक्तस्राव होतो. परिणामी कोंबड्यांची पोषक तत्वे शोषून घेण्याची क्षमता कमी होते आणि त्यांची वाढ खुंटते. परजीवींची अंडी खाल्ल्याने किंवा परजीवी असलेल्या गांडुळे, कीटक किंवा इतर लहान गोलजंतांमार्फत हा संसर्ग थेट एका पक्ष्याकडून दुसऱ्या पक्ष्याकडे पसरू शकतो. इतर जंतांच्या उलट, पट्टकृमी (Tapeworms) पसरण्यासाठी गोगलगाय, शंख, गांडूळ, भुंगा किंवा माशी यांसारख्या मध्यस्थ यजमानाची आवश्यकता असते.

परसातील कोंबड्यांच्या जंतांचा संसर्ग रोखण्यासाठी व नियंत्रणासाठी योग्य पोषण, स्वच्छता व वेळेवर उपचार व्यवस्थापन आवश्यक आहे. कोंबड्यांना संतुलित आहाराची गरज असते, ज्यामध्ये जीवनसत्व (व्हिटॅमिन) अ आणि ब पुरेशा प्रमाणात मिळण्यावर भर दिला पाहिजे. या जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे कोंबड्या परजीवी संसर्गास अधिक बळी पडल्याचे दिसून आले आहे.

- नवीन कळप आणण्यापूर्वी कोंबड्यांचा जुना विष्ठा व कचरा पूर्णपणे स्वच्छ करा.
- कोंबड्यांचे लिटर शक्य तितका सुका ठेवण्याचा प्रयत्न करा.
- कोंबड्यांच्या जागेत जास्त गर्दी करणे टाळा.
- कबुतरे, इतर पक्षी आणि जंगली पक्ष्यांना कोंबड्यांपासून दूर ठेवा. कारण त्यांच्यात संसर्ग असू शकतो व ते जंतांची अंडी पसरवू शकतात.
- विष्ठा साचू नये म्हणून कोंबड्या फिरण्याच्या जागेत पाण्याचा निचरा होण्याची योग्य सोय करा आणि कोंबड्यांचे निवारे वारंवार बदलत राहा.
- कोंबड्यांना नुकत्याच नांगरलेल्या जमिनीपासून दूर ठेवा, कारण तिथे गांडुळे व इतर कीटक खाण्याची शक्यता जास्त असते.
- कीटक नियंत्रणासाठी कीटकनाशकांचा वापर करा.

गंभीर आजारी पक्ष्यांमधील परजीवींची पातळी कमी करून, कोंबड्यांवरील उपचारांमुळे शेतकऱ्याला फायदा होऊ शकतो. परिणामी, आजूबाजूच्या वातावरणात परजीवींच्या अंड्यांचा साठा कमी होईल. विशिष्ट प्रकारच्या जंतांच्या आजारांसाठी विशिष्ट उपचारांची आवश्यकता असते. त्यामुळे उपचार सुरू करण्यापूर्वी, तुमच्या कोंबड्यांना नक्की कोणत्या जंतांचा त्रास होत आहे याचे निदान पशुवैद्यकाकडून करून घ्यावे. योग्य औषधोपचार, चांगले व्यवस्थापन आणि स्वच्छतेच्या पद्धतींचा अवलंब करून आतड्यांतील जंतांमुळे होणारे उत्पादनाचे नुकसान कमीत कमी राखता येऊ शकते.




परसातील कोंबड्यांमध्ये मोठे गोलजंत, सिकल जंत, लहान गोलजंत आणि पट्टकृमी यांसारख्या आतड्यांतील परजीवींमुळे पोषकद्रव्यांचे शोषण कमी होते, वाढ खुंटते आणि उत्पादकता घटते. गंभीर संसर्गामुळे आतड्यांमध्ये अडथळा निर्माण होऊन पक्ष्यांचा मृत्यूही होऊ शकतो. दूषित खाद्य, पाणी, विष्ठा, गांडुळे आणि कीटकांमधून संसर्ग पसरतो. प्रतिबंधासाठी कोंबड्यांच्या निवाऱ्याची नियमित स्वच्छता, कोरडा बिछाना, योग्य निचरा, संतुलित आहार व गर्दी टाळणे आवश्यक आहे. जंगली पक्ष्यांना दूर ठेवावे तसेच कीटक नियंत्रण करावे. कोंबड्या व टर्की पक्षी स्वतंत्र ठेवावेत. जंतांचा प्रकार निश्चित करण्यासाठी पशुवैद्यकाकडून निदान करून योग्य औषधोपचार करावेत..

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन विभाग

# उपाययोजनांची करुया साथ, चारा टंचाईवर करुया मात !

## चाऱ्याचे योग्य नियोजन आणि साठवणूक

### १ हिरव्या चाऱ्याची निर्मिती वाढवा

सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास जास्तीत जास्त हिरवा चारा निर्मिती करावी.

### २ मुरघास (Silage) निर्मिती

जेव्हा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो, तेव्हाच मका किंवा ज्वारीपासून मुरघास बनवून ठेवावा. हा चारा दुष्काळात अत्यंत उपयुक्त ठरतो.

### ३ चाऱ्याची नासाडी रोखणे

जनावरांना अख्खा चारा न टाकता कुटी करुन (कडबा कुटी यंत्राच्या साहाय्याने) टाकावा. यामुळे चाऱ्याची १० ते १२ टक्के होणारी नासाडी वाचते.

### ४ सुक्या चाऱ्यावर प्रक्रिया

उपलब्ध सुक्या चाऱ्याची (उदा. गव्हाचा कोंडा, पेंढा, वाळलेले गवत) पौष्टिकता वाढवण्यासाठी त्यावर **युरिया-गुळ-मीठ** प्रक्रियेचा वापर करावा.

सकस चारा | संतुलित खाद्य | सशक्त पशुधन | समृद्ध महाराष्ट्र

पशुवैद्यकीय सेवांसाठी **1962**

महाराष्ट्र शासन **पशुसंवर्धन विभाग**

WhatsApp चॅटबॉट सेवा **9063142299**

## चारा साक्षरता व संवर्धन अभियान

# बेल सायलेज मशीन (मुरघास बेलींग मशीन)

**हिरवा चारा सुरक्षित...**
**पशुधनासाठी पौष्टिक आहार!**



| आकारमान | मशीनचे वजन | वीज पुरवठा | तयार होणाऱ्या बेलचे वजन |
|---|---|---|---|
| १२०० × ३०० मिमी | १५०० किलो | ३-फेज विजेवर चालते | ५० किलो |

### 1 हॉपर आणि कन्वेअर (Hopper and Conveyor)



- हॉपर क्षमता: २०० किलो
- कन्वेअर साखळीद्वारे (Chain mechanism) चालतो व हॉपरमध्ये टाकलेला चारा कॉम्प्रेशन चेंबरमध्ये पोहोचवला जातो.

### 2 कॉम्प्रेशन चेंबर (Compression Chamber)



- दाब: ६५० किलो/घनमीटर (Kg/cu.m)
- हिरवा चझार अलार्म पुरेसा दाब निर्माता झाल्याचे दर्शवितो.

### 3 अंतर्गत रॅपिंग युनिट (Internal Wrapping Unit)



- पॉलिथिनचा पहिला थर (पहिली जोडणी) लावला जातो.
- पॉलिथिनची रुंदी: **५२० मिमी** (सूर्याच्या अतिनील / UV किरणांपासून चाऱ्याचे संरक्षण करते.)

### 4 बाहेरील रॅपिंग युनिट (External Wrapping Unit)



- पॉलिथिनचा दूसरा थर लावला जातो.
- तांबडा (लाल) बझर अलार्म रॅपिंग पूर्ण झाल्याचे दर्शवितो.
- रॅपिंग पूर्ण झाल्यावर बेल स्वयंचलितपणे बाहेर ढकलली जाते.

### 5 ५-लीव्हर हायड्रॉलिक कंट्रोल (5-Lever Hydraulic Control)



1. कन्वेअर गती
2. चेंबर गती
3. चेंबर उघडणे आणि बंद करणे
4. बाहेरील रॅपिंग
5. स्वयंचलित बेल ढकलणे

### 6 स्वयंचलित वजन यंत्र (Automatic Weighing System)




- स्वयंचलितपणे तयार झालेल्या बेलचे वजन घेतले जाते.

**उत्तम मुरघास**
**निरोगी पशुधन**
**समृद्ध शेतकरी**

पशुसंवर्धन विभाग
महाराष्ट्र शासन

# महापशुधन वार्ता



महाराष्ट्र शासन

## पशुसंवर्धन विभाग

पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

## आवाहन

राज्यात शासन निर्णय दि. **१/३/२०२६** अन्वये मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना मंजूर केली आहे. सदर योजनेद्वारे ग्रामीण भागात पशुपालनाद्वारे उद्योजकता निर्माण करणे हा प्रमुख हेतू आहे. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दुधाळ गायी, म्हशी, शेळ्या, मेंढया, कुक्कुट पक्षी व वराह अनुदान तत्वावर देण्यात येणार आहे.

सदर योजनांची अंमलबजावणी पारदर्शकपणे होण्यासाठी व योजनेचा लाभ थेट लाभार्थ्यांस व्हावा यासाठी योजनांची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यांचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. सदर प्रणाली विकसित करताना अर्जदाराच्या दृष्टीने सुलभता यावी यासाठी अर्जदारांशी संबंधित तरीचशी कागदपत्रे (उदा. ७/१२/ उतारा, रेशनकार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र इ.) ऑनलाईन पद्धतीने परस्पर उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. सदर योजनांसाठी शासनाच्या महा-डीबीटी पोर्टलवरून केवळ आधारकार्ड क्रमांक किंवा महाआयडी क्रमांक टाकून अर्जदारास अर्ज करता येईल.

योजनांसाठी लवकरच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून त्यासाठी शासनाने कोणत्याही अशासकीय व्यक्ती अथवा संस्थांना अधिकृत केलेले नाही. यासंदर्भात समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या चुकीच्या जाहिरातीना बळी पडू नये तसेच अर्जदारास अर्ज भरताना काही अडचण/शंका असल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाने /कार्यालयांशी किंवा **१९६२** या टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने याद्वारे करण्यात येत आहे.

**श्रीमती पंकजा मुंडे**
**मा. मंत्री, पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य**



**अधिक माहितीसाठी संपर्क**

**पशुवैद्यकीय सेवांसाठी टोल फ्री क्रमांक**

**१९६२**



दुधाळ गायी | म्हशी | शेळ्या | मेंढया | वराह | कुक्कुट पक्षी

महाराष्ट्र शासन

## पशुसंवर्धन विभाग

पशुधन हिताय: बहुजन सुखाय: